CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २५० | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वदेशी केवळ आर्थिक बाब नाही. स्वदेशी ही भावना आहे. या भावनेच्या आधारानेच आपल्या देशाचा विकास होऊ शकतो. ''देशप्रेमाची साकार आणि व्यावहारिक अभिव्यक्ती म्हणजे स्वदेशी.'' देशप्रेम म्हणजे जगापासून अलिप्त राहणे असे नाही. विशेषतः आपली परंपरा 'वसुधैव कुटुंबकम्'वर आधारित असताना. यानुसार, मानवीय चेतनेच्या पातळीवर आंतरराष्ट्रीयता राष्ट्रवादाचाच विस्तार आहे.

- **दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

## महत्त्वाचे

### ऑक्टोबरमध्ये गोल्ड ईटीएफमध्ये मोठी गुंतवणूक

**नवी दिल्ली** : सोन्याच्या किमती वाढल्या आहेत, तशी गुंतवणूकही वाढली आहे. ऑक्टोबरमध्ये, नागरिकांनी गोल्ड एक्सचेंज-ट्रेडेड फंड्समध्ये अंदाजे ७,५०० कोटी रुपये गुंतवले. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या अहवालानुसार, गोल्ड ईटीएफमध्ये सकारात्मक गुंतवणुकीचा हा सलग पाचवा महिना आहे. यापूर्वी, मे महिन्यात लोकांनी ईटीएफमधून ६८ दशलक्ष किंवा अंदाजे ६०२ कोटी रुपये काढले होते. तेव्हापासून, जून ते ऑक्टोबरपर्यंत लोक सतत त्यात गुंतवणूक करीत आहेत.

# देशभरातील रासायनिक हल्ल्याचा कट उधळला


### डॉक्टरसह इसिसच्या तीन अतिरेक्यांना अटक | जहाल रिसिन तयार करण्याचा प्रयत्न | गुजरात एटीएसची कामगिरी

◆ **अहमदाबाद, ९ नोव्हेंबर**

सायनाईडपेक्षा जास्त जहाल रिसिनच्या माध्यमातून देशभरात रासायनिक हल्ल्याचा कट उधळताना गुजरात दहशतवादविरोधी पथक अर्थात् एटीएसने चिनी एमबीबीएसची पदवी असलेल्या एका डॉक्टरसह इसिसच्या तीन अतिरेक्यांना अटक केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. तिघांच्याही विरोधात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा, भारतीय न्याय संहिता आणि अटक केलेल्या इसिसच्या तिन्ही आरोपींची ओळख पटली असून, डॉ. अहमद मोहियुद्दीन सैयद, आझाद सुलेमार आणि मोहम्मद सुहैल मोहदम्मद सलीम अशी त्यांची नावे आहेत. त्यांनी लखनौ, दिल्ली आणि अहमदाबाद येथील संवेदनशील ठिकाणांची रेकी केली होती, अशी माहिती एटीएसच्या अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

डॉ. अहमद मोहियुद्दीन हा उच्चशिक्षित आणि कट्टरपंथी आहे आणि मोठ्या दहशतवादी कारवाया घडवून आणण्याच्या कटाचा भाग म्हणून त्याने निधी गोळा करण्याची आणि तरुणांची भरती करण्याची योजना आखली होती, असे गुजरात एटीएसचे उपमहानिरीक्षक सुनील जोशी यांनी पत्रकारांना सांगितले.

सूत्रधार ड्रोनद्वारे शस्त्रास्त्रांचा साठा पाकिस्तान सीमेवरू पाठवतो, अशी कबुली तिघांनी दिली आहे. गुप्त माहितीच्या आधारे एटीएसच्या पथकाने ७ नोव्हेंबर रोजी गांधीनगरमधील अदलाजवळ डॉ. सय्यदला अटक करण्यात आली. तो मूळचा हैदराबादचा रहिवासी आहे. सय्यद, शेख आणि सलीम शस्त्रास्त्रांची देवाणघेवाण करण्यासाठी गुजरातमध्ये आले होते. दहशतवादी हल्ल्याचा कट रचत होतो आणि कलोल येथील एका निर्जन ठिकाणावरून शस्त्रे गोळा केली होती, असे सय्यदने चौकशीत कबूल केले. सय्यदचा सूत्रधार अबू खादीजा हा अफगाणिस्तानचा रहिवासी होता आणि तो आयएसकेपीशी संबंधित होता, असे अधिकाऱ्याने सांगितले. सय्यदच्या ताब्यातून दोन ग्लॉक पिस्तूल, एक बेरेटा पिस्तूल, ३० जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.



### दोन अतिरेकी उत्तरप्रदेशातील

शेख आणि सलीम उत्तरप्रदेशातील रहिवासी आहेत. सय्यदच्या फोनमधून मिळालेल्या माहितीच्या आधारे बनासकंठातून त्यांच्या मुसक्या आवळण्यात आल्या. शेख आणि सलीमने राजस्थानातील हनुमानगड येथून शस्त्रे पुरवली. एटीएसने त्यांच्या ताब्यातून तीन मोबाईल आणि दोन लॅपटॉप जप्त केल्याचे जोशी यांनी सांगितले.

### एरंडीच्या टाकाऊ पदार्थांपासून रिसिन

रिसिन हे एक रासायनिक विष आहे. ते एरंडीच्या बियांवरील प्रक्रियेनंतर उरलेल्या टाकाऊ पदार्थांपासून बनवता येते. त्यांनी रिसिनचा वापर करून दहशतवादी हल्ला घडवण्याचा कट रचला होता. सय्यदच्या ताब्यातून चार लिटर एरंडेल तेलही जप्त करण्यात आले, असे जोशी यांनी सांगितले.

# निवडणुका जवळ आल्यानेच माझ्याविरोधात बदनामीचा कट

### अजित पवारांची खंत

◆ **बारामती, ९ नोव्हेंबर**

पुणे येथील जमीन प्रकरणात एक रुपयाचा व्यवहार न करताही केवळ आकडे समोर आणले जात आहे. पैसे न देता केवळ कागदावर लिहून जमीन खरेदी कशी केली जाऊ शकते, ते आजपर्यंत मला कळलेले नाही. निवडणुका जवळ येताच मला बदनाम करण्यासाठी कट रचले जातात. मागील निवडणुकीवेळी असेच झाले होते, अशी खंत जमीन घोटाळा प्रकरणावर स्पष्टीकरण देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली.



बारामतीच्या दौऱ्यावर आलेल्या अजित पवार यांनी पत्रपरिषदेत म्हटले की, जमिनीच्या व्यवहारासाठी एक रुपयाही देण्यात आलेला नाही, तरीही त्याचे दस्तऐवज तयार करण्यात आले. हा मला आणि माझ्या कुटुंबाला बदनाम करण्यासाठी रचलेला कट आहे. या व्यवहारामुळे मी आश्चर्यचकीत आहे. २००८ - ०९ च्या दरम्यान ७० हजार कोटींचा आरोप माझ्यावर करण्यात आला. त्यानंतर मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकीत असेच आरोप झाले आणि त्याचे पुरावे कोणीही देवू शकले नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची वेळ साधून माझी बदनामी केली जात आहे. जमीन प्रकरणात गुन्हा दाखल झाला असून, चौकशीसाठी मुख्यमंत्र्यांनी १ महिन्याची मुदत दिली, चौकशी अहवालानंतर वस्तुस्थिती जनतेसमोर येईल, असे अजित पवार म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

# एनआयए, सुरक्षा दलाचे काश्मिरात १२० ठिकाणी छापे

**श्रीनगर** : जम्मू- काश्मीरमध्ये पाकिस्तानी गुप्तहेर आणि दहशतवादी नेटवर्कविरोधात पोलिस, सुरक्षा दल आणि राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने संयुक्त कारवाई करीत १२० पेक्षा जास्त ठिकाणी छापेमारी केली. छाप्यांमध्ये मोबाईल फोन, सिम कार्ड, डिजिटल उपकरणे आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, पाकिस्तान आणि व्याप्त काश्मिरातून भारताच्या विरोधात कुरघोडी करणाऱ्या दहशतवाद्यांच्या संपर्कात काही लोक असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यावरून बडगाम, कुलगाम आणि शोपियाँसारख्या दुर्गम भागात शनिवारी रात्री संयुक्त कारवाई करण्यात आली. त्यात एनआयए आणि सुरक्षा दलाचे पथकही सहभागी होते.

# बिहारमधील दुसऱ्या टप्प्याचा प्रचार थांबला

**पाटणा** : बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातील प्रचार रविवारी सायंकाळी थांबला. यामुळे प्रतिस्पर्ध्यांमध्ये जवळपास महिनाभर चाललेली शब्दांची आणि तणावाची लढाई संपली. दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबर आणि त्यानंतर १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल. दुसऱ्या टप्प्यात १२२ जागांवर निवडणूक होणार आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ममदानीनंतर सैकत चक्रवर्ती खासदार होण्याच्या शर्यतीत

**वॉशिंग्टन डीसी :** गेल्या आठवड्यात, भारतीय-अमेरिकन जोहरान ममदानी यांनी न्यूयॉर्कच्या महापौरपदाच्या निवडणुकीत विजय मिळवून इतिहास रचला. आता, भारतीय-अमेरिकन डेमोक्रॅट सैकत चक्रवर्ती हेडलाइन्समध्ये येत आहेत. नॅन्सी पेलोसी यांनी निवृत्तीची घोषणा केल्यापासून सॅन फ्रान्सिस्को काँग्रेसनल जागा रिक्त झाली आहे, ज्यामुळे ३९ वर्षीय सैकत यांना डेमोक्रॅटिक उमेदवारी मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ममदानींप्रमाणेच, सैकत हे पुरोगामी नेत्यांच्या एका नवीन लाटेचा भाग आहेत ज्यांना जुन्या लोकशाही विचारांमध्ये बदल करायचा आहे.

### समस्तीपूरमध्ये रस्त्यावर सापडल्या व्हीव्हीपॅट स्लिप्स

**पाटणा :** समस्तीपूरच्या सराईरंजन विधानसभा मतदारसंघातील केएसआर कॉलेजजवळ रस्त्यावर मोठ्या प्रमाणात व्हीव्हीपॅट स्लिप आढळल्या. निवडणूक आयोगाने या प्रकरणी कारवाई करीत दोन कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करण्याचा आदेशही दिला आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल केला जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे. याचा मतमोजणीवर कोणताही परिणाम होणार नाही. या व्हीव्हीपीएटी स्लिप्स बनावट स्लिप्स आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यातील मतदान ६ नोव्हेंबर रोजी झाले. सराईरंजन विधानसभा मतदारसंघातही पहिल्या टप्प्यात मतदान झाले. मतदानापूर्वी, प्रत्येक मतदान केंद्रावर ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट योग्यरीत्या कार्यरत आहेत की नाही याची पडताळणी करण्यासाठी मॉक पोल घेतला जातो. मतदानानंतर दोन दिवसांनी, शीतलपट्टी गावात कचऱ्यात व्हीव्हीपॅट स्लिप्स सापडल्या. महाआघाडीतील पक्ष यावर निवडणूक आयोगाला प्रश्न विचारत आहेत.

### गांजा तस्कराच्या घरी सापडली दोन कोटींची रोकड


**प्रतापगड :** प्रतापगडमधील एका तस्कराच्या घरावर पोलिसांनी छापा टाकला तेव्हा त्यांना दोन कोटी रुपये रोख सापडले. ही संपूर्ण रक्कम १००, ५० आणि २० रुपयांच्या नोटांमध्ये होती. अधिकाऱ्यांनी नोटा मोजायला सुरुवात केली, पण ते नोटा मोजून-मोजून थकले. अनेक महिला अधिकाऱ्यांनी घामही पुसायला सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांनी चार नोटा मोजण्याच्या मशीन मागवल्या आणि मोजणी पूर्ण केली. संपूर्ण घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये नोटांचा ढीग दिसत आहे.

### सायबर बुलिंगची बळी ठरली अभिनेत्री

**तिरुवनन्तपुरम् :** अभिनेत्री अनुपमा परमेश्वरनने केरळ सायबर गुन्हे पोलिसांकडे सायबर धमकीबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत तिने म्हटले आहे की, तामिळनाडूतील एक २० वर्षीय महिला सोशल मीडियावर तिच्या आणि तिच्या कुटुंबाबद्दल खोट्या आणि आक्षेपार्ह पोस्ट शेअर करीत होती. अनुपमा म्हणाली की, मुलीने अनेक बनावट इन्स्टाग्राम प्रोफाइल तयार केल्या आणि तिच्या नावाने खोटी माहिती आणि प्रक्षोभक टिप्पण्या पसरवल्या.

### बलात्काराचा आरोपी आपचा आमदार ऑस्ट्रेलियात पसार

**चंदीगड :** बलात्कार आणि फसवणुकीचा आरोप असलेले पंजाबमधील आम आदमी पक्षाचे आमदार हरमीत सिंग पठानमाजरा पोलिसांना चकमा देत थेट ऑस्ट्रेलियात पसार झाले आहे. सनौर विधानसभा मतदारसंघाचे आमदार असलेल्या पठानमाजरा यांनी परदेशातील एका पंजाबी युट्युब चॅनेलला मुलाखत देऊन, आपण सध्या ऑस्ट्रेलियात असल्याचे कबूल केले आहे. पटियाला येथील सनौरचे आमदार असलेल्या पठानमाजरा यांच्यावर झीरकपूर येथील एका महिलेने बलात्कार, फसवणूक आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला.



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२०,५०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. १,४९,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.८ | १५.६ |
| अमरावती | ३१.४ | १२.५ |
| भंडारा | -.- | १२.० |
| बुलडाणा | २९.६ | १३.८ |
| चंद्रपूर | ३१.० | १६.८ |
| गडचिरोली | २९.४ | १४.२ |
| गोंदिया | २७.४ | ११.५ |
| नागपूर | २९.१ | १४.४ |
| वर्धा | ३१.० | १४.८ |
| वाशीम | २९.६ | १२.६ |
| यवतमाळ | ३२.० | १३.० |



भारतीय वायुसेनेच्या ९३ व्या स्थापना दिनानिमित्त ईशान्य भारतात हवाई दलाने जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आसमंत दणाणून सोडला. राफेल, सुखोई, तेजस, मिग-२९, आयएल-७८ रिफ्युलर, मिराज, जग्वार, सी-१७ ग्लोबमास्टर, एमआय-१७, ॲडव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टर-एमके, सी-१३० हर्क्युलस, अँटोनोव्ह एन-३२, अपाचे आणि सूर्यकिरण या विमानांनी चित्तथरारक कवायती करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

# हत्तुर-आनंदनगर तांडा पुलासाठी १ कोटी ९० लाखांचा निधी मंजूर

## आमदार देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक रस्ते आणि पूल मोठ्या प्रमाणात बाधित झाले होते. त्यात हत्तुर - आनंदनगर तांडा येथील महत्त्वाच्या पुलाचेही नुकसान झाले होते. आमदार सुभाष देशमुख यांच्या पाठपुरावानंतर शासनाकडून या पूल दुरुस्तीसाठी एक कोटी ९० लाखांचा निधी मंजूर झाला आहे.



सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यसह दक्षिण तालुक्याला फटका बसला होता. दक्षिण तालुक्यातील अनेक रस्ते खराब झाले होते हत्तुर-आनंदनगर हा पूलही अतिवृष्टीमुळे वाहून गेला होता. घटनेची माहिती मिळताच आमदार सुभाष देशमुख यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

स्थानिक नागरिकांशी संवाद साधला आणि या पुलाच्या तातडीच्या दुरुस्तीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर त्यांनी ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांना स्वतः सोबत घटनास्थळी नेऊन समस्या प्रत्यक्ष दाखवली. यानंतर आमदार देशमुख यांनी शासनस्तरावर वारंवार पाठपुरावा केला. पुलासाठी निधी मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु ठेवले. या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून शासनाने पुलाच्या पुनर्बांधणीसाठी १ कोटी ९० लाख रुपये मंजूर केले आहेत. या निधीमुळे आता पुलाचे पुनर्बांधकाम जलद गतीने होणार असून, काही दिवसांत निविदा प्रक्रिया सुरू करून कामाला प्रारंभ केला जाणार आहे.

## हवाई योद्ध्यांच्या गर्जनांनी शहारली ब्रह्मपुत्रा

**गुवाहाटी :** भारतीय वायुसेनेच्या ९३ व्या वर्धापन दिनानिमित्त गुवाहाटी येथील नॉर्दर्न कमांड येथे एअर शो मधून वायुसेनेच्या ७५ विमानांनी रविवारी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. ब्रह्मपुत्रा नदीवरील लचित घाटावरून २५ लढाऊ विमान आणि हेलिकॉप्टरने एकाचवेळी उड्डाण करून इतिहास रचला. राफेल, सुखोई, तेजस, मिग२९, आयएल-७८ रिफ्युलर, मिराज, जग्वार, सी-१७ ग्लोबमास्टर, एमआय-१७, ॲडव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टरएमके, सी-१३० हर्क्युलस, अँटोनोव्ह एन-३२, अपाचे आणि सूर्य किरण या विमानांनी ब्रम्हपुत्रा नदीवरून उड्डाण घेत सामर्थ्य दाखविले. एअर शो मध्ये राफेल, सुखोई आणि तेजससह ७५ हून अधिक विमाने, हेलिकॉप्टरने उड्डाणाचे प्रदर्शन केले.

## मेहुल चोक्सीच्या मालमत्तेचा होणार लिलाव

### न्यायालयाची मान्यता

**◆ नवी दिल्ली, ९ नोव्हेंबर**

पंजाब नॅशनल बँकेतील २३ हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्यातील आरोपी मेहुल चोक्सीच्या १३ मालमत्तांचा लिलाव करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

विशेष न्यायालयाने ४६ कोटी रुपयांच्या कंपन्यांचा लिलाव करण्याची परवानगी दिली आहे. यामध्ये बोरिवली येथील एक सदनिका (२.६ कोटी रुपये), भारत डायमंड बोर्स आणि बीकेसीमधील कार पार्किंगची जागा (१९.७ कोटी रुपये), गोरेगावमधील सहा कारखाने (१८.७ कोटी रुपये), चांदीच्या विटा, मौल्यवान रत्ने आणि अनेक कंपनीच्या मशीन्सचा समावेश आहे.

विशेष न्यायाधीश ए. व्ही. गुजराती म्हणाले की, जर या मालमत्ता वापरल्या न गेल्या तर त्यांची किंमत कमी होत राहील. म्हणून, त्यांचा तत्काळ लिलाव करणे आवश्यक आहे. लिक्विडेटरला मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा अधिकार आहे. त्यानंतर, मालमत्तांचा लिलाव करता येईल. लिक्विडेटर आयसीआयसीआय बँकेत मुदत ठेवी ठेवून पैसे जमा करू शकतो.

एनसीएलटीने ७ फेब्रुवारी २०२४ रोजी लिक्विडेटरची नियुक्ती केली. त्यानंतर, न्यायालयाने नीरव मोदी आणि चोक्सीच्या मालमत्तेचे मूल्य निश्चित करण्याची परवानगी दिली. नीरव मोदी सध्या ब्रिटनच्या तर, चोक्सी बेल्जियमच्या तुरुंगात आहे.

अँटवर्प कोर्ट ऑफ अपीलच्या १७ ऑक्टोबरच्या आदेशाला मेहुल चोक्सीने बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. अँटवर्प न्यायालयाने भारताच्या प्रत्यार्पणाची विनंती 'लागू करण्यायोग्य' घोषित केली होती, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानला हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल

### शांतता चर्चा अपयशी ठरल्यानंतर तालिबान सरकारचा इशारा

**◆ काबुल, ९ नोव्हेंबर**

शांतता चर्चा अपयशी ठरल्यानंतर पाकिस्तानने अफगाणच्या सीमा भागात केलेल्या हल्ल्यात सात नागरिकांचा मृत्यू झाला, यानंतर तालिबान सरकारने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर देणार असल्याचा इशारा दिला.

अफगाणिस्तानचे आदिवासी सीमा आणि अंतर्गत व्यवहार मंत्री नुरउल्लाह नुरी यांनी म्हटले की, पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांनी अफगाणिस्तानच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, त्यांना हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल. युद्ध सुरू झाल्यास अफगाणिस्तानातील वृद्ध आणि तरुणही लढण्यास तयार आहेत. अफगाणिस्तानच्या भूमीवर कोणताही हल्ला सहन केला नाही. पाकिस्तानी सैन्याने हल्ले सुरूच ठेवल्यास आम्ही विध्वंस घडविल्याशिवाय राहणार नाही. पाकिस्तान जाणीवपूर्वक तणाव वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे.

पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वृत्तीमुळे शांतता चर्चा यशस्वी झाली नाही. पुन्हा युद्ध झाल्यास यासाठी पाकिस्तान जबाबदार असेल. नुरी यांनी सांगितले की, अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर इतर कोणत्याही देशाविरुद्ध आम्ही करू देणार नाही आणि अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वाला, स्वातंत्र्याला किंवा सुरक्षिततेला हानी पोहोचवू देणार नाही. अशा कृती केल्यास, अफगाण फौजा इस्लामाबादपर्यंत हल्ला करण्यास सक्षम आहे. (वृत्तसंस्था)

### संयमाचा अंत पाहू नका

पाकिस्तानातील अनेक मुस्लिम लोकांचे नातेवाईक अफगाणिस्तानात आहेत आणि तालिबान त्यांच्या कल्याणाची इच्छा बाळगतो आणि शांतीची आशा करतो. तथापि, पाकिस्तानी अधिकाऱ्यांमुळे हे अशक्य दिसते. पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांनी अफगाण लोकांच्या संयमाची परीक्षा पाहू नये. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी त्यांच्या देशाच्या तंत्रज्ञानावर आणि शस्त्रांवर जास्त अवलंबून राहू नये. त्यांनी अमेरिका आणि रशियापासून धडा घ्यायला हवा. जर तणाव वाढला तर पाकिस्तानचे सिंध आणि पंजाब प्रांत आमच्यासाठी दूर नाही असा इशारा समाज माध्यमावर व्हिडीओ जारी करून नुरी यांनी दिला आहे.

## कलावंतांच्या वाहनाला अपघात; २० जखमी

**◆ तिरोडा, ९ नोव्हेंबर**

मंडई उत्सवात सहभागी होणासाठी जाणाऱ्या वाहनाला अपघात झाला. यात चालकासह २० जण जखमी झाले. ही घटना तालुक्यातील धादरी मार्गावर ९ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. या अपघातात १० वर्षीय मुलगासुद्धा गंभीर असल्याचे समजते.

गोंदिया जिल्ह्यात सध्या मंडई उत्सवाची धूम सुरू आहे. गावोगावी आयोजन केले जाते. यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व लोककला म्हणून पूर्व विदर्भात प्रसिद्ध असलेल्या दंडारीचे सादरीकरण केले जाते.

रविवारी गोंदिया तालुक्यातील एकोडी येथे मंडईचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी ३ च्या सुमारास धादरी येथील दंडार मंडळींसह व वाद्यमंडळी एकोडीच्या दिशेने मालवाहू वाहनाने निघाले असता धादरी गावापासून काही अंतरावर वाहनचालकाने ब्रेक मारल्याने वाहन अनियंत्रित होऊन उलटले. यात चालकासह वाहनातील २० जण जखमी झाले. माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना शहरातील खाजगी रुग्णालयात दाखल केले. वृत्त लिहिस्तोवर पोलिसांत नोंद करण्यात आली नव्हती. (तभा वृत्तसेवा)



नाणीज पीठाचे जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य यांनी रविवारी नागपूर येथे पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांच्या निवासस्थानी जाऊन पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान केला व अभिनंदन केले. डॉ डांगरे यांनी तरुण भारतचा दिवाळी अंक व अमृतयोग विशेषांक भेट म्हणून दिला.याप्रसंगी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली.

# ऑनलाईन फसवणूक करणारे ८१ आरोपी पकडले

### सायबर गुन्हेगारांविरोधात तेलंगणा पोलिसांची कारवाई

**◆ हैदराबाद, ९ नोव्हेंबर**

नागरिकांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या टोळीविरोधात मोहीम राबवत तेलंगणा पोलिसांच्या सायबर सुरक्षा विभागाने राज्यातील विविध जिल्ह्यात छापे टाकत ८१ जणांना अटक केली, त्यात सात महिलांचा समावेश आहे.

सायबर सुरक्षा विभागाच्या महासंचालक शिखा गोयल यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, राज्यातील विविध पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या सायबर गुन्ह्यांशी संबंधित ४१ प्रकरणाची चौकशी करताना आरोपींची माहिती पटली. त्यानंतर छापे टाकून ८१ आरोपींना महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यातून पकडण्यात आले. त्यांनी ९५ कोटींची फसवणूक केल्याचे तपासात समोर आले. आरोपींनी तेलंगणाशिवाय देशातील इतर राज्यातील लोकांची ऑनलाईन फसवणूक केली. त्यात तेलंगणातील १२८ प्रकरणांचा समावेश आहे. अटक करण्यात आलेले आरोप एजंट म्हणून काम करीत होते आणि त्यांना पाच टक्क्यापर्यंत कमिशन मिळायचे. या कारवाईत ८४ मोबाईल, १०१ सिम कार्ड आणि ८९ बँक पासबुक व चेक जप्त करण्यात आले.

आरोपींचा परदेशातील व्यक्तींचा समावेश असून फसवणुकीच्या टोळीतील सूत्रधार परदेशातून एजंटला सूचना देत होते. त्यांच्याविरोधात लुक आऊट नोटीस जारी केला जाईल. ८१ जणांपैकी १२ आरोपींचे देशभरात ३० हून अधिक गुन्ह्यात समावेश आहे, तर ५४ जण विविध पाच सायबर गुन्ह्यांतील आरोपी आहे. सर्व आरोपींची बँक खाती गोठविण्यात आली आणि याप्रकरणात खाजगी बँकांचे तीन कर्मचारी सहभागी असल्याचे समोर आले. त्यात एक लिपीक, सेल्स एक्झिक्युटिव्ह आणि शाखा व्यवस्थापकाचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### आरोपींमध्ये उच्चशिक्षितांचा सहभाग

आरोपींमध्ये उच्चशिक्षितांचा समावेश आहे, त्यात डिप्लोमाधारक, बीबीए पदवीधर, आणि बहुराष्ट्रीय कंपनीतील एक कर्मचारी, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी, आयटी कंपनीतील कर्मचारी, विद्यार्थी आणि डिजिटल प्रशिक्षण घेतलेले तरुण दैनंदिन परताव्यावर काम करीत होते. ही टोळी आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करीत होती आणि या प्रकरणातील सूत्रधारांना पकडण्यासाठी तपास सुरू असल्याचे गोयल यांनी सांगितले.

# नियुक्तीवेळी पात्र नसले तरी सेवेतून काढता येणार नाही

### टीईटी उत्तीर्ण शिक्षकांच्या प्रकरणात सुप्रीम कोर्टाचा निर्णय



**◆ नवी दिल्ली, ९ नोव्हेंबर**

ज्या शिक्षकांनी आरटीई कायदा अर्थात मुलांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा-२००९ अंतर्गत वाढवलेल्या मुदतीत शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात् टीईटी उत्तीर्ण केली आहे, त्यांना केवळ मूळ नियुक्तीवेळी टीईटी प्रमाणपत्र नव्हते या कारणाने सेवेतून काढून टाकता येणार नाही, असा महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला.

सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या द्विसदस्यीय न्यायासनाने निर्णय देताना म्हटले की, वाढीव मुदत ३१ मार्च २०१९ होती आणि ज्या शिक्षकांनी या मुदतीपूर्वी टीईटी परीक्षा उत्तीर्ण केली, त्यांची सेवा केवळ मूळ नियुक्तीच्या तारखेला पात्रता नसल्याने समाप्त करणे चुकीचे आहे. कानपूर येथील दोन सहाय्यक शिक्षकांना २०१२ मध्ये नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी वाढीव मुदतीपूर्वी म्हणजेच २०१४ पर्यंत टीईटी परीक्षा उत्तीर्ण केली होती. पण, नियुक्तीच्या वेळी त्यांच्याकडे टीईटी प्रमाणपत्र नव्हते. याच कारणामुळे जुलै २०१८ मध्ये त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले. दोन्ही शिक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. अलाहाबाद उच्च न्यायालयाने सेवा समाप्तीचा निर्णय कायम ठेवला. त्यानंतर या निर्णयाला त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आणि न्यायासनाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करीत शिक्षकांना दिलासा दिला. (वृत्तसंस्था)

### न्यायासनाने काय आदेश दिले?

- सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना नमूद केले की, आरटीई कायद्याच्या कलम २३ मध्ये २०१७ मध्ये दुरुस्ती करून शिक्षकांना आवश्यक पात्रता पूर्ण करण्याची मुदत ३१ मार्च २०१९ पर्यंत वाढवण्यात आली होती.
- न्यायासनाने प्रश्न उपस्थित करीत म्हटले, की शिक्षकांनी १२ जुलै २०१८ रोजी म्हणजे सेवेतून काढून टाकण्याच्या तारखेपूर्वीच २०१४ पर्यंत टीईटी परीक्षा उत्तीर्ण केली, मग त्यांना अपात्र कसे ठरवले जाऊ शकते?
- टीईटी पात्रतेचा अभाव हे सेवेतून काढून टाकण्याचे कारण असू शकत नाही, या शिक्षकांना सेवा काळात इतर सर्व अनुषंगिक लाभ मिळतील, मात्र त्यांना मागील वेतन मिळणार नाही.

निवडणुका जवळ आल्याने उद्धव ठाकरे ड्रोन वगैरे विषय सहानुभूती मिळवण्यासाठी काढत आहेत. त्यांना विकासाच्या मुद्यावर बोलायचे नाही, त्यांना सरकारवर टीकाही जमत नाही. म्हणून ते काहीतरी भलताच मुद्दा रेटताहेत.
- **प्रवीण दरेकर**, भाजपा नेते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोमवार, १० नोव्हेंबर २०२५


गोविंदा मुलगा म्हणून चांगला आहे, पिता म्हणून चांगला आहे. पण, नवरा म्हणून योग्य नाही. मला लग्नानंतर त्याच्यासाठी बराच त्याग करावा लागला. पुढील जन्मी त्याने माझा मुलगा व्हावे, नवरा नको.
- **सुनीता आहुजा**, गोविंदाची पत्नी

# घटनादुरुस्तीवरून पाकमध्ये जनतेचा देशव्यापी बंद

**● असीम मुनीर तिन्ही दलाचे प्रमुख ● अमर्याद अधिकार दिल्याने विरोधी पक्ष रस्त्यावर**



**इस्लामाबाद, ९ नोव्हेंबर**

पाकिस्तानच्या शहबाज सरकारने घटनादुरुस्तीच्या आडून लष्करप्रमुख असीम मुनीर यांना तिन्ही सशस्त्र दलाचे प्रमुख बनविले. त्यांना दिलेल्या अमर्याद अधिकारांच्या विरोधात पाकिस्तानात देशव्यापी बंद पुकारण्यात आला. विरोधी पक्ष रस्त्यावर उतरले आहे.

संविधानात केलेल्या दुरुस्तीनुसार पाच वर्षे त्यांना पदावरून हटवता येणार नाही तसेच पंतप्रधान, राष्ट्रपतींना विश्वासात न घेता लष्करी कारवाई करण्याचे त्यांना पूर्ण अधिकार राहणार आहेत.

या दुरुस्तीमुळे संयुत कर्मचारी समितीचे अध्यक्षपद काढून टाकले असून, त्याऐवजी संरक्षण दल प्रमुखांचे पद निर्माण करण्यात आले. अशातच २७ व्या घटनादरुस्तीवरून विरोधी पक्ष आक्रमक झाले. त्यांनी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. विरोधी पक्षांचा दावा आहे की, संघीय घटनादुरुस्तीमुळे सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार कमी होणार आहेत आणि या दुरुस्तीमुळे पाकिस्तानच्या राष्ट्रपतींनाही गुन्हेगारी आरोपांपासून आजीवन मुक्तता मिळणार आहे.

पाकिस्तानचे विधि मंत्री आझम नजीर तरार यांनी शनिवारी वरिष्ठ सभागृह सिनेटमध्ये ही दुरुस्ती सादर केली. चर्चा होण्यापूर्वीच हे विधेयक सभागृह समितीकडे पाठवण्यात आल्याने विरोधी पक्ष आक्रमक झाले. प्रसार माध्यमांशी बोलताना मजलिस वहदत-ए-मुस्लिमीनचे प्रमुख अल्लामा राजा नासिर अब्बास म्हणाले, ही घटनादुरुस्ती लोकशाही संस्थांना कमकुवत करण्यासाठी आहे. लष्करप्रमुखाला अमर्याद अधिकार देऊन देशात हुकूमशाही आणण्याचा शरीफ सरकारचा डाव आहे. संपूर्ण देशाने याविरोधात उभे राहिले पाहिजे. जनतेला जागृत करण्यासाठी आणि सरकारचा डाव उलथविण्यासाठी देशव्यापी बंदची हाक देण्यात आली. *(वृत्तसंस्था)*

### संविधानाच्या मूळावरच घाव : गोहर अली खान

पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ पक्ष अर्थात् पीटीआय पक्षाचे नेते गोहर अली खान म्हणाले, घटनादुरुस्ती संविधानाच्या मूळावरच घाव घालणारी आहे. घटनादुरुस्तीमुळे पाकिस्तान लष्कराचे प्रमुख असीम मुनीर यांच्या अधिकारात वाढ होऊन त्यांच्याकडे हवाई दल आणि नौदलाचेही नियंत्रण राहणार आहे. याशिवाय संघीय संवैधानिक न्यायालयाची स्थापना आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेत बदल केला जाईल.

### काय आहे घटनादुरुस्तीतील तरतूद?

पाकिस्तान सरकारने संविधानात सुधारणा करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण विधेयक मांडले आहे. यामध्ये संरक्षण दलांचे प्रमुख हे एक नवीन पद निर्माण केले आहे. या पदाची जबाबदारी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांना देण्यात येणार आहे. दुरुस्ती विधेयकांतर्गत, पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती मुनीर यांची या पदावर नियुक्ती करतील.

### सरकारची भूमिका काय?

संरक्षण दल प्रमुख पद निर्माण करण्यासाठी, सरकारने पाकिस्तान संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा आणि संसदेत २७ वी दुरुस्ती विधेयक मांडले आहे. पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे की, हे पद लष्करात समन्वय प्रस्थापित करण्यासाठी निर्माण केले आहे. यामुळे तिन्ही दर एकाच कमांडखाली काम करू शकतील. त्यामुळे संरक्षण दल प्रमुख हे तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख असतील आणि देशाच्या सुरक्षेसाठी कारवाई करण्याचा अधिकार राहणार आहे.



भल्या पहाटे समुद्रात मासेमारी केल्यानंतर तामिळनाडूची राजधानी चेन्नईतील मरिना बीचवर परतणारे मासेमार

# राजकारणाचा दर्जा घसरला

**रेवंथ रेड्डींच्या वक्तव्यावर राजनाथसिंह यांची टीका**

**औरंगाबाद, ९ नोव्हेंबर**

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्या 'काँग्रेस म्हणजे मुस्लिम' या वक्तव्यावर संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी रविवारी टीका करीत, राजकारणाचा दर्जा घसरला असल्याचे म्हटले.

भाजपा आणि रालोआने धर्म, जात आणि पंथाच्या नावाखाली लोकांचे कधीच विभाजन केले नाही, असा दावा राजनाथसिंह यांनी बिहारच्या औरंगाबाद येथील एका प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले.

काँग्रेस आणि राजद धर्म, जात आणि पंथाच्या नावाखाली समाजात फूट पाडत आहे. बिहारमधील विधानसभा निवडणूक ही सुशासन आणि जंगलराजमधील लढत आहे. ज्या लोकांनी बिहारला जातीयवाद आणि हत्याकांडाच्या युगात लोटले, तेच लोक आता मते मागत आहे.



नागरिकांनी अशा लोकांपासून सतर्क राहिले पाहिजे, असे राजनाथसिंह यांनी म्हटले.

हैदराबादेतील ज्युबिली हिल्स विधानसभा पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी प्रचार करताना, रेड्डी यांनी केंद्रीय कोळसा मंत्री जी किशन रेड्डी यांच्यावर टीका केली की, त्यांनी माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन यांना त्यांच्या मंत्रिमंडळात समाविष्ट करण्यास विरोध केला. केवळ काँग्रेसच अल्पसंख्यक समुदायाच्या सदस्यांना मोठी पदे देते, असेही त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेस म्हणजे मुस्लिम आणि मुस्लिम म्हणजे काँग्रेस, असे वक्तव्य रेवंथ रेड्डी यांनी केले होते.

सत्तेत आल्यास प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याबाबत इंडिया आघाडीने दिलेले आश्वासन खोटे असल्याचा आरोप राजनाथसिंह यांनी केला. पगार देण्यासाठी पैसे कुठून येतील, असा सवाल उपस्थित करीत, तेजस्वीला गणित येते की नाही हे मला माहीत नाही. ते खोटे बोलत आहेत केवळ इतकेच मला माहीत असल्याचा दावा त्यांनी केला.

**समोस्यांसाठी आता बटाटे लागत नाही**

'जब तक रहेगा समोसे में आलू, तब तक रहेगा बिहार में लालू', अशी घोषणा राजदचे कार्यकर्ते द्यायचे. ते दिवस आता गेले. आता समोस्यांसाठी बटाटे लागत नाहीत. चविष्ट समोस्यांसाठी काजू आणि इतर अनेक घटकांची आवश्यकता असते. केवळ रालोआच चविष्ट समोसे देऊ शकते, असा चिमटा राजनाथसिंह यांनी घेतला. *(वृत्तसंस्था)*

## राजस्थान रिफायनरी डिसेंबरमध्ये पूर्ण होणार

**पणजी** : हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड व राजस्थान सरकार यांच्या संयुक्त उपक्रमातील एचपीसीएल राजस्थान रिफायनरी लिमिटेड (एचआरआरएल) प्रकल्प पुढील महिन्यात पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. राजस्थानमधील बालोत्रा आणि बारमेरजवळील पाचपद्रा येथे हा प्रकल्प बांधण्यात येत आहे.



जम्मू-काश्मीरच्या श्रीनगर येथील विहंगम क्रायसॅन्थेमम उद्यानात छायाचित्र काढताना पर्यटक

# लग्न न केल्याने तुम्ही तरुण राहाल असे नाही!

**राहुल गांधींना भाजपा खासदाराचा टोमणा**

**नवी दिल्ली, ९ नोव्हेंबर**

झारखंडमधील गोड्डा येथील भाजपा खासदार निशिकांत सिंह यांनी राहुल गांधींच्या विदेश दौऱ्यांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी विचारले आहे की, जेव्हा तुमचे कुटुंब दावा करते की, त्यांच्याकडे कोणतीही मालमत्ता नाही, तेव्हा सर्व पैसे कुठून येतात? तुम्ही कोलंबिया किंवा कंबोडियाला का जात आहात, कोणत्या कारणासाठी? तुमच्या कुटुंबाची इटलीमध्ये कोणती मालमत्ता आहे? प्रत्येक गोष्टीची चौकशी केली जाईल.

निशिकांत म्हणाले, जेव्हा तुमचे कुटुंब म्हणते की, त्यांच्याकडे कोणतीही मालमत्ता नाही, तेव्हा एवढे पैसे कुठून येतात? तुम्ही कोलंबिया किंवा कंबोडियाला का जात आहात? कुटुंबाची इटलीमध्ये कोणती मालमत्ता आहे? प्रत्येक गोष्टीची चौकशी केली जाईल.

राहुल गांधी अविवाहित आहेत याचा अर्थ ते तरुण आहेत असे नाही. राहुल गांधी आणि मी एकाच वयाचे आहोत. मला दोन मुले आहेत, ते लग्नाच्या वयाचे आहेत. याचा अर्थ ते म्हातारे झाले आहेत.

दुबे म्हणाले, तुम्ही कंबोडिया किंवा व्हिएतनामला का जात आहात? इटलीमधील तुमच्या कुटुंबाच्या मालमत्तेची चौकशी केली जाईल. राहुल गांधींना हे समजत नाही का की ते ५५-५६ वर्षांचे आहेत? मीही तेवढाच म्हातारा आहे. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### सामंथाचे राजसोबतच्या नात्यावर शिक्कामोर्तब

**हैदराबाद** : अभिनेत्री सामंथाने अलिकडेच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. यात तिने या वर्षी घेतलेल्या धाडसी निर्णयांबद्दल आणि अनुभवांबद्दल माहिती दिली. तथापि, पोस्टमधील सर्वांत चर्चेत आलेला फोटो दिग्दर्शक राज निदिमोरू सोबतचा होता. या फोटोमुळे पुन्हा एकदा त्यांच्या नात्याबद्दलच्या अफवांना उधाण आले आहे. फोटोमध्ये सामंथा काळ्या लेस ड्रेसमध्ये दिसत आहे, तर राज काळ्या सूटमध्ये दिसत आहे. दोघेही कॅमेऱ्याकडे पाहत आहेत. नेटकऱ्यांनी सामंथाचा हा फोटो टाकणे म्हणजे राजसोबतच्या नात्यावर तिने शिक्कामोर्तब केले आहे, असा कयास लावला. राज हा दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील प्रख्यात दिग्दर्शक असून, मागील काही महिन्यांपासून तो आणि सामंथा सातत्याने एकत्र दिसत आहेत.



### शंकर महादेवन्‌ला अमिताभकडून धमकी!



**मुंबई** : मथळा वाचून कदाचित सारेच अचंबित होतील. कारण, अभिताभ बच्चन आणि शंकर महादेवन् दोघेही अतिशय सभ्य म्हणून ख्यात आहेत. त्यातही अमिताभ बच्चन यांनी शंकर महादेवन् यांच्यासारख्या प्रतिभावंताला धमकी देणे, हे कदाचित ऐकूनही खरे वाटणार नाही. मात्र, यासंदर्भातील एक गमतीदार किस्सा महादेवन् यांनी शेअर केला. ते म्हणाले, 'कजरा रे' गाण्यात अमिताभ बच्चन यांचा स्वत:चा आवाज अपेक्षित होता. फक्त चित्रीकरणासाठी मी त्यांचा भाग आपल्या आवाजात रेकॉर्ड केला. अभिषेकला जावेद अलीने आवाज दिला होता. चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर एका कार्यक्रमात मी अमितजींना म्हटले की, सर कृपया तुमचा भाग डब करा. ते हसत म्हणाले, तू जे गायले आहे तेच परफेक्ट आहे. ते तसेच राहू दे. ते बदलण्याचा प्रयत्न करशील तर तुझे करिअर संपवून टाकेन. त्यानंतर आम्ही दोघेही खूप हसलो.



### आता मुलाच्या दिग्दर्शनात काम करणार शाहरुख



**मुंबई** : शाहरुखप्रमाणे त्याचा मुलगा आर्यनदेखील अभिनयात उतरेल असे वाटत असतानाच त्याने दिग्दर्शनातून मनोरंजन जगतात पदार्पण केले. त्याच्या 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबसीरिजमधून दिग्दर्शकीय कौशल्याची बरीच प्रशंसा होते आहे. आता आर्यन आपल्या दुसऱ्या प्रोजेक्टकडे वळला असून, तो थेट आपल्या वडिलांनाच अभिनेता म्हणून घेणार आहे. त्याचे दोन चित्रपटांवर काम सुरू आहे. त्यापैकी एका चित्रपटात शाहरुख मुख्य अभिनेता म्हणून झळकणार आहे आणि दिग्दर्शनाची जबाबदारी आर्यनकडेच असेल. वडिलांनी दिग्दर्शन करणे आणि मुलाने काम करणे ही बाब आजवर अनुभवाला आली होती. आता मात्र मुलगा वडिलांना आपल्या पद्धतीने काम करायला लावणार आहे.

### आसाममध्ये धबधब्यात तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू

**हाफलोंग, ९ नोव्हेंबर**

आसामच्या दिमा हासाओ जिल्ह्यातील धबधब्याच्या पाण्यात बुडालेल्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या (एनआयटी) तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. शनिवारी दुपारी हरंगाजाओच्या बोलसोम बागान येथे असलेल्या बुलचोल (हमुंथाजाओ) येथे एनआयटीच्या विद्यार्थ्यांचा गट सहलीसाठी निसर्गरम्य पण दुर्गम धबधब्याला भेट देत असताना ही दुःखद घटना घडली, असे त्यांनी सांगितले.

मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांची ओळख पटली आहे. सौहारद राय आणि वर्तिका सिंह हे उत्तर प्रदेशचे, तर राधिका बिहारची आहेत. *(वृत्तसंस्था)*

# बिहारमध्ये रालोआचा विजय निश्चित

**● पंतप्रधान मोदींचा प्रचारसभेतून विश्वास ● शपथग्रहण समारोहासाठी पुन्हा येणार**

**पाटणा, ९ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीचा निकाल १४ रोजी लागणार असून, बिहारमध्ये पुन्हा एकदा रालोआचे सरकार येणार आहे. जनतेने विकासाला प्राधान्य देत रालोआ उमेदवारांना निवडून देण्याचा निर्णय घेतला असून, नवीन सरकारच्या शपथग्रहण सोहळ्याला मी पुन्हा बिहारला येणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रसारसभेत म्हटले आहे.



बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्याच्या निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मोदी यांनी पश्चिमी चंपारण्यमधील चनपटिया येथे सभा घेतली. यावेळी त्यांनी रोड शो केला. प्रचारसभेला संबोधित करताना मोदी म्हणाले, मला पूर्ण विश्वास आहे की, बिहारमध्ये डबल इंजिन सरकार येणार आहे.

रालोआ सरकार महिलांच्या अधिकारांसाठी आणि त्यांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, १.४० कोटी जीविका दीदींना सक्षम करण्यासाठी प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात आले. पंचायती राज संस्थांमध्ये महिलांना ३५ टक्के आरक्षण आणि संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय आम्ही घेतला. बिहारला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी रालोआ हाच पर्याय आहे. *(वृत्तसंस्था)*

### जंगलराज हद्दपार करा

बिहार आता बदलत असून, येथील जनतेला आता कंदिलाची गरज राहिलेली नाही. मतदानातून जंगलराज हद्दपार करून कोणत्याही परिस्थितीत घोटाळेबाज आणि गुन्हेगारी कृत्यात सहभागी असलेल्यांना जवळ करू नका. काँग्रेस नेते राहुल गांधींवर टीका करताना मोदी म्हणाले, जे लोक संस्कृती आणि परंपरांचा अपमान करतात, त्यांना मतांच्या माध्यमातून जागा दाखवा. बिहारच्या लोकांनी पहिल्याच टप्प्यात विरोधकांना ६५ व्होल्टचा झटका दिला असून, ६५.०८ टक्के मतदान करून रालोआच्या पुनरागमनाचे संकेत दिले आहेत.

### मधुबनी पेंटिंगचा ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

पंतप्रधानांनी बिहारच्या मुलींचा गौरव करत म्हटले की, मधुबनी पेंटिंग आणि येथील कला पुढे नेण्यासाठी मी स्वतः ब्रॅण्ड ॲम्बेसेडर बनलो आहे. अर्जेंटिना आणि दक्षिण कोरियाच्या राष्ट्रपतींना बिहारमधील कलाकारांनी बनवलेली मधुबनी पेंटिंग भेट दिल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यात १२२ जागांवर मतदान होणार आहे, ज्यासाठी रविवारी प्रचाराची सांगता झाली.

# रशियाचे अणुचाचणीवर काम सुरू

**अमेरिकेच्या इशाऱ्याला सर्गेई लाव्हरोव्ह यांचे प्रत्युत्तर**

**मॉस्को, ९ नोव्हेंबर**

राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या सूचनेनुसार रशियाने अणुचाचणीची तयारी सुरू केली आहे आणि त्यादिशेने आमचे काम सुरू असल्याची माहिती रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लाव्हरोव्ह यांनी दिली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अणुचाचणी करण्याच्या घोषणेला लाव्हरोव्ह यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

लाव्हरोव्ह यांनी प्रसार माध्यमांना सांगितले, अणुचाचणीच्या शक्यतेवर काम सुरू झाले आहे.



रशियाच्या सुरक्षा परिषदेच्या बैठकीत राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी परराष्ट्र मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, गुप्तचर संस्था आणि नागरी विभागांना यासंदर्भात सूचना दिल्या.

संबंधित संस्थांनी त्यावर काम सुरू केले आहे. रशिया सध्या तांत्रिक आणि धोरणात्मक पातळीवर मूल्यांकन करीत आहे आणि योग्यवेळी अणुचाचणीची माहिती दिली जाईल. अमेरिकेने अणुचाचणी घेतल्यास आम्हीही करणार आहोत. रशिया कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही.

दरम्यान, ट्रम्प यांनी अलिकडेच अमेरिका तीन दशकानंतर पुन्हा अणुचाचण्या करणार असल्याची घोषणा केली. त्यांनी की, चीन आणि रशियासारखे प्रतिस्पर्धी अणुक्षमता चाचणी करण्याची तयारी करीत असताना अमेरिका मागे राहणार नाही. अमेरिकेच्या निर्णयाने नवीन अणुशस्त्र स्पर्धेची भीती निर्माण झाली आहे. *(वृत्तसंस्था)*

# पाकिस्तानातील क्रिप्टो वॉलेटमध्ये दहा कोटी हस्तांतरित

**सुरतमधील आरोपीला अटक**

**अहमदाबाद, ९ नोव्हेंबर**

पाकिस्तानमधील क्रिप्टोकरन्सी वॉलेटमध्ये १० कोटी रुपये हस्तांतरित करण्यासाठी सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीला मदत केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी गुजरातच्या सुरतमधील एका रहिवाशाला अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सायबर गुन्ह्यातील पैशांची हेराफेरी करण्यासाठी घोटाळेबाजांकडून वापरल्या जाणाऱ्या बनावट बँक खात्यांबाबत सुरू असलेल्या चौकशीचा एख भाग म्हणून चेतन गंगानीला ताब्यात घेण्यात आले आहे. दुसऱ्यांच्या नावावर असलेल्या जवळपास ९०० खात्यांचा वापर करून दुबई येथील सायबर गुन्हेगारांना २०० कोटी रुपये पाठवल्याच्या आरोपाखाली ३ नोव्हेंबर रोजी मोरबी, सुरेंद्रनगर, सुरत आणि अमरेली जिल्ह्यातून अटक केलेल्या सहा जणांशी आरोपीचे संबंध होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.



गंगानीने अटक केलेल्या सायबर टोळीतील सदस्यांना १० कोटी रुपये क्रिप्टोकरन्सी यूएसडीटी किंवा टेथरमध्ये रूपांतरित करण्यास आणि नंतर ते त्याच्या बिटगेट क्रिप्टो वॉलेटद्वारे चार महिन्यांत पाकिस्तानातील वॉलेटमध्ये पाठवण्यास मदत केली होती, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले. त्याला प्रत्येक यूएसडीटीवर ०.१० टक्के कमिशन मिळाले. त्याला मिळालेल्या एकूण कमिशनबाबतची माहिती पोलिसांनी जाहीर केलेली नाही. *(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# कर्माचा उलटा फेरा

भारताच्या शेजारी यावर्षी फारच नाट्यमय आणि आश्चर्यकारक घटना समोर येत आहेत. ज्यांचा अहिंसा, सहिष्णुता, शांतता, सौहार्द या तत्त्वांशी दूरदूरचा संबंध नाही, असे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान शांतता चर्चेसाठी टेबलावर आले आहेत. आणखी एक मजा म्हणजे हे दोन्ही इस्लामी देश सीमापार दहशतवादाच्या मुद्यावरून एकमेकांशी भिडले आहेत. दोन्ही देश इस्लामिक विचारसरणीवर आधारलेले आहेत आणि आम्ही शरियतनुसार वागतो, असा त्यांचा दावा आहे. २०२१ पर्यंत अफगाणिस्तानचे अधिकृत नाव इस्लामिक रिपब्लिक ऑफ अफगाणिस्तान असे होते. पण, तालिबानने काबुलवर कब्जा मिळविल्यानंतर इस्लामिक एमिरेट ऑफ अफगाणिस्तान, असे नवे नाव धारण केले. पाकिस्ताननेही स्वतःला मुस्लिम देशांचा पाठीराखा म्हणून स्वतःला इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तान, असे अधिकृत नाव धारण केलेले आहेच. धर्म कुठलाही वाईट नसतो. पण नुसते धर्माचे नाव घेतल्याने अथवा एखाद्या देशाचे नामकरण धर्माच्या आधारावर केल्याने सर्व काही सुरळीत होईल आणि नागरिक धर्माचे काटेकोरपणे पालन करतील, असे मुळीच नाही. भारत हिंदू बहुसंख्य देश असूनही भारतीय गणराज्य असे त्याचे नाव आहे. नावात धर्माचा कुठेही उल्लेख नसताना आपल्या देशात लोकशाही व्यवस्था सुखाने नांदत आहे. जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश म्हणून भारत नावारूपास आला आहे. यथा प्रजा, तथा राजा, अशी एक म्हण आहे. काहीही घडले असले तरी अफगाणिस्तान कधीही व्यापक अर्थाने पारतंत्र्यात नव्हता. तेथील जनतेला पारतंत्र्याची सवयच नाही. कधीकाळी कबिल्यांमध्ये राहणाऱ्या अफगाणी जनतेची मध्ययुगीन मानसिकता कायम आहे. धर्मासाठी रक्तपात करण्यास अफगाणी आजही एका पायावर तयार आहेत. ते कुणालाही सोडत नाहीत. ज्यांच्या पोटी ते जन्माला येतात, त्या महिलांनाही ते गुलामासारखे वागवितात. बुरखा पांघरला नाही म्हणून जाहीर फटक्यांची शिक्षा देतात. त्यामुळे दोन्ही शेजारी स्वतःला इस्लामिक देश म्हणवून घेत असले तरी त्यांचे वागणे खऱ्या धर्मानुसार नाही.

आजच्या आधुनिक युगात अफगाणी महिलांना शिक्षण, नोकरीपासून वंचित ठेवण्याचे महापाप आजही तालिबान करीत आहे. अजूनही चार-पाच मुस्लिम देश वगळता तालिबान सरकारला अधिकृत मान्यता मिळालेली नाही. त्यांच्याकडे काहीच नसल्याने गमावण्याची भीतीही नाही. एकीकडे रानटी, अशिक्षित, धर्मवेडा आणि क्रूरतेसाठी प्रसिद्ध असलेला अफगाणिस्तान आणि दुसरीकडे अर्ध्या हळकुंडाने पिवळा झालेला, हिंदुस्थानद्वेषाने पछाडलेला पाकिस्तान यांच्यात गेल्या पाच महिन्यांपासून सीमेवर भांडण सुरू झाले आहे. भांडणाचे कारणही फार मजेशीर आहे. दोन्ही देश हे दहशतवाद्यांसाठी नंदनवन आहे. जगात जेवढ्या काही दहशतवादी संघटना कार्यरत आहेत, अथवा होत्या, त्यापैकी ७५ टक्के या दोन्ही देशांत कार्यरत होत्या. भारतात कारवाया करणाऱ्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानचे सर्वप्रकारचे पाठबळ आहे. विशेषतः १९९० पासून पाकिस्तान भारतविरोधी तत्त्वांना थेट पाठबळ व आश्रय देत आला आहे. आंतरराष्ट्रीय मंचावरून उघडपणे दहशतवादी संघटना आणि त्यांच्या म्होरक्यांना समर्थन देत आला आहे. पाकिस्तानची वाईट नजर केवळ भारतावरच पडली असे नाही; तर नेपाळ, अफगाणिस्तान, शियाबहुल इराण आदी देशांमध्ये दहशतवादी घुसवून अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्नही त्याने केला. अफगाणिस्तानातील तालिबान, हक्कानी गटाला तर पाकिस्ताननेच उभे केले. त्यांना आर्थिक पाठबळ दिले. १९९६ मध्ये जेव्हा अफगाणिस्तानात तालिबान पहिल्यांदा सत्तेत आला, तेव्हा पठाणांचा भारताविरोधात वापर करण्याची खेळी पाकिस्तानने आखली होती. दुर्दैवाने २००१ मध्ये अमेरिकेने तालिबानला सत्तेवरून हाकलल्याने भारताला दिलासा मिळाला. मात्र, काश्मिरातील दहशतवाद्यांना अफगाणिस्तानच्या भूमीवर प्रशिक्षण देण्याचे काम पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि लष्कराने सुरूच ठेवले. ज्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानने पोसले, त्याच संघटना आता पाकिस्तानला घायाळ करीत आहेत. त्यात तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान ही दहशतवादी संघटना सर्वांत पुढे आहे. जेमतेम ३० ते ३५ हजार सदस्य असलेल्या या संघटनेला अल-कायदाने आर्थिक आणि मनुष्यबळाचे पाठबळ दिले. अमेरिकेने २००१ मध्ये अल-कायदाविरोधात मोहीम उघडली. परिणामी, या संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन पाकिस्तानात आश्रयास आला होता. त्याचे साथीदारही सोबत आले. खैबर पख्तूनख्वा, बलुचिस्तान या पाकिस्तानच्या भूभागात या संघटनेने पाय रोवले. पण, अल-कायदाचे दहशतवादी एवढे बेलगाम झाले की त्यांनी पाकिस्तानच्याच नाकात दम आणला. परिणामी त्यांच्याविरोधात लष्करी कारवाई करावी लागली. यामुळे संतप्त झालेल्या बैतुल्लाह मसूदने तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेची २००७ मध्ये स्थापना केली. जो पाकिस्तान टीटीपीची मदत घेऊन काश्मिरात हिंसाचार घडविण्याचे स्वप्न पाहत होता, तोच हल्ल्यांनी रक्तबंबाळ झाला. २०२४ मध्ये टीटीपीच्या हल्ल्यांमध्ये ११०० पाकिस्तानी पोलिस, रेंजर्स आणि सैनिक तर ४००-५०० पेक्षा जास्त सामान्य नागरिक ठार झाले. सततच्या हल्ल्यांमुळे त्रस्त झालेल्या पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करण्याची चूक केली. हल्ल्याने चवताळलेल्या तालिबान्यांनी ९ ऑक्टोबरला थेट पाकिस्तानी चौक्यावर हल्ले केले. पाकिस्तान सरकार तर हादरलेच. ऑपरेशन सिंदूरमध्ये पराभूत झालेला फिल्ड मार्शल आसिम मुनीरच्या पायाखालची वाळू सरकली.

दोन्ही मुस्लिम देशांमध्ये रक्तपात सुरू झाल्याने कतरने हस्तक्षेप करीत संघर्ष थांबविला. दोन्ही देशांमध्ये दोहा येथे पहिली शांतता चर्चा झाली. एकमेकांवर हल्ले न करण्याचा निर्णय इस्लामाबाद-काबुलने घेतला. त्यानंतर तुर्किएच्या इस्तंबुलमध्ये दुसरी शांतता चर्चा झाली. दोघांच्या हातात बंदुका असताना शांतता चर्चेसाठी येणे म्हणजे निव्वळ ढोंग करणे होते. बैठकीत पाकिस्तानच्या तोंडून सीमापार दहशतवाद हा शब्द वारंवार येत होता. शांततेची किंमत भारताच्या शेजाऱ्याला कळू लागली. ज्या सीमापार दहशतवादाने भारतात अस्थितता निर्माण केली, तोच दहशतवाद आता भस्मासुर बनून पाकिस्तानच्याच डोक्यावर हात ठेवू लागला. तेहरीक-ए-तालिबान संघटनेविरोधात कारवाई करण्याचे लेखी आश्वासन इस्लामाबादने मागितले. तथापि, तालिबानने असे कोणतेही आश्वासन देण्यास नकार दिला. याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. चर्चा फिस्कटली. पुन्हा ड्युरंड सीमारेषेवर तोफा, बंदुका धडधडू लागल्या. दोन्ही मुस्लिम देशांनी भांडू नये म्हणून कतर आणि तुर्किए हस्तक्षेप करीत राहिले पण, त्याचा काहीच फायदा झाला नाही. या हस्तक्षेपाचा उद्देशही शुद्ध नाही. तर दोन्ही देश सुन्नी मुस्लिम असल्यामुळे त्यांच्यातील वादाने शिया मुस्लिम देश खूश होऊ नयेत म्हणून कतर, तुर्किएने मध्यस्थी केली. ८ नोव्हेंबरला पुन्हा एकदा इस्तंबुलमध्येच दोन्ही देश एकत्र बसले. इकडे एक दिवस अगोदर इराणला लागून असलेल्या चमन सीमेवर पुन्हा गोळीबार झाला. तिसरी शांतता चर्चाही फिस्कटली. पाकिस्तानने लेखी आश्वासन देण्याची अट अफगाणिस्तानने मान्य केली नाही. दोन दिवस चर्चा चालली; पण काहीच हाती लागले नाही. दिलासा देणारी बाब एकच की, युद्धविराम कायम ठेवण्यावर एकमत झाले.

ज्या भूमिकेत कधीतरी भारत होता, त्याच भूमिकेत आता पाकिस्तान आला आहे. सीमापार दहशतवाद थांबवा, आम्ही संबंध सुरळीत करू, अशी मवाळ भूमिका भारत घेत राहिला; पण पाकिस्तानने त्याचा उलटा अर्थ घेतला आणि सीमापार दहशतवादाला पाठबळ देत राहिला. म्हणतात ना, जीवनात कर्माचा उलटा फेरा येत असतो. ज्या देशाने 'मुस्लिम उम्माह', 'गज्वा-ए-हिंद', 'इस्लामिक स्टेट ऑफ खोरासान'च्या नावावर अफगाणिस्तान, काश्मिरात दहशतवादाची विषाक्त बीजे पेरली, त्याची फळे चाखण्याची वेळ त्या पाकिस्तानवर आली आहे. आणि ज्या देशात हिंदू, शीख, जैन, बौद्ध, मुस्लिम, ज्यू, पारशी हे सारे सुखाने नांदत आहेत आणि ज्याचा 'हे विश्वचि माझे घर', 'वसुधैव कुटुंबकम्'वर दृढविश्वास आहे, नव्हे तो भारतीयांच्या जगण्याचा पाया आहे, असा भारत जगाचा आध्यात्मिक गुरू म्हणून वेगाने उदयास येतो आहे... आणि त्याचे समानधर्मी शेजारी भांडतच आहेत!

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# उद्या निर्णायक दुसरी फेरी!

बिहार विधानसभा निवडणुकीचा पहिला टप्पा आटोपला असून, उद्या ११ नोव्हेंबर रोजी दुसऱ्या व शेवटच्या टप्प्यात १२२ विधानसभा मतदारसंघात मतदान होईल. बिहारमध्ये झालेल्या पहिल्या टप्प्याच्या मतदानात भाजप आघाडी व लालू आघाडी यांच्यात अटीतटीची लढत झाली असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे बिहार विधानसभेचा निकाल प्रामुख्याने दुसऱ्या फेरीच्या निकालावर अवलंबून राहणार आहे. दुसरी फेरी जो जिंकेल, तो या निवडणुकीचा विजेता असेल असे सर्वसाधारणपणे मानले जाते.

**पहिली फेरी** : पहिल्या फेरीत मतदान झालेल्या १२१ मतदारसंघात २०२० मध्ये भाजपने ३२ जागा जिंकल्या होत्या, जनता दल युनायटेडने २३ जागांवर विजय नोंदविला होता, तर विकासशील इन्सान पक्षाने चार जागा काबीज केल्या होत्या. हा पक्ष आता लालू आघाडीत सामील झाला आहे. २०२० मध्ये लालू आघाडीने या १२१ मतदारसंघांपैकी ४२ जागा राष्ट्रीय जनता दलाने, डाव्या आघाडीने ११, तर काँग्रेसने ८ जागा जिंकल्या होत्या. एकप्रकारे काँग्रेस पक्ष पहिल्या फेरीत तरी 'कमजोर कडी' सिद्ध झाला होता

**आता २०२५** : ६ नोव्हेंबर रोजी झालेल्या पहिल्या फेरीत ५७ मतदारसंघांतील उमेदवार जनता दल युचे होते. तर ४८ मतदारसंघांत भाजप उमेदवार उभे होते. तर चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाने १४ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते. लालू आघाडीचा विचार करता राष्ट्रीय जनता दलाने ७३, काँग्रेस २४ व डाव्या पक्षांनी १४ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते. पहिल्या फेरीत उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी व विजय सिन्हा यांनी अनुक्रमे तारापूर व लखसराई मतदारसंघांतून निवडणूक लढविली आहे तर लालू आघाडी म्हणजे महागठबंधन आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे दावेदार तेजस्वी यादव यांनी राघोपूर मतदारसंघांतून निवडणूक लढविली. पहिल्या फेरीत १४ मंत्र्यांचे भाग्यही मतदानयंत्रात सीलबंद झाले आहे.

**दुसरी फेरी** : बिहारमधील दुसऱ्या फेरीच्या मतदानात एकूण १३०२ उमेदवारांचे भाग्य ठरणार आहे. या फेरीत राज्याच्या २० जिल्ह्यांमध्ये मतदान होणार आहे. यात भाजप आघाडीचा वरचष्मा राहत आलेला आहे. २०२५ च्या निवडणुकीत हीच स्थिती कायम राहिल्यास भाजप आघाडीला राज्यात पुन्हा एकदा सत्ता राबविण्याची संधी मिळू शकते. दुसऱ्या फेरीतील मतदारांचा विचार करता या मतदारसंघात पहिल्या फेरीच्या तुलनेत मुस्लिम व यादव मतदारांची संख्या कमी आहे. या दोन्ही समाजातील मतदारांनी पहिल्या फेरीत आपली एकगठ्ठा मते लालू आघाडीच्या पारड्यात टाकली आहेत. दुसऱ्या फेरीतही त्याची पुनरावृत्ती होणार असली तरी पहिल्या फेरीच्या तुलनेत दुसऱ्या फेरीत या समाजांचा प्रभाव तुलनेने कमी असल्याचे मानले जाते.

**मुख्यमंत्री नितीशकुमार** : बिहारमधील निवडणुकीत भाजप आघाडीला मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या चेहऱ्याचा, नावाचा व कामाचा फायदा होत असला तरी स्वतः नितीशकुमार मात्र विधानसभा निवडणूक लढविण्यापासून दूर राहिलेले आहेत. आपल्या राजकीय कारकीर्दीत त्यांनी फक्त तीन वेळा विधानसभा निवडणूक लढविली असून, दोन वेळा ते विजयी झाले आहेत. याउलट लोकसभा निवडणुकीत मात्र त्यांनी सहा वेळा विजय मिळविला आहे. विधानसभा निवडणूक न लढविता, विधानसभा निवडणूक जिंकणारा मुख्यमंत्री अशी त्यांची प्रतिमा तयार झाली आहे- ती यामुळेच.

**केवळ सहा राज्ये** : भारतीय संघराज्यातील केवळ सहा राज्यांमध्ये विधान परिषद नावाची व्यवस्था अस्तित्वात आहे, त्यातील एक म्हणजे बिहार. उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या अन्य पाच राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात असून, या राज्यांतही मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेचा मार्ग चोखाळीत मुख्यमंत्रिपदापर्यंतचा रस्ता पादाक्रांत केला आहे. मात्र सर्वाधिक वेळा विधान परिषदेवर जाऊन, मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा एक प्रकारचा विक्रम जणू नितीशकुमार यांनी प्रस्थापित केला आहे. बिहारचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहणारे नेते असा विक्रम त्यांनी यापूर्वीच नोंदविला आहे आणि यातील विरोधाभास म्हणजे विधान परिषदेवर निर्वाचित होत त्यांनी राज्याची धुरा समर्थपणे सांभाळली आहे.

**राष्ट्रीय प्रभाव** : बिहारच्या निवडणूक निकालांनी नेहमीच राष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले आहे. तसे यावेळीही होईल. बिहारचे निकाल राष्ट्रीय राजकारणाला निश्चितपणे प्रभावित करतील. यात काँग्रेस पक्षाची अग्निपरीक्षा होणार आहे. लालू आघाडीतील पक्षांमध्ये काँग्रेसची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी राहिली आहे. दुसरीकडे जागावाटपात मात्र काँग्रेसने जास्त जागा पटकावल्या आहेत. याचा परिणाम लालू आघाडीत दिसून येतो. राष्ट्रीय जनता दल व काँग्रेस यांच्यातील युतीत कमालीचा तणाव निर्माण होत ती तुटण्याच्या स्थितीत आली होती. शेवटी, राहुल गांधी यांच्या हस्तक्षेपानंतर ती जुळून आली. यावेळी काँग्रेस किती जागा जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बंगालवर परिणाम** : बिहार निवडणुकीचा ताबडतोब होणारा परिणाम बंगालमध्ये दिसणार आहे. बिहार-बंगालचे 'जुळे राजकारण' मानले जाते. मार्च-एप्रिल महिन्यात बंगाल विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे बिहार निकालांचा प्रभाव निश्चितपणे बंगाल निवडणुकीवर होणार आहे.

**बंगालचा बिगुल** : निवडणूक आयोगाने बंगालसह काही राज्यांच्या मतदारयाद्यांची छाननी-तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाच्या कामकाजात ही एक स्वाभाविक प्रक्रिया मानली जाते. आयोगाच्या कामकाजाचा तो एक अविभाज्य भाग असल्याने त्यावर कुणी आक्षेप घेण्याचे कारण नाही. मात्र, बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यावर जोरदार आक्षेप घेत राज्यातील एकाही मतदाराचे नाव मतदारयादीतून वगळले गेल्यास केंद्रातील मोदी सरकार अस्तित्वात राहणार नाही असा इशारा दिला आहे. यासाठी त्यांनी कोलकातात एक मोठा मोर्चा काढला. येणाऱ्या दिवसात निवडणूक आयोग विरुद्ध ममता बॅनर्जी यांच्यातील 'सामना' साऱ्या देशास पाहावयास मिळण्याची चिन्हे आहेत.

**सुधारणा आवश्यक** : राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे निवडणूक आयोगाच्या प्रतिमेला तडे बसत असून, काही लोकांमध्ये आयोगाच्या कामकाजाबाबत संशयाचे वातावरण निर्माण केले जात आहे. हे सारे टाळण्यासाठी सरकार व निवडणूक आयोग यांनी मतदारयाद्या तयार करण्याबाबत काही सुधारणा करणे आवश्यक आहे. यात राष्ट्रीय नागरिकता नोंदणीपुस्तक हा एक सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो. भारतात जन्मास येणाऱ्याचे नाव विशिष्ट कालावधीत या राष्ट्रीय नागरिकता नोंदणीपुस्तकात नोंदविले जावे आणि हे नोंदणीपुस्तकच निवडणूक आयोगाची मतदारयादी म्हणून ओळखले जावे. असे केल्यास स्वतंत्रपणे मतदारयादी तयार करून, त्यात वेळोवेळी सुधारणा, दुरुस्ती करण्याचे काम आयोगास करावे लागणार आहे. यावर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्चही होणार नाही आणि देशाच्या सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या कायदेशीर लढायाही बंद होतील. देशाच्या काही राज्यांतील मतदारयाद्यांमधील काही विसंगती समोर आणल्या जात आहेत. यात काही मानवी चुकाही असू शकतात. पण, त्यामुळे संपूर्ण निवडणूक आयोग, निवडणुकींचे निकाल संशयाच्या सावटाखाली येत आहेत. याला वेळीच आवर घातला पाहिजे, अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया नोंदविली जात आहे.

प्रत्येक देशात राष्ट्रीय नागरिकता नोंदणीपुस्तक ही एक अनिवार्य आवश्यकता मानली जाते. असे असताना ७८ वर्षांनंतरही भारतात ही संकल्पना राबविली गेलेली नाही. येणाऱ्या काळात बंगाल, तामिळनाडू या विरोधी पक्षांच्या राज्यांच्या निवडणुका होणार आहेत. येथे निवडणूक आयोग विरुद्ध राज्य सरकार यांच्यात टोकाचे वाद निर्माण होणार आहेत. हे सारे टाळण्यासाठी आयोग व केंद्र सरकार यांनी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता तयार झाली आहे. आणि हे न झाल्यास निवडणूक निकालांवर प्रश्नचिन्ह निर्माण करून लोकशाहीच्या मूलभूत संकल्पनेलाच आव्हान देण्याचे प्रयत्न होत राहतील आणि त्याचे परिणाम घातक असतील.

## वेध

अनिल फेकरीकर

# मृतदेहांची राखही झाली असुरक्षित!

स्वतःचा फायदा व्हावा याकरिता सोने, पैसा, बकऱ्या, गाई, म्हशी आणि सर्व प्रकारचे साहित्य चोरण्याचे काम चोरांच्या टोळ्या करतात. पण नागपूर जिल्ह्यात उमरेड गावात चक्क दोन मृतदेहांची राख चोरण्याचा अफलातून प्रकार घडला. परिणामी आता मृतदेहांची राखही असुरक्षित झाली की काय असाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसे पाहता मृतदेहांची राख अघोरी विद्या प्राप्तीसाठी केली जाते. पण प्रश्न हा पडतो की, मानवाने चंद्रासह मंगळावर जाण्याचा भीमपराक्रम केला असताना पृथ्वीतलावरील अंधश्रद्धाळू मात्र मृतदेहांची राख चोरून अघोरी विद्येसाठी का धडपडत आहेत. विशेष म्हणजे ही अघोरी विद्या प्राप्त झाल्यावर संबंधित लोक त्याचा सदुपयोग करणार नाही हे शंभर टक्के खरे आहे. ते तर त्या अघोरी विद्येचा दुरुपयोगच करतील, हे शाश्वत सत्य आहे. पण अशा अघोरी विद्येची समाजाला खरोखरच गरज आहे का, याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. तसे पाहता विज्ञानवादी माणूस अंधश्रद्धा, अघोरी विद्येला मान्यता देतच नाही. तरीही मृतदेहांची राख चोरीला गेली हे शाश्वत सत्य नाकारून कसे चालणार आहे. विशेष म्हणजे राख चोरणाऱ्यांना त्यातून युरेनियमचा साठा मिळणार आहे का? मग तरीही त्यांनी जळत्या चितेची राख चोरण्याचे धाडस केले, खरोखरच हा गुन्हा विचित्र आणि पोलिसांकरिता आव्हान ठरला आहे. नागपूर जिल्ह्यातील उमरेड गावात सोमवार ३ नोव्हेंबर २०२५ रोजी एका युवतीचा आणि इसमाचा मृत्यू झाला. त्यांच्यावर स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार पार पडला. दुसऱ्या दिवशी सर्व आप्तस्वकीय त्यांच्या रक्षासह अस्थी गोळा करायला गेले तेव्हा त्यांना तिथे काहीच दिसले नाही. त्या अन्त्यसंस्कार केलेल्या मृतदेहांची राख चोरांनी रातोरात चोरून नेली होती. पोलिसांकडे याविषयी तक्रार झाली. पोलिसांनी तातडीने तपास यंत्रणा कामाला लावली, पण नेमकी राख कोणी नेली याचा उलगडा करता आलेला नाही. यामुळे चोरांनी प्रथमतः स्मशानभूमी आणि परिसराची रेकी केली असावी, त्यानंतर त्यांनी मृतदेहांची राख चोरून नेली. गुन्हेगार गुन्हा करताना काही तरी पुरावे मागे सोडतात असे म्हणतात. पण राख चोरणाऱ्यांनी असले पुरावे सोडलेले नाहीत. मात्र खबऱ्यांना सक्रिय केले तर नक्कीच चोरांचा उलगडा लागणे कठीण नाही. याकरिता पोलिसांसह विज्ञानवादी विचारांच्या सामान्य लोकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. अन्यथा अन्त्यसंस्कारानंतर रक्षा विसर्जनापासून ते दोघेही आयुष्यभर वंचित राहतील, हे मात्र खरे. चोरांनी तर चोरी करून यश संपादन केले, पण ज्यांच्या नातेवाईकांची राख चोरीस गेली त्या लोकांच्या भावनांचे काय? अघोरी विद्येसाठी धडपड करणाऱ्यांनी माणुसकीच्या नात्याने का असेना आप्तस्वकीयांच्या भावनांचा विचार करायला हवा होता. पोटच्या मुलीचा अचानक मृत्यू ही घटना पचविणे कठीण आहे. त्या अवस्थेत तिची राखही चोरांनी चोरल्याने त्या आईवडिलांना काय वाटत असावे, याचाही विचार व्हायला हवा. फक्त स्वतःचा स्वार्थ पूर्ण व्हावा म्हणून चोरांनी मृतदेहांची राख चोरून नेणे एवढ्यापुरता ही घटना मर्यादित नाही. यातून सामाजिक, भावनिक, धार्मिक असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्याची उत्तरे समाजानेच शोधायला हवी.

आपल्या हातून अपराध घडला तर माणूस होतो. मग येथे राख चोरणाऱ्यांना काहीच वाटू नये याचे आश्चर्य वाटते. अघोरी विद्येत एवढीच ताकद असेल तर मग त्याचा वापर पाकिस्तानच्या विरोधात करा ना? तिथे तर भारतीय सैन्यालाच दोन हात करावे लागतात. जिवंतपणी त्या मुलीसह इसमाने यातना भोगल्या. त्यांना मेल्यावर राख विसर्जनानंतर मोक्ष प्राप्तीचाही अधिकार चोरांनी हिसकावून घेतला. हे काही चांगले घडले नाही. ही बाब खटकणारी, संताप आणणारी शिवाय लोकांच्या भावनांचा अनादर करणारीच आहे. पण राखेची चोरी नेमकी कशाकरिता केली, याचा उलगडा व्हायला हवा. जिज्ञासू आणि विज्ञानवादी लोकांची हीच भावना असून, त्याचे खरे रूप समोर आले तरच बरे होईल. समाजानेही आता मृतदेहावर अन्त्यसंस्कार केल्यानंतर आपल्या व्यक्तीच्या राखेची दुसऱ्या दिवशीपर्यंत सुरक्षा करावी. अन्यथा कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अन् भलतेच प्रश्न उद्भवतील.

९८२२४६८६६०

## कानोसा

अमोल पुसदकर

# क्रांती गीत वंदे मातरम्

१८७५ ते २०२५ हा १५० वर्षांचा प्रवास क्रांतिकारकांचे स्फूर्तिगान वंदे मातरम्ने केलेला आहे. बंकिमचंद्र चटर्जी, ज्यांना ऋषी बंकिम असेही म्हणतात, त्यांनी या गीताची रचना केलेली होती. असे म्हणतात की त्यांना दुर्गा देवीच्या प्रतिमेमध्ये भारत मातेचा साक्षात्कार झाला. एका दिव्य आणि दैवी अनुभूतीतून त्यांनी हे गीत लिहिले. संस्कृत आणि बंगाली या दोन भाषांमधील शब्द या गीतामध्ये आहेत. हे गीत म्हणजे मातृभूमीचे वर्णन आहे. या गीतामध्ये भारत मातेला ''त्वम ही दुर्गा दशप्रहरणधारिणी'' म्हटलेले आहे, म्हणजे आपल्या दहा हातांमध्ये शस्त्र धारण करणारी दुर्गा असे भारत मातेला संबोधले आहे. यावरून आपल्या लक्षात येते की कवीची भारत मातेबद्दलची भक्ती देवी स्वरूपातील भक्ती आहे. १८८२ मध्ये त्यांनी लिहिलेल्या आनंदमठ या कादंबरीमध्ये या गीताचा समावेश केला गेला होता. स्वतः गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी एका कार्यक्रमात हे गीत गायले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या त्यावेळच्या जवळपास सर्वच महापुरुषांनी हे गीत म्हटले. हळूहळू सर्वसामान्य जनतेच्या मुखांमध्ये सुद्धा हे गीत पोहोचले. ''वंदे मातरम्'' म्हणजे हे मातृभूमी तुला माझा नमस्कार असो. लाखो लोकांच्या ओठावर ज्या वेळेला ''वंदे मातरम'' हे गीत आरूढ झाले, त्या वेळेला हे गीत नव्हे, हा एक मंत्र बनला. सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये देशभक्तीची भावना जागृत करणारा शब्द म्हणजे ''वंदे मातरम्'' झाला. म्हणूनच इंग्रजांनी या गीतावर बंदी घातली होती. परंतु तरीही ज्या वेळेला आपल्या देशभक्तीचे प्रकटीकरण लोकांना करावेसे वाटायचे, त्या प्रत्येक वेळेस त्यांच्या मुखातून एकच आवाज निघायचा तो म्हणजे ''वंदे मातरम्''.

१९०५ मध्ये इंग्रज सरकारने बंगालचे विभाजन केले होते. तशा पद्धतीचा कायदा सुद्धा संसदेमध्ये पारित करण्यात आला होता. ज्या वेळेला बंगालमधील जनतेने याच्या विरोधात आवाज उठविला, त्या वेळेला जनता निःशस्त्र होती, इंग्रज सशस्त्र होते; जनता संघटित नव्हती, इंग्रज संघटित होते. तरीसुद्धा वंदे मातरम्ची ही किमया होती की लाखो लोक बंगालच्या विभाजनाच्या विरोधात उभे ठाकले. यातूनच स्वदेशीचे आंदोलन जन्माला आले. लोकांनी इंग्रजांचा विरोध म्हणून इंग्रजांच्या सर्वच वस्तूंवर बंदी घातली, बहिष्कार घातला. चप्पल शिवणाऱ्यांनी विदेशी चप्पल शिवायला नकार दिला. पुरोहितांनी विदेशी कपडे घालणाऱ्या वराचे लग्न लावण्यास नकार दिला. धोब्यांनी विदेशी कपडे इस्त्री करण्यासाठी नकार दिला. लोकांनी दुकानांमधील विदेशी मिठाई नाकारली. अशा पद्धतीने वंदे मातरम् हे स्वदेशीच्या अभूतपूर्व आंदोलनाचे कारण बनले. विदेशी कपड्यांच्या होळ्या पेटू लागल्या. लोक जिथे भेटत तिथे एकच साद एकमेकांना घालीत ती म्हणजे ''वंदे मातरम्.'' शेकडो क्रांतिकारकांनी ''वंदे मातरम्''चा जयघोष करीत आपले बलिदान दिले. फाशीच्या फासालासुद्धा त्यांनी हसत हसत आपल्या गळ्यात घातले. शेवटी इंग्रज सरकारला बंगालचे विभाजन रद्द करावे लागले. राष्ट्रवादी शक्तींचा विजय झाला. काँग्रेसच्या एका अधिवेशनामध्ये पंडित विष्णू दिगंबर पलूसकर हे वंदे मातरम्चे गायन करायला उभे राहिले. त्या वेळेस मंचावर उपस्थित असलेल्या मौलाना मोहम्मद अली यांनी त्यांना वंदे मातरम् हे इस्लामच्या विरोधात आहे असे म्हणून विरोध केला. परंतु पंडितजी त्यावर म्हणाले की, वंदे मातरम् हे मातृभूमीला वंदन करणारे गीत आहे, हे कुठल्याही धर्माच्या विरोधात नाही. ही एक कवीची कल्पना आहे, परंतु आता तो राष्ट्रभक्तीचा उत्कट भाव झालेला आहे, त्यामुळे मी हे गीत म्हणणारच. आणि त्यानंतर त्यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने वंदे मातरम् सादर केले.



काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. संसदेमध्ये काही राष्ट्रवादी विचारांचे लोक ''हिंदुस्तान में रहना होगा तो वंदे मातरम् कहना होगा'' अशा पद्धतीच्या घोषणा देत होते. त्यावर सय्यद शहाबुद्दीन म्हणाले होते की, आम्हाला जर तुम्ही वंदे मातरम् म्हणण्याची सक्ती केली तरी आम्ही ते म्हणणार नाही. तुम्ही आम्हाला या देशातून हाकलून दिले तरी जगाच्या पाठीवर अनेक मुस्लिम देश आहेत जिथे आम्ही जाऊ शकतो. परंतु आम्ही जर येथील हिंदूंना या देशातून हाकलून लावले, तर मात्र हिंदूंना संपूर्ण जगामध्ये जाण्यासाठी कुठलाही देश नाही. यावरून आपल्या लक्षात येते की राष्ट्रवादी विचारांच्या लोकांनी संघटित राहणे, एकत्र राहणे व आपला प्रभाव हिंदुस्थानवर कायम ठेवणे आवश्यक आहे. एकेकाळी मौलाना मोहम्मद अली यांनी वंदे मातरम्ला विरोध केला होता. आता ज्या काळामध्ये कधी सय्यद शहाबुद्दीन विरोध करतो, तर कधी विविध राजकीय पक्षांचे नेते विरोध करतात. राष्ट्रभक्ती हा आमचा स्थायीभाव असायला पाहिजे. वंदे मातरम् हा राष्ट्रवादाचा हुंकार आहे. हे क्रांतिकारकांचे क्रांतिगीत आहे. समाज कितीही बदलला, आधुनिकता कितीही आली तरीसुद्धा प्रत्येक पिढीला देशभक्ती शिकवावी लागणार आहे. भारत हा काही जमिनीचा तुकडा नाही, ती एक चैतन्यमय माता आहे, अशा पद्धतीचा भाव होता म्हणूनच क्रांतिकारकांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

देशाच्या स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत जितकी युद्धे भारताने आपल्या सीमांच्या संरक्षणासाठी लढलेली आहेत, त्या सर्वांमध्ये ज्या तरुण सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे, त्यांचा उद्घोष ''वंदे मातरम्'' हाच होता. आमचे जीवन हे क्षणिक आहे, परंतु राष्ट्राचे जीवन हे चिरकालीन आहे. ''आ चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे'' या एकाच कामनेसाठी या शूरवीर सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे. त्यामुळे वंदे मातरम् हा आजही राष्ट्रभक्तीचा मंत्र आहे. या एका शब्दाने लाखो लोकांना प्रेरित करण्याचे कार्य केलेले आहे. भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेटच्या सामन्यामध्ये सुद्धा, ज्या वेळेला हजारो प्रेक्षक जमलेले असतात, त्या वेळेला ते आपल्या भावना प्रकट करण्यासाठी ''भारत माता की जय'' आणि ''वंदे मातरम्'' हाच उद्घोष करीत असतात. ऑपरेशन सिंदूरच्या वेळेला सुद्धा ठिकठिकाणी लोकांनी विजयाचा जो जल्लोष केला, त्याही वेळेला त्यांनी ज्या घोषणा दिल्या त्या ''भारत माता की जय'' आणि ''वंदे मातरम्''च्याच होत्या. काळ बदलला तरी चालेल, तंत्रज्ञानाचा प्रचार झाला तरी चालेल. परंतु त्याग नावाचे जे जीवनमूल्य आहे, मातृभूमीकरिता सर्वस्व समर्पित करण्याची जी भावना आहे, ती भावना वंदे मातरम्ने निश्चितपणे निर्माण होऊ शकते. म्हणून शाळा, महाविद्यालये, कार्यालये, सर्वच ठिकाणी जनतेने वंदे मातरम्चे गायन केले पाहिजे, त्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे, भारत मातेची देवीस्वरूप मूर्ती आपल्या मनामध्ये प्रतिष्ठित केली पाहिजे. अशा पद्धतीने वंदे मातरम्चे १५० वे वर्ष जनतेने साजरे करावे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-३८

सोमवार, १० नोव्हेंबर २०२५

### घडवू मन्वन्तर

घडवू मन्वन्तर मन्वन्तर ॥धृ.॥

सहकार्याचे सुखमय जीवन, ध्यास एक हा पवित्र घेउन
जन अपुलेसे करू निरंतर ॥१॥

अहंकारमय फेकुनि ओझे, करु नित हितकर देशाला जे
हासत क्रमुनी पथ हा खडतर ॥२॥

शुभ आकांक्षा सुफलित करिते, सकल विपत्ती विलया नेते
उदित शक्ति करु ती प्रलयंकर ॥३॥

अभिमानाला देश पारखा, कलह त्यास करि क्षीण सारखा
एकत्वावर प्रगती निर्भर ॥४॥

मात कराया दानवतेवर, ठरती बोथट शब्दांचे शर
त्रिनेत्र उघडो समष्टिशंकर ॥५॥

इतिहासाची नटवू पाने, अति गौरवमय पुरुषार्थाने
या देशाचे आम्ही किंकर ॥६॥

ध्वज भगवा हा विश्वविजेता, घेउनि चाले अपुला नेता
ध्येय दूर ना, थोडे अंतर ॥७॥

## रुफटॉप सोलर बसवताना फसवणूक टाळा

भारत सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेला महाराष्ट्रात खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपलं नागपूर राज्यात सोलर सिस्टिम बाबतीत आघाडीवर आहे. नागपूर जवळच्या बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत सोलर पॅनलचे उत्पादन सुरू झालेले आहे. घरावर सोलर सिस्टिम बसवणाऱ्या व्यक्तींना केंद्र सरकारकडून अनुदान देण्यात येत आहे. भरमसाट वीज बिल भरण्यापासून मुक्ती मिळत असल्याने साहजिकच अनेक नागपूरकर सौर ऊर्जेपासून वीजनिर्मितीचा विचार करत आहेत. शहरातील काही विशिष्ट विक्रेत्यांकडून सोलर सिस्टिम बसवून घेतली तरच अनुदान मिळते. अनेक विक्रेते बनवाबनवी करून ग्राहकांकडून पूर्ण पैसे घेतात आणि सिस्टिम बसवण्यास टाळाटाळ करतात. विक्रेत्यांची विश्वासार्हता, उत्पादनांची गुणवत्ता आणि वॉरंटी तपासणे अत्यावश्यक आहे. आपली फसवणूक झाली असल्यास पीएम सूर्यघर योजनेच्या राष्ट्रीय पोर्टलवर तक्रार दाखल करावी. तक्रारीची ताबडतोब दखल घेऊन आपली समस्या तातडीने सोडवली जाते. ज्यांनी आपल्या घरावर सोलर सिस्टिम लावली आहे अशा व्यक्तींचे योग्य मार्गदर्शन घेतल्यास फसवणूक टाळता येऊ शकते.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## वाचक पत्रे

### तर पूर व पीक नुकसान भरपाईचे प्रमाण कमी होईल

यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. राज्य सरकारने पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी ऑक्टोबर २०२५ या महिन्याच्या सुरुवातीला राज्य सरकारने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले व योग्यवेळी कर्जमाफीची घोषणा केली जाईल असे सांगितले. या पॅकेजच्या वितरणाचा आढावा मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ८००० कोटी रुपयांची आर्थिक मदत पोहोचली आहे. उपरोक्त आकडेवारीचा विचार केल्यास राज्य सरकार शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई बाबत निश्चितच गंभीर असून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहेत असे दिसते. पाऊस आता पूर्वीसारखा १५ जून ते १५ ऑक्टोबर या चार महिन्यांत सारख्या प्रमाणात न पडता तो ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात काही दिवसात अतिवृष्टी स्वरूपात पडतो आहे. आता पाऊस पडण्याचा प्रकार बदलला आहे. कमी वेळात जास्त जोराने पाऊस पडत आहे. त्यामुळे अतिवृष्टी होऊन बऱ्याच क्षेत्रात पूर येणे व पिकांचे नुकसान होत असल्याचे आढळून येते. निसर्गाच्या लहरीपणामुळे सरकारला शेतकऱ्यांना कोटी- कोटी रुपयांची आर्थिक मदत करावी लागत आहे. आपण निसर्गाच्या प्रक्रियेला थांबवू शकत नाही हे जरी खरे असले तरी, हा नुकसान भरपाईचा दरवर्षी होणारा शासनाचा खर्च कमी करू शकतो. यासाठी जलतंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक आहे. पाऊस पडला की त्या पावसाच्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होणे गरजेचे आहे. पाणी हे नेहमी उताराकडे वाहते हे आपणास ठावूक आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राचे योग्य सर्वेक्षण करून त्या त्या क्षेत्राचा उतार कोणत्या बाजूला आहे हे आपण सर्वेक्षणावरून ठरवू शकतो. प्रत्येक शेतासाठी व क्षेत्रासाठी पाणी निचरा नाल्या खोदणे आवश्यक आहे. शेताचे क्षेत्रफळ, शेतात येणाऱ्या पाण्याचे पाणलोट क्षेत्र व येणाऱ्या पाण्याचे प्रमाण याचा योग्य हिशेब करून त्यानुसार शेताच्या बाजूला योग्य लांबी, रुंदी व उंचीच्या नाल्या बांधल्या पाहिजेत. गोसीखुर्द मोठ्या पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी, त्या धरणाच्या १०७ कि.मी. लांबीच्या उजव्या मुख्य कालव्यातून चंद्रपूर जिल्ह्यातील असोलामेंढा या तलावाच्या पाणीसाठ्यात वाढ करून सिंचन क्षेत्रात वाढ आपण करीत आहोत. या धर्तीवर प्रत्येक क्षेत्राचे सर्वेक्षण करून पाण्याचा निचरा करणे आवश्यक आहे. तसेच शक्य तिथे सिमेंटचे चेक डॅम बांधून पाणीसाठ्यात वाढ व पूर नियंत्रित होऊ शकतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### पूर्व विभाग विणकर बागेत 'वंदे मातरम् एकात्मतेचे सामूहिक गीत

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

दयानंद नगर परिसरातील पूर्व विभाग विणकर बाग कन्ना चौक येथे वंदे मातरम् एकात्मतेचा सामूहिक गान कार्यक्रम' मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी साप्ताहिक विवेक मंचचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत पांडुरंग धोंडे पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या बौद्धिक भाषणातून युवकांमध्ये राष्ट्रभावना आणि एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रमात 'वंदे मातरम' गायनाचे नेतृत्व योगीनाथ हणमंत बिराजदार यांनी केले. देशभक्तीने ओथंबलेल्या स्वरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमात परिसरातील विविध सामाजिक संस्था, वॉकिंग ग्रुप, योगा समूह यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी चंद्रकांत जक्कन, आनंद गोसकी, व्यंकटेश केंची, अशोक संकलेचा, ज्ञानेश्वर मंकल व सामाजिक कार्यकर्ते म्हणून सत्यनारायण पसनूर, अनिल धुळम, गणेश सिद्धम, राजू कटकम, पुरुषोत्तम दुस्सा, नरसप्पा इंदापुरे, सतीश पारेली, राकेशचंद्र केसरवाणी, शिवप्रकाश चव्हाण, गणेश गुज्जा, शंकर कनकी, दत्तात्रय बोडा, राजू सीलम उपस्थित होते.



### सोशल महाविद्यालयात उर्दू दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सोलापूर सोशल असोसिएशन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या उर्दू विभागाने जागतिक उर्दू दिनाचे आयोजन केले होते. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचे संचालक इक्बाल बागबान आणि उर्दू आणि फारसी तज्ज्ञ शिक्षक, प्रा. डॉ. अब्दुल रशीद शेख हे या बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी हे होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी अर्शिया शेख यांनी पवित्र कुराण पठण करून केली. त्यानंतर उर्दू विभागाचे उपविभागप्रमुख प्रा. डॉ. गौस अहमद शेख यांनी कार्यक्रमाचे स्वरूप आणि उद्दिष्टे स्पष्ट केले.प्रास्ताविक भाषणानंतर प्र. प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. डॉ. अब्दुल रशीद शेख यांनी आंतरराष्ट्रीय उर्दू दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, आजचा हा दिवस जगभरात ज्येष्ठ कवी डॉ. अल्लामा इक्बाल यांच्या जयंती म्हणून साजरा केला जातो. त्यांनी अल्लामा इक्बाल यांच्या या कवितेने आपल्या भाषणाची सुरुवात केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. तांबोळी यांनी केले. प्रा. डॉ. गौस अहमद शेख यांनी तयार केलेली उर्दू पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आले आणि निबंध लेखन स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली. डॉ. कादीर बिजापुरे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार डॉ. तस्नीम वड्डू यांनी केले.



### वंदे मातरम'च्या १५०व्या वर्षपूर्तीनिमित्त सोलापूर विद्यापीठात सामूहिक गायन

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत स्फूर्तीचे प्रतीक ठरलेल्या 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताला यंदा १५० वर्षे पूर्ण झाली. या ऐतिहासिक प्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आज सामूहिक गीतगायनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, वित्त व लेखाधिकारी सीए. महादेव खराडे, तसेच परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले. सुरुवातीला सर्व उपस्थितांनी एकत्र येऊन वंदे मातरमचे सामूहिक गायन केले.

### सार्वजनिक मुतारी पाडल्याने नागरिकांची गैरसोय

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

गेल्या अनेक वर्षापासून उत्तर कसबा येथील सार्वजनिक मुतारी पाडल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. पूर्ववत येथे मुतारीची सोय करण्यात यावी, अशी मागणी शिवनेरी प्रतिष्ठानच्या वतीने निवेदनाद्वारे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे केली आहे. या ठिकाणी असलेली मुतारी महापालिकेने अचानक पाडली आहे. वास्तविक पाहता या परिसरातील नागरिकांना व व्यापाऱ्यांना या मुतारीची आवश्यकता आहे. यामुळे ही मुतारीची सोय पूर्ववत करावी, असे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, महापालिका झोन कार्यालयाकडून या मुतारीचे पाडकाम झाले आहे. याबाबतचा ठराव करण्यात आला होता. या परिसरात जवळच मुतारी आहे. लवकरच या परिसरात ई टॉयलेटही बसविण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.निवेदन देतेवेळी अध्यक्ष सुशीलकुमार अमनूर यांच्यासह परिसरातील व्यापारी व नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' : फडणवीस

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ९ नोव्हेंबर-**



भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स म हिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी व्यक्त केला.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकार्याने या कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ. उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते. यावेळी फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. तरुणांच्या स्वप्नांना पंख देण्याची सरकार आणि विद्यापीठांची भूमिका असून राज्य शासन प्रत्येक टप्प्यावर नवउद्योजकांना साहाय्य करीत आहे. आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकॉनॉमी बनला असून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात महिला उद्योजकांनी विकसित केलेल्या नवकल्पनेचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी वैद्यकीय, कृषी आणि वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट तीन स्टार्टअप कल्पनांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्री इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू प्रा.डॉ. उज्वला चक्रदेव यांनी प्रास्ताविक केले.

## जुना बोरामणी नाका चौकात बल्करखाली सापडून एकाचा मृत्यू

**रविवारी दुपारची घटना**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर -**

रस्ता क्रॉस करीत असताना एका पादचाऱ्याच्या दोन्ही पायावरून सिमेंट वाहतुकीचा बल्कर ट्रक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. हा पादचारी ६० वर्षीय असून त्याची ओळख पटली नाही. ही घटना रविवारी दुपारी दोनच्या सुमारास सोलापूर हैद्राबाद रोडवर,बोरामणी नाका जवळील गांगजी शोरुम समोर घडली. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसांत दाखल करण्यात आली.

६० वर्षीय व्यक्ती रविवार दुपारी दोनच्या सुमारास जुना बोरामणी नाका, गांगजी शोरुम समोर दुभाजकाजवळ रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या सिमेंट वाहतुकीचा ट्रक (एमएच १२ एनएक्स ३४७३) ने समोरून धडक दिली. धडक दिल्यावर पादचारी ट्रकच्या सम ोरील चाकाखाली आला. ट्रकची चाके त्या व्यक्तीच्या दोन्ही पायावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याचा जागीच मृत्यू झाला होता. रक्ताच्या थारोळ्यात बेशुध्द आवस्थेत पडला होता. या घटनेची माहिती जेलरोड पोलिसांना देण्यात आली. पोलिस हवालदार दगडू राठोड यांनी सदर व्यक्तीस दुपारी सव्वा दोनच्या सुमारास सिव्हिल रुग्णालयात दाखल केले, तो उपचारापूर्वीच मयत झाला होता. याची खबर डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी दिली होती. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. रात्री उशिरापर्यंत मयत व्यक्तीची ओळख पटली नव्हती अशी माहिती पोलिसांनी दिली.

## भांडणाच्या कारणावरून दोन गटात मारहाण

**परस्परविरोधी सहा जणांवर गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर -**

भांडणाचा राग मनात धरून दोन गटात लाकूड, लोखंडी रॉडने मारहाण झाली. या प्रकरणी परस्पर विरोधी सहा जणांवर जेलरोड पोलिसांत गुन्हा दाखल झाला. ही घटना साईबाबा चौकात घडली.

सुनिल भीमाशंकर पुजारी (वय २१, रा. साईबाबा चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कुमार बंदपट्टे, सागर पवार, अभिजित माने (सर्व रा. साईबाबा चौक, सोलापूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर सागर भीमराव पवार (वय २६, रा न्यू झोपडपट्टी,साईबाबा चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुनिल पुजारी, संदिप बंदपट्टे, दिलीप उर्फ अब्बू शिवाजी बंदपट्टे (रा. न्यू झोपडपट्टी, साईबाबा चौक) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पहिल्या घटनेत सुनिल पुजारी हे घराजवळ उभा होते. आरोपी त्याच्या जवळ गेले, मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ, लाथाबुक्यांनी मारहाण केली लाकडाने डोक्यात मारून जखमी केले. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी साईबाबा चौकात घडली.

दुसऱ्या घटनेत सागर पवार याचा चुलत भाऊ दत्ता पवार याच्या मोबाइलवर फोन आला. सागर व कुमार यांना घेवून साईबाबा चौका या. काल झालेली भांडणे मिटवून घे असे म्हणाल्याने फिर्यादी व कुमार से मळून नमूद ठिकाणी गेले होते. त्यावेळी सुनिल, संदीप व दिलीप सदर ठिकाणी होते. संदीप पुजारी याने शिवीगाळ करीत जीवंत सोडायचे नाही असे म्हणून हातातील लोखंडी रॉडने डोक्यात मारून फिर्यादीस जखमी केले, इतर अरोपींनी मारहाण केले, जखमी करून करून निघून गेलेत. अशी नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. म हिला सहायक पोलिस निरीक्षक भांबिष्ठे आणि हवालदार किवडे तपास करीत आहेत.

## विद्यार्थ्यांनी शाळेत येताना व जाताना दक्ष राहावे

- **सपोनि गोकूळ ठाकूर**
- **सरस्वती विद्यालयात विद्यार्थी सुरक्षितता अन् सायबर गुन्ह्यावर केले मार्गदर्शन**

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**



प्रत्येक शाळेच्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी गावापासून शाळेपर्यंत येताना आणि जाताना प्रत्येक गोष्टींसाठी कायम दक्ष राहावे, असे आवाहन तामलवाडी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गोकूळ ठाकूर यांनी केले.

तामलवाडी (ता. तुळजापूर) येथील सरस्वती विद्यालयात विद्यार्थी सुरक्षितता आणि सायबर गुन्ह्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सुरक्षा पथक एपीआय अमृता पटाईत, पिंक पथक मपोना रोहिणी धुमाळ, पोहेकॉ. सोनाली जाधव, बिट अंमलदार राठोड, पोलीस हवालदार वैशाली कोरे, पोलीस अंमलदार हनुमंत कोरे, गोपनीय अंमलदार सुरवर, उदय पवार तसेच प्राचार्य सुहास वडणे, पर्यवेक्षक महादेव मसुते आदी उपस्थित होते.

ठाकूर म्हणाले की, मोबाईलमुळे विविध पद्धतीचे गुन्हे होऊ शकतात, यासाठी मोबाईलचा वापर फक्त शैक्षणिक घटकासाठी अवघा १५ मिनिटेच केला पाहिजे. मोबाईल पाहण्यात वेळ घालविण्यापेक्षा तो वेळ विद्यार्थ्यांनी अभ्यासात कारणी लावावा. इतकेच कायतर विद्यार्थ्यांनी गावापासून शाळेपर्यंत येताना किती दक्ष राहिले पाहिजे, याचीही माहिती दिली. थोडा जरी अनुचित प्रकार घडला असेल तर विद्यार्थ्यांनी लगेच शिक्षकांना सांगितले पाहिजे. कारण थोड्याशा अनुचित प्रकाराने मोठा अनर्थ जीवनात होऊ शकतो.

वाहतूक सुरक्षाचे पीएसआय जाकीर पटेल यांनी वाहतुकीविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य वडणे यांनीही मिार्गदर्शन केले. सूत्रसंचालन योगेश राऊत यांनी केले तर आभार स्वामी यांनी मानले.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पोक्सोसह ॲट्रॉसिटीचा गुन्हा**

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर -**


लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यावर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात पोक्सोसह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत मुलीच्या फिर्यादीवरुन राज सोमनाथ पवार (रा. संजय नगर झोपडपट्टी, वैराग, ता. बार्शी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत मुलगी आणि राज पवार यांची ओळख आहे. दिवाळीमध्ये राज पवार याने पिडीत मुलीला मोबाईल दिला होता. ७ नोव्हेंबर रोजी रात्री राज याने पिडीत मुलीला फोन करून भेटण्यास बोलाविले होते. त्यावेळी पिडीतेने नकार दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी भेटण्याचे ठरले होते. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी आठच्या सुमारास पिडीता ही रुपाभवानी येथे आली असता राज पवार हाएक्टीव दुचाकीवर आला व त्याने पिडीतेला दुचाकीवरून जुना बोरामणी नाक्याजवळील एका खोलीमध्ये नेले. तिथे पिडीतेला आपण लवकरच लग्न करायचे आहे असे म्हणून तिच्याशी शरीरसंबंध केले. त्यानंतर राज याने पिडीतेला आपण पळून जाऊन लग्न करू, तु कोणाला काही सांगू नको असे म्हणून दुचाकीवरून पिडीतेला सोडून दिले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात पोक्सो व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त प्रताप पोमण पुढील तपास करीत आहेत.

## ११ हजार जैन श्रावकांची एकाच दिवशी रेल्वेने सम्मेद शिखरजी यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

श्री भारतवर्षीय दिगंबर जैन यात्रा संघ दिल्ली यांच्याद्वारे १४ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत संपूर्ण भारतातील प्रमुख शहरांमधून जैन समाजासाठी अद्वितीय ऐतिहासिक अशा १२ वी सम्मेद शिखरजी तीर्थवंदना यात्रेचे आयोजन दिल्लीचे पवनजी जैन गोधा दिल्ली यांच्या नेतृत्वाम ध्ये भव्य स्तरावर केले आहे. पहाड वंदना करण्यासाठी संपूर्ण भारतामधून ११ हजार जैन श्रावक श्राविका एकाच दिवशी रेल्वेने जाणार आहेत.

जैन धर्मातील २४ तीर्थंकर पैकी २० तीर्थंकरांची निर्वाण कल्याणकाने पावन व पवित्र झालेली भूमी शाश्वत तीर्थराज श्री सम्मेद शिखरजीला १५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत सम्मेद शिखरजी येथील गुनायतन येथे विद्यासागर जी म हामुनीराज यांच्या संघातील ५७ त्यागीच्या सानिध्यात सम्मेद शिखरजी विधान होणार



असून ५ लकी ड्रॉ काढण्यात येणार आहेत. यामध्ये विमलजी पाटोदी इंदौर यांच्या वतीने पाच सोन्याचे शिक्के भेट देण्यात येणार आहेत. रविवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी गिरीराज सम्मेद शिखरजी सामूहिक वंदना असेल तर सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध भजन सम्राट रुपेशजी जैन इंदोर यांच्या भक्ती संगीत कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी पवनजी बबीताजी पाटोदी जयपूर निवासी यांच्यावतीने ५ सोन्याचे शिक्के लकी ड्रॉ पद्धतीने भेट देण्यात येणार आहेत. दिनांक १७ नोव्हेंबर रोजी संपूर्ण मंदिर दर्शन परिक्रमा होणार आहे. या सर्व यात्रेतील यात्रेकरूंना आयोजकांतर्फे सात्विक भोजनाची व राहण्याची उत्तम व्यवस्था केलेली आहे. तसेच गेल्या पन्नास वर्षात ज्यांनी प्रथमच सम्यक शिखरजीची तीर्थवंदना केलेली आहे त्यांना आयोजकांतर्फे १ चांदीचा शिक्का भेट देण्यात येणार आहे. या भव्य यात्रेचे आयोजन संयोजक गोधा यांच्यासह सोना सुनीता राकेशजी जैन, पियुषजी जैन, विजयजी जैन चांदीवाले, मुकेशजी पाटोदी, वीरेंद्रजी जैन, सुमितजी शाह, महावीरजी कासलीवाल, जीनराजजी डालमिया, आर. के. जैन, चमनलालजी जैन, गौरवजी जैन, अमितजी जैन, राजेशजी जैन व ज्ञानजी काला इत्यादी दानशूरांनी सुयोग्य नियोजन केले आहे.

## पालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचा प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी घेतला पदभार



**अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारीपदी मल्हारी माने हे आज रुजू झाले. येथील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला.

सोलापूर महापालिका प्राथमि क शिक्षण मंडळाला अनेक वर्षानंतर अखेर पूर्णवेळ प्रशासन अधिकारी लाभला असून नूतन प्रशासन अधिकारीपदी धाराशिव येथील शिक्षण विस्तार अधिकारी मल्हारी माने यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली. शुक्रवारी दुपारी सोलापूर शिक्षण मंडळ कार्यालयात ते रुजू झाले.

येथील अतिरिक्त कार्यभार माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांच्याकडे होता. यावेळी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळातील मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, भगवान मुंढे, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, धाराशिव जिल्हा परिषदचे अभियंता सुजित गरड, संगणक प्रोग्रामर घोडके, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंग अंजीखाणे, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, अमोल गायकवाड, ज्ञानेश्वर गरड, लक्ष्मण पुजारी, सौदागर वाघमारे, भालचंद्र साखरे, नाशिर खान, सचिन साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.



## ठोकळ प्रशालेत करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

विद्यार्थ्यांना पुढील जीवनात कोणत्या क्षेत्रामध्ये करीअर घडवावे, भावी जीवनामध्ये उदरनिर्वाहासाठी काय करावे त्याचाच भाग म्हणून श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर मार्फत विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना डॉक्टर श्रद्धा तिवारी यांनी सध्याच्या स्पर्धेच्या युगात आपण कोणती भूमिका घेतली पाहिजे, कोणत्या क्षेत्रामध्ये करीअर केल्यानंतर आपले आयुष्य सुखकारक होईल, पुढील आयुष्य जगताना काय करावे लागेल, आपल्या जीवनामध्ये करीअर का महत्वाचे आहे.

करिअर मार्गदर्शनासाठी प्राचार्य श्री. डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी यशस्वी होण्यासाठी प्रा. रोहित होटकर, प्रा. अमोल घनाते, प्रा. स्वप्निल माने, प्रा. अतुल बुनगे, प्रा. पुंडलिक झिरवळ, प्रा. वैशाली पवार, प्रा. कावेरी खजूरकर, प्रा. राणी राऊत आदींनी परिश्रम घेतले. आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी शाळेचे कौतुक केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जागतिक नेमबाजी स्पर्धेत अनिश भानवालाला रौप्य

**कैरो** : इजिप्तमधील कैरो येथे सुरू असलेल्या जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या भारताच्या अनिश भानवालाने पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक जिंकले. त्याने या स्पर्धेत देशाचे पाचवे पदक निश्चित केले.२३ वर्षीय या खेळाडूने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत आपले पहिले वैयक्तिक पदक जिंकताना चार शूट-ऑफमध्ये विजय मिळवला. आठ मालिकांच्या शेवटी भारतीय खेळाडूने २८ गुणांसह अंतिम फेरी गाठली, जी सुवर्णपदक विजेत्या क्लेमेंट बेसागेट (फ्रान्स) च्या २९ गुणांपेक्षा थोडी मागे आहे. युरेनच्या मॅक्सिम होरोडिनेट्सने २५ गुणांसह कांस्यपदक जिंकले. भानवालाने पात्रता फेरी गाठताना दुसरे स्थान मिळविले. या वर्षाच्या सुरुवातीला भानवालाने कझाकस्तानमधील श्यामकेंट येथे झालेल्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेतही रौप्यपदक जिंकले होते.

### अभय शर्मा लखनौ संघाचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक होणार

**नवी दिल्ली** : भारताच्या १९ वर्षांखालील संघाचे माजी क्षेत्ररक्षण प्रशिक्षक अभय शर्मा यांची २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगसाठी लखनौ सुपर जायण्ट्स संघाच्या क्षेत्ररक्षण प्रशिक्षकपदी नियुक्ती होण्याची शक्यता आहे. शर्मा यांची नवीनतम नियुक्ती युगांडा राष्ट्रीय संघासोबत होती आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून ते २०२४ मध्ये संघाच्या पहिल्या विश्वचषक मोहिमेचा भाग होते. ५६ वर्षीय खेळाडूने भारतीय महिला क्रिकेट संघाचेही प्रशिक्षकपद भूषवले आहे. पहिल्या दोन हंगामात प्ले-ऑफमध्ये स्थान मिळविल्यानंतर लखनौ संघ गत दोन आवृत्त्यांमध्ये सातव्या स्थानावर राहिले. फ्रॅन्चायझीने अलीकडेच टॉम मूडी यांना क्रिकेट संचालक म्हणून घोषित केले आणि न्यूझीलंडचे महान खेळाडू केन विल्यमसन यांनी त्यांचे धोरणात्मक संचालक म्हणून नियुक्त केले. अभय यांना आघाडीच्या भारतीय क्रिकेटपटूंसोबत काम करण्याचा व्यापक अनुभव आहे आणि ते लखनौ सुपर जायण्ट्स संघासाठी पडेल, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले. या माजी प्रथम श्रेणी क्रिकेटपटूने अंडर-१९ स्तरावर पंत, शुभमन गिल, अर्शदीप सिंग, ध्रुव जुरेल, आवेश खान, यशस्वी जयस्वाल यांच्यासोबत काम केले आहे. २०१६, २०१८ आणि २०२० मध्ये झालेल्या विश्वचषक स्पर्धेत ते भारताच्या १९ वर्षाखालील संघाचा सपोर्ट स्टाफचा भाग होते. अभयने बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्येही काम केले आहे. मुख्य प्रशिक्षक म्हणून, युगांडा ही त्याची पहिली जबाबदारी होती आणि २०२४ मध्ये अमेरिकेत होणाऱ्या विश्वचषकापूर्वी त्याची नियुक्ती करण्यात आली होती.

### न्यूझीलंडची वेस्ट इंडीजवर ९ धावांनी मात

**नेल्सन** : रविवारी येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात काइल जेमिसनने शानदार शेवटच्या षटकांत केलेल्या कामगिरीच्या बळावर न्यूझीलंडने वेस्ट इंडीजवर ९ धावांनी विजय मिळवला. न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे आणि गुरुवारी दुसऱ्या सामन्यात जेमिसनने शेवटचा षटकही टाकला होताव तो सामना न्यूझीलंडने तीन धावांनी जिंकला. वेस्ट इंडीजने पहिला सामना सात धावांनी जिंकला आणि तिन्ही सामने शेवटच्या षटकात निकाली निघाले. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना केवळ ९ बाद १७७ धावा काढल्या, परंतु सॅक्सटन ओव्हल येथे झालेल्या १३ व्या षटकात वेस्ट इंडीजचा संघ ८८ धावांत गारद झाला.

# विदर्भाची सामन्यावर मजबूत पकड

### रणजी करंडक क्रिकेट गौरव फार्डेचे २ बळी

◆ **नागपूर, ९ नोव्हेंबर**

व्हीसीए जामठा स्टेडियमवर सुरु असलेल्या रणजी करंडक क्रिकेट एलिट अ गटाच्या ओडिशाविरुद्धच्या सामन्यात दुसऱ्या दिवशी ध्रुव शोरीच्या (१४४) दमदार शतकाच्या बळावर विदर्भाने पहिल्या डावात ११८.४ षटकांत सर्वबाद २८६ धावा काढल्या. प्रत्युत्तर देताना ओडिशाची दिवस अखेर पहिल्या डावांत ६ बाद १२२ धावा अशी स्थिती करून विदर्भाने सामन्यावर आपली पकड मजबूत केली. ओडिशा अजून १६४ धावांनी पिछाडीवर आहे.


गौरव फार्डे

विदर्भाने ५ बाद २३४ धावांवरून पुढे आपल्या दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. कालचा नाबाद शतकवीर ध्रुव शोरीने आज १६ धावांची भर घातली व तो बादल बिस्वालच्या गोलंदाजीत सामलकडून झेलबाद झाला. ध्रुव शोरीने २९८ चेंडूंचा सामना करत ११ चौकार व एका षट्कारसह १४४ धावांची आकर्षक खेळी केली. त्याने कर्णधार अक्षय वाडकरसोबत सहाव्या गड्यासाठी ३२ धावांची भागीदारी केली. पुढे वाडकरने संघमित्रांच्या साथीने विदर्भाला २८६ धावांचा टप्पा गाठून दिला.

ओडिशाकडून संबित बरलने ३ बळी, राजेश मोहंती, तपस दास व बादल बिस्वालने प्रत्येकी २ बळी टिपले, तर मोहपात्राने एक बळी मिळविला.

प्रत्युत्तर देताना ओडिशा संघाची दाणादाण उडाली, त्यांनी ३७.२ षटकांत ८५ धावा काढत चार महत्त्वपूर्ण फलंदाज गमावले. पदार्पणात गौरव फार्डेने २ बळी टिपले. फार्डेने कर्णधार सुब्रांशु सेनापती (४१) व गोविंद पोद्दारला (१७) बाद केले. नचिकेत भुतेने सलामीवीर गौरव चौधरीचा (२४) त्रिफळा उडविला. पार्थ रेखडे, प्रफुल्ल हिंगे व कदमने प्रत्येकी एक बळी टिपले. (वृत्तसंस्था)

# वॉशिंग्टन सुंदर इम्पॅक्ट प्लेअर ऑफ द सिरीज

◆ **ब्रिस्बेन, ९ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियामध्ये भारताने २-१ ने जिंकलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेत वॉशिंग्टन सुंदरला इम्पॅक्ट प्लेअर ऑफ द सिरीज म्हणून घोषित करण्यात आले.

ड्रेसिंग रुममध्ये टीम ऑपरेशन्स मॅनेजर राहिल खाजा यांनी सुंदरला पुरस्कार प्रदान केला. बीसीसीआयने या क्षणाचा व्हिडीओ रविवारी समाजमाध्यमात सामायिक केला.

सुंदरच्या मालिकेतील कामगिरीने भारताच्या टी-२० मालिकेतील एक उपयुक्त खेळाडू म्हणून त्याचे महत्त्व स्पष्ट झाले. हा सन्मान मिळताच वॉशिंग्टन सुंदरची भारताच्या सर्वात अष्टपैलू खेळाडूंपैकी एक म्हणून आपली प्रतिष्ठा अधिक वाढली.

ऑस्ट्रेलियामध्ये खेळण्याची संधी मिळणे आश्चर्यकारक आहे आणि संघाच्या विजयात योगदान देणे मला निश्चितच आनंदी करते, असे २६ वर्षीय वॉशिंग्टन सुंदरने पदक स्वीकारल्यानंतर म्हटले.

होबार्ट येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात, जरी त्याला गोलंदाज म्हणून वापरण्यात आले नाही, तरी सुंदरला वरच्या क्रमात बढती देण्यात आली आणि त्याने २३ चेंडूत ४९ धावा करत सामना जिंकून देणाऱ्या सर्वाधिक धावा केल्या, त्यात चार षट्कार आणि तीन चौकार मारले आणि भारताला पाच गड्यांनी विजय मिळवून दिला आणि मालिका १-१ अशी बरोबरी साधली.

त्यानंतर चौथ्या सामन्यात त्याला डेथ ओव्हर्सपर्यंत चेंडू रोखून धरण्यात आले, परंतु दोन षटकांत पाच चेंडूत तीन बळी घेतल्या आणि ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला आणि भारताचा ४८ धावांनी विजय झाला.


वॉशिंग्टन सुंदरला पदक प्रदान करताना राहिल खाजा

शनिवारी गाब्बा येथे पाचवा सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघाने मालिका २-१ अशी जिंकली. सुंदरने संघाचे सीओओ खाजाचे योगदान देखील मान्य केले.

त्यांच्याकडून हे पदक मिळणे ही खूप छान भावना आहे. तो (खाज) दररोज कोणत्या प्रकारची मेहनत घेतो हे आम्हाला माहिती आहे जेणेकरून आमची अनेक कामे खूप सोपी होतील, असे तो म्हणाला.

सुंदरचा ५७ सामन्यांमधील एकूण टी-२० रेकॉर्ड प्रभावी आहे. त्याची गोलंदाजीची सरासरी २२ पेक्षा थोडी जास्त आहे, इकॉनॉमी सातपेक्षा कमी आहे आणि फलंदाजीचा स्ट्राइक रेट १३४ पेक्षा जास्त आहे.

सर्व फॉरमॅटमधील खेळाडू म्हणून, तो कसोटीत टीम इंडियासाठी उपयुक्तता खेळाडू देखील आहे, त्याने १५ सामन्यांमध्ये तीन चार आणि एक पाच बळींसह ३५ बळी घेतले आहेत. त्याच्याकडे एक शतक आणि पाच अर्धशतके आहेत, तर सरासरी ४४.७६ आहे.

इम्पॅक्ट प्लेअर-ऑफ-द-सीरीज हा बीसीसीआयने द्विपक्षीय मालिकेत निर्णायक योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी सुरू केलेला नवीन सन्मान आहे. ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मागील एकदिवसीय मालिकेत, भारतीय दिग्गज रोहित शर्मालाही हाच पुरस्कार मिळाला होता. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र मुष्टियुद्ध संघटनेच्या अध्यक्षपदी प्रवीण दरेकर

### अकोल्याचे संग्राम गावंडे यांची उपाध्यक्षपदी निवड

◆ **मुंबई, ९ नोव्हेंबर**

महाराष्ट्र मुष्टियुद्ध संघटनेच्या अध्यक्षपदी भाजपाचे नेते व आमदार प्रवीण दरेकर यांची बहुमतांनी निवड झाली. जय कवळी व प्रवीण दरेकर यांच्या गटाचे २९ पैकी २९ म्हणजे सर्वच उमेदवार विजयी झाले आहेत. महाराष्ट्र मुष्टियुद्ध संघटनेच्या रविवारी निवडणूक प्रक्रिया पार पडली. यात प्रवीण दरेकरांनी बाजी मारली आहे. अकोला येथील संग्राम गावंडे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे, ते माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांचे सुपुत्र आहे.

महाराष्ट्र मुष्टियुद्ध संघटनेची वार्षिक निवडणूक रविवारी धर्मादाय आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई येथे पार पडली. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया धर्मादाय आयुक्त तथा निवडणूक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली झाली आहे. या निवडणुकीत अध्यक्ष, १६ उपाध्यक्ष, महासचिव, खजिनदार, कार्यकारी सचिव, व्यवस्थापकीय सदस्य आणि विभागीय सचिव या महत्त्वाच्या पदांसाठी निवड प्रक्रिया झाली आहे.


प्रवीण दरेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना संग्राम गावंडे,

दरम्यान, कोषाध्यक्ष पदासाठी नाशिकचे ॲड मनोज पिंगळे हे बिनविरोध निवडून आले आहेत. विभागीय सचिव या पदासाठी एकूण आठ जागा असून त्यापैकी सहा उमेदवार बिनविरोध विजयी ठरले आहेत. त्यात नाशिकचे मयूर बोरसे, कोल्हापूरचे मंगेश कराळे, लातूरचे ॲड संपत साळुंखे, छत्रपती संभाजीनगरचे अरुण भोसले, पुण्याचे विजयकुमार यादव आणि अमरावतीचे विजय गोटे यांचा समावेश आहे.

अध्यक्षपदासाठी प्रवीण दरेकर आणि रणजीत सावरकर यांच्यात थेट लढत होती, यात दरेकर यांनी बाजी मारली. महासचिव पदासाठी भरतकुमार व्हावळ आणि राकेश तिवारी यांच्यात निवडणूक झाली. कार्यकारी सचिव या पदासाठी शैलेश ठाकूर, सविता बावनथडे आणि प्रशासकीय सचिव पदासाठी महेश सकपाळ व नीलम पाटील यांच्यात लढत झाली. उपाध्यक्ष पदासाठी एकूण २३ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात पंकज भारसाखळे, मुन्ना कुरणे, मिलिंद साळुंके, तुषार रंधे, अविनाश बागवे, संग्राम गावंडे, गौतम चाबुकस्वार, गौरव चांडक, राजेश देसाई, शेख गफ्फार अकबर, वैभव वनकर, संतोष आंबेकर, विक्रांत खेडकर, नील पाटील, शाहुराज बिराजदार, अरुण बुटे, जयप्रकाशप दुबळे, अमर भंडारवार, नीलम पाटील, गोपाल देवांग, राजाराम दळवी, विजय सोनावणे यांच्यात लढत झाली.

नवीन कार्यकारिणीवर राज्यातील मुष्टियुद्ध खेळाचा विकास, स्पर्धांचे नियोजन, खेळाडूंना प्रशिक्षण सुविधा, जिल्हा-अंतरराष्ट्रीय स्पर्धांतील सहभाग आणि धोरणात्मक नियोजनाची मोठी जबाबदारी असणार आहे. (वृत्तसंस्था)



# संगमेश्वर कॉलेजला विजेतेपद

### पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

पुणे विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांनी १९ वर्षांखालील गटात विजेतेपद पटकाविले. सांगोला येथे झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी पुणे ग्रामीण संघाचा एकतर्फी पराभव केला.

**विजेता संघ** : कर्णधार सैफुल्लाह बरकत अली सय्यद, इझान परवेझ खान, जुबेर अन्वर हुसेन अडकी, अरमान असिफ मुजावर, एमडी अल्तमश अब्दुल जब्बार शेख, यशस वीरेश कटगेरी, उमेरजिलानी तांबोळी, अक्षय शैलेंद्रसिंह कैय्यावाले, नीरज रमेश हेम गड्डी, मुद्दसर मो.सलीम सय्यद, ओम सूरेश देवकांबळे, रेहान अस्लम अत्तार.

संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ.आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



# रुद्र-टीएसकेएच्या ॲथलिटसना 3 रौप्य व 1 कांस्य

### पाचव्या पश्चिम विभागीय कराटे स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

कराटे इंडिया ऑर्गनायझेशन ''किओ'' या राष्ट्रीय संघटनेच्या मान्यतेने कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ''काम'' यांचेतर्फे नाशिक येथे झालेल्या पश्चिम विभागीय कराटे स्पर्धेत महाराष्ट्र संघातील येथील ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशन आणि रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट्स व योग शिवस्मारक या संस्थेच्या कराटे ॲथलिटसनी तीन रौप्य व एक कास्य पदके जिंकली. या कामगिरीवर त्यांनी गोवा येथे १ व २ डिसेंबर रोजी होणा-या आंतर विभागीय राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी वेस्ट झोन संघात स्थान प्राप्त केले.

संगमेश्वर वरिष्ठ महाविद्यालयात बीसीए विभागात शिकणा-या संकेत धन्नाईक याने सिनिअर गटात गुजरात व मध्य प्रदेशच्या प्रतिस्पर्धी सोबत खेळून व २१ वर्षा खालील ५५ किलोखालील वजनगटात गुजरात, दमण व दीव या राज्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना हरवून कुमिते प्रकारात दोन्ही गटात प्रत्येकी एकेक रौप्य पदके पटकावली. संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील आर्या यादव हिने ५३किलो खालील ज्युनिअर मुलींच्या वजनगटात महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, दमण व दीव तसेच गुजरातच्या प्रतिस्पर्धींशी लढत देऊन कुमिते प्रकारात रौप्य पदक जिंकले. तर सिद्धेश्वर इंग्लिश मेडियम स्कूलच्या तन्मय बाहेरवाडे याने कॅडेट गटात गोवा व गुजरातच्या प्रतिस्पर्ध्यांना हरवून कास्यची कमाई केली.

यांना एशियन कराटे मेडलिस्ट भुवनेश्वरी व नॅशनल रेफ्री मिहिर जाधव यांनी वर्ल्ड कराटे फेडरेशनच्या गुणांकन व नियमावली नुसार नवी पेठेतील शिवस्मारक येथे प्रशिक्षण दिले आहे. कामचे महासचिव संदीप गाडे, कोषाध्यक्ष संदीप वाकचौरे, डब्लूकेएफ रेफ्रीज अनुप देठे, शाहीन मॅडम व रवी सूर्यवंशी तसेच रुद्रच्या संचालिका रेन्शी संगीता सुरेश जाधव यांनी पदक विजेते संकेत, आर्या, तन्मय व सहभागी समिहान कुलकर्णी (संगमेश्वर कॉलेज), तेजस तुरेराव (गांधीनाथा रंगजी) तसेच अक्षिता कुलकर्णी (एम पी एस) यांचे अभिनंदन केले आहे.



# 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्राप्त क्रीडा शिक्षक सतीश कदम यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

श्री अर्धनारी नटेश्वर जेष्ठ नागरिक संघटना, वेळापूर यांच्या तर्फे इंग्लिश स्कूल, वेळापूर येथील क्रीडा शिक्षक सतीश कदम यांना सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघांच्या वतीने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्राप्त झाला असून, त्यांच्या या यशाबद्दल संघटनेतर्फे त्यांचा गौरव करण्यात आला.

संघटनेचे उपाध्यक्ष एकनाथ राऊत यांच्या हस्ते सतीश कदम यांचा शाल, हार व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी संघटनेचे अध्यक्षा रतन काकुळे, उपाध्यक्ष एकनाथ राऊत, सचिव हणमंत मेलगे, तसेच राऊत सर, जोशी सर, आडत, कृपाळ गुरुजी, रसूल आतार (मामा), साळुंखे, पिसे, शिंदे, माने सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव हणमंत मेलगे यांनी केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हणमंत मेलगे यांनी केले. एकनाथ राऊत यांनी आभार मानले.

# क्रिकेटपटूंच्या मनोबल वृद्धिसाठी योगाभ्यासाचा आरंभ

### सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचा ऐतिहासिक निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

महाराष्ट्रात प्रथमच योग प्रशिक्षण आयोजित सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे सर्व क्रिकेटपटूंच्या मानसिक व भावनिक खंबीरतेसाठी योगाभ्यास सुरु करण्याचा निर्णय सर्व पदाधिका-यांतर्फे एकमताने घेण्यात आला.

या निर्णयाला अनुसरुन रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्टस व योग संस्थेच्या प्रधान संचालिका तसेच पु.अ.हो. विद्यापीठाच्या आरोग्यशास्त्र संकुलातील 'योग' विषयातील पदव्युत्तर पदवीधारक आणि गीतापरिवारच्या सर्व कल्याण योग विभाग प्रमुख योगाचार्या संगीता सुरेश जाधव यांना नुकतेच असोसिएशन तर्फे आमंत्रित करण्यात आले. आरंभिक चर्चेनुसार क्रिकेटपटूंना क्रमशः टप्प्या टप्प्याने योगतंत्रे शिकवण्याचे ठरले असून सुरुवातीला चौदा वर्षाखालील मुलांच्या संघाला व्यवस्थापक निलेश गायकवाड व पालकांच्या उपस्थितीत तत्काल प्रारंभिक योग प्रशिक्षण देण्यात आले.

संपूर्ण महाराष्ट्रात प्रथमच सोलापूर क्रिकेट असोसिएशनने हे पाऊल पहिल्यांदा उचलले असून त्यासाठी जिल्हा सचिव चंद्रकांत रेंबर्सू व १४ वर्षाखालील सिलेक्शन कमिटी चेअरमन राजेंद्र गोटे यांची एमसीएच्या वतीने व डिस्ट्रिक्ट चेअरमन रणजितसिंह मोहिते- पाटील, व्हा. चेअरमन श्रीकांत मोरे, अध्यक्ष दिलीप माने, संयुक्त सचिव खासदार धैर्यशील मोहिते पाटील व उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख, खजिनदार संतोष बडवे यांचेतर्फे प्रशंसा करण्यात आली आहे.



#### प्रारंभिक प्रशिक्षण

अतिशय वेगाने पण ठाम निर्णयाने आयोजित प्रारंभिक योग सत्रामधे सुरुवातीला जिल्हा सचिव चंद्रकांत रेंबर्सू व टुर्नामेंट कमिटी चेअरमन संजय वडजे यांनी संगीता सुरेश जाधव यांचे स्वागत केले. गोटे सरांनी परिचय करुन देत, एकाग्रता संदर्भात काही ऐतिहासिक प्रसंग सांगून विषयाचे प्रास्ताविक केले.

#### आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यानाच्या प्रारंभिक योगतंत्रांनी आरंभ

युद्ध व योगाचार्या संगीतादीदींनी मार्गदर्शन करताना कोणतीही शारीरिक क्रिया करण्यापूर्वी मन व बुद्धीला का प्रशिक्षित करावे लागते , हे सोप्या भाषेत समजावून सांगून योगाभ्यासाचे महत्व परस्पर संवादातून विशद करत स्नायूंच्या लवचिकतेसाठी काही आवश्यक योग आसने करवून घेतली. त्यानंतर रक्ताभिसरण व प्राणक्रीयेचे विवेचन करत शास्त्रोक्त दीर्घश्वसन क्रीया करवून घेतली. यानंतर सौम्य व तीव्र भस्त्रिका शिकवून भ्रामरी गुंजन तसेच ॐ कार नादध्वनिचे महत्त्व स्पष्ट करत कमीत कमी जागेत व कमी वेळात धारणेतून ध्यानाचा सराव करत या योगतंत्रांचा तत्काल अधिकाधिक लाभ कसा करवून घ्यायचा याचे प्रशिक्षण दिले.



**खेळाडूंच्या मनोबल व बुद्धीच्या सुयोग्य क्रीयान्वयासाठी योगाभ्यासाचे फायदे**

१. मानसिक व भावनिक स्थिरता व एकाग्रतेसाठी
२. चंचलता नष्ट करुन तत्काल व योग्य निर्णय घेण्यासाठी
३. प्रसंगावधान राखून चिंता सोडून झटपट हालचाल करण्यासाठी
४. नैराश्य दूर करुन उत्साह वाढविण्यासाठी तसेच आळस झटकून अधिक आत्म विश्वासाने कियान्वित होण्यासाठी
५. भय, शीघ्रकोप पळवून लावून , शरीरांतर्गत ऊर्जा वाढवून त्वरित एकाग्रता साधून अधिक वेळ सक्रीय राहण्यासाठी

सदर योगतंत्रं व प्रगत अभ्यास खेळाडूंना संतुलित, सफल व विजयी होण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो, असा अनुभव अनेक खेळाडूंसह कराटेपटूंना गेल्या पाच वर्षात शहर ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारत जिंकण्यासाठी व भारत देशाचे नाव जागतिक क्रमवारीत उच्चस्थानी पोहोचवण्यासाठी तसेच हार जीत प्रसंगी मनाला नियंत्रणात ठेवण्यासाठी आला असल्याचे कराटेपटू भुवनेश्वरी व अन्य खेळाडूंची उदाहरणं देत संगीता जाधव यांनी क्रिकेटपटूंच्या मनावर योगाभ्यासाचे महत्व बिंबवले.

**भावी योजना- प्रज्ञासंवर्धन**

ब्रह्मलीन योग व युद्धाचार्य सुरेश जाधव यांनी चाळीस वर्षांच्या अनुभव व योग साधनेतून 'सर्व कल्याण योग - स्काय' अंतर्गत तयार केलेला प्रज्ञासंवर्धन योग हा कमीत कमी वेळेत मन व बुद्धी संवर्धन तसेच ज्ञानेंद्रियांची क्षमता वाढविणारा प्रगत प्राणायाम अभ्यास लवकरच सर्व वयोगटातील क्रिकेटपटूंना शिकवणार असल्याचे व महाराष्ट्रात प्रथमच असे मनाचे सामर्थ्य वाढविणारे योग प्रशिक्षण योग साधक मिहिर व संगीता जाधव यांच्या सहयोगाने देणार असल्याचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सू यांनी याप्रसंगी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

सोमवार, १० नोव्हेंबर २०२५



## महत्वाचे...



### स्वामी समर्थ मंदिर समितीतर्फे माजी सभापती संजय पाटील-घाटणेकर यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ९ नोव्हेंबर-**

श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेले अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे स्वामींचे वास्तव्य असलेले जागृत स्थान आहे. स्वामी समर्थांच्या भक्तीतून अनेक भाविकांना विविध माध्यमातून स्वामींच्या आशीर्वादाची प्रचिती येत आहे. भाविकांसाठी वटवृक्ष मंदीरात स्वामी दर्शनाची व्यवस्था उत्कृष्ट पध्दतीची असल्याचे मनोगत भारतीय जनता पार्टीचे नेते तथा सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय पाटील-घाटणेकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास सपत्नीक भेट देवून श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी संजय पाटील-घाटणेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी संजय पाटील-घाटणेकर बोलत होते. पुढे बोलताना संजय पाटील-घाटणेकर यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीची सेवा म्हणजे उल्लेखनीय बाब असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, रणजित जाधव, आदित्य पाटील, प्रसाद सोनार, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, विपुल जाधव, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.



### राधेकृष्ण मंडळाच्या श्रीमद्‌भगवतगीता ज्ञान स्पर्धेतील सहभागींना बक्षिसाचे वितरण

**बार्शी, दि. ९ नोव्हेंबर-**

राज्यस्तरीय श्रीमद भगवतगीता ज्ञान स्पर्धेचे बार्शी तालुकास्तरीय बक्षीस वितरण समारंभ श्रीकृष्ण मंदिर येथे संपन्न झाला. राधेकृष्ण बहुउद्देशीय मंडळाच्यावतीने मुलासाठी श्रीमद भगवतगीतेचे महत्व समजावे तसेच मन एकाग्र करुन मुलांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्यस्तरीय श्रीमद भगवतगीता स्पर्धेचे आयोजन केले जाते. यंदाचे मंडळाचे परीक्षा आयोजनाचे बारावे वर्ष आहे. कार्यक्रमांचे अध्यक्ष वसंतराव मुंढे, माजी शिक्षणाधिकारी यांच्या उपस्थितीत झाला. प्रमुख पाहुणे अतुल पाडे, सचिव हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, गणेश गोडसे, पत्रकार, राधेकृष्ण मंडळाचे मार्गदर्शक उत्तमराव पोतदार या सर्वांच्या हस्ते विजेत्यांना प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी वंदना कुलकर्णी यांनी श्रीमद भगवदगीतेबद्दल माहिती दिली. गीता वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. गणेश गोडसे यांनी सध्याची सामाजिक परिस्थिती दररोज वेगवेगळ्या विषयावर बातम्या वाचतो. त्यामध्ये राधेकृष्ण मंडळानी स्तुत्य असा श्रीमद भगवतगीता परीक्षेचे आयोजन करुन मुलांमध्ये चांगले बदल घडवत आहेत त्याबद्दल मंडळाचे कौतुकही केले. अतुल पाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना, विजेत्यांना प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. राधेकृष्ण मंडळाच्या कार्यात सहकार्य करणारे सुरभी संस्कृत क्लासच्या संचालिका वंदना कुलकर्णी यांचाही सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मंडळाचे अध्यक्ष उदयकुमार पोतदार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहिणी पोतदार, उल्हास पोतदार, रवीराज तुंगतकर यांनी मदत केली. आभार उदयकुमार पोतदार यांनी मानले.

# कार्तिकीत ३५ हजार भाविकांवर उपचार; आयसीयू सेंटर ठरले रुग्णांचे जीवनदाते

- सर्व रूग्णांवर उपजिल्हा रुग्णालयात केले उपचार
- डॉ. दिपक धोत्रे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ नोव्हेंबर-**

राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्तिकी यात्रा कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतुन व उपजिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातुन शहराच्या विविध भागात स्थापित केलेल्या सहा आयसीयु सेंटर आणि उपजिल्हा रुग्णालय येथे सुमारे ३५ हजारहुन अधिक रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ.दिपक धोत्रे यांनी दिली.



कार्तिकी यात्रा दि. २६ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीमध्ये राज्याचे आरोग्य विभागाचे संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, पुणे विभागाचे संचालक डॉ. विजय कंदेवाड, पुणे परिमंडळाचे उपसंचालक डॉ.भगवान पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा डोईफोडे, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चंद्रकांत क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली ६५ एकर, वाळवंट-१, वाळवंट-२, पत्रा शेड, दर्शन मंडप, या शहरातील गर्दीच्या ५ ठिकाणी व उपजिल्हा रुग्णालय पंढरपुर येथे असे एकुण ६ आयसीयु सेंटर स्थापन करण्यात आले होते.वारी कालावधीत स्थापित करण्यात आलेल्या आयसीयु सेंटर मध्ये १२७ गंभीर रुग्णांना उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर यशस्वी उपचार करुन त्यांना डिस्चार्ज देण्यात आले.यामध्ये उपजिल्हा रुग्णालय येथील आयसीयु सेंटरमध्ये पुरुष ११, व स्त्री ५ अशा तब्बल १६ गंभीर रुग्णांना दाखल करुन त्यांच्यावर उपचार करण्यात आले. तसेच विविध इतर आजारांच्या ४२८ रुग्णांना उपचाराकरीता दाखल करुन त्यांच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले.या शिवाय रुग्णालयाच्या प्रत्येक विभागात पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. रुग्णालयात आलेल्या रुग्ण व नातेवाईकांना परिपुर्ण व उत्कृष्ठ आरोग्य सेवा देण्याकरीता सर्व वैद्यकिय अधिकारी, सहा. अधिसेविका, परिसेविका अधिपरिचारीका, पॅरामेडीकल स्टाफ, व वर्ग ४ कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

**बुडालेल्या भाविकाचे वाचविले प्राण :** वाळवंट व नदी पात्रात तैनात असलेल्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने नदीत बुडालेल्या कर्नाटक येथील रुद्राप्पा गोलार (वय ४५) या इसमास रेस्क्यु करुन बेशुध्द अवस्थेत उपजिल्हा रुग्णालय पंढरपुर येथे संदर्भित केले. नोडल अधिकारी यांना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी कळविले. त्यानुसार उपजिल्हा रुग्णालय पंढरपुर येथील आयसीयु मध्ये बेशुध्द व श्वास बंद असलेल्य अवस्थेत तातडीने दाखल करुन घेतले. फिजीशीयन डॉ. संग्राम गायकवाड, डॉ. सीमा इंगोले यांनी योग्य उपचार सुरु केले व रुग्णास जीवदान दिले.

**हार्ट ॲटॅकचे त्वरीत निदान :** पासष्ठ एकर येथील आयसीयु मध्ये विश्वंभर कारपुरे (वय ६०) रा. भुम या भाविकास हार्ट टॅकचे निदान करण्यात आले व तातडीने आवश्यक उपचार करुन शासनाच्या स्टेमी प्रोजेक्ट अंतर्गत लाईफलाईन हॉस्पीटल येथे पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले. तसेच स्टेमी प्रोजेक्ट अंतर्गत हदयविकाराच्या इतर ७ रुग्णांवरती या रुग्णालयात मोफत उपचार चालु आहेत.

**फिट्स व शुध्द हरपलेल्या रुग्णाचे वाचविले प्राण :** उपजिल्हा रुग्णालय पंढरपुर येथे शिवाजी शामराव निंबाळकर (वय ५०) मु.पो आमरवाडी जिल्हा कोल्हापुर या रुग्णास वाळवंटात अचानक फिट्स व शुध्द हरपणे अशी लक्षणे असल्याने व रुग्ण बेशुध्द अवस्थेत त्याला तात्काळ उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक उपचार केल्यानंतर रुग्ण शुध्दीवर आला. तीन दिवसानंतर रुग्ण संपूर्णपणे बरा करुन रुग्णास घरी पाठविण्यात आले.

**सर्पदंश झालेल्या चार रुग्णांवर उपचार :** यात्रा कालावधीत एक हजार ७८४ हुन अधिक रुग्णांच्या रक्त, लघवी इत्यादी तपासण्या करण्यात आल्या ४१९ रुग्णांचे एक्स रे, २५६ रुग्णांचे सी.टी स्कॅन करण्यात आले. तर २१४ रुग्णांचे ईसीजी करण्यात आले तसेच ४ सर्पदंश झालेल्या रुग्णांवर उपचार करण्यात आले अशी माहिती नोडल अधिकारी डॉ. प्रसन्न भातलवंडे यांनी दिली.

## टेंभुर्णीत वकिलासह पाच जणांविरुध्द पोस्कोअंतर्गत गुन्हा

**तालुक्यात खळबळ; संशयित अरोपी फरार, तपासासाठी पोलीस पथक रवाना**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि.९ नोव्हेंबर-**

माढा तालुक्यातील पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरी करून अत्याचार केलेले चित्रीकरण सोशल मीडियावर करतो म्हणून अत्याचार करणारे दोघे त्यांना साथ देणारा संशयित अजिंक्य संगीतराव यांचेसह पाच जणांविरुद्ध पोस्को आणि ॲट्रोसीटी अंतर्गत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

संशयित निखील सुधीर लांडगे (रा. दहिवली ता. माढा), संशयित अमोल धनाजी गरड, (रा. उपळवाटे ता. माढा), संशयित शाहिद बाबा मुलाणी (रा. उपळवाटे ता. माढा), संशयित ॲड. अजिंक्य संगीतराव (रा. टेंभुर्णी), संशयित तात्या शामराव जगताप (रा. दहिवली ता. माढा) या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार उपळवाटे (ता.माढा) येथील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर २० सप्टेंबर २०२५ रोजी संशयित आरोपी निखील लांडगे व शाहीद मुलाणी यांनी बळजबरीने शाररीक संबंध करून त्याचा त्याचे मोबाईलमध्ये व्हिडीओ काढला. तसेच जर कोणाला काही सांगीतले तर तुझा व्हिडीओ व्हायरल करेन अशी धमकी देत मारहाण केली व कोणाला सांगितले तर जीवे मारण्याची धमकी दिली. मात्र यानंतर अजिंक्य संगीतराव असल्याचे निखीलकडून मला समजले. ॲड. अजिंक्य संगीतराव याने व्हिडीओ कॉलमध्ये मी वकील आहे, आपल्या पाठीमागे मोठे नेते आहेत, मी तुला काही होवू देणार नाही असे म्हणत मला तु घरी काही सांगायचे नाही, नाहीतर तुमचे काही खरे नाही अशी धमकी दिली. यावेळी ७ नोव्हेंबर २०२५ रोजी टेंभुर्णी येथून बाजार घेवून उपळवाटेकडे स्कुटीवरून जाताना दहिवली ओढ्यापाशी संध्याकाळी ८ चे सुमारास पांढ-या रंगाच्या क्रेटा गाडी (एम एच ४५ ए झेड ०५५५) हि आडवी लावून त्यातून संशयित निखील लांडगे व त्याचे सोबत ॲड. अजिंक्य संगीतराव व तात्या जगताप खाली उतरले.

निखील, अजिंक्य संगीतराव व तात्या जगताप यांनी मला तु निखील चे का ऐकत नाही असे म्हणून अजिंक्य संगीतराव त्यातील तात्या जगताप, निखीलने शरीरास झोंबाझोंबी केली. संगीतराव याने जातीवाचक शिवीगाळ करीत तुला सांगीतलेले कळत नाही का, असे बोलून माझे सोबत लज्जास्पद बोलले यावरून टेंभुर्णी पोलीस ठाण्यात संशयित आरोपी निखील सुधीर लांडगे (रा. दहिवली ता. माढा),अमोल धनाजी गरड (रा. उपळवाटे ता माढा), शाहिद बाबा मुलाणी (रा. उपळवाटे ता माढा), ॲड. अजिंक्य संगीतराव (रा. टेंभुर्णी) तात्या शामराव जगताप (रा. दहिवली ता. माढा) या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सर्व आरोपी पसार झाले असून त्यांना पकडण्यासाठी पोलिस पथक रवाना झाले आहे.

### होटगी स्टेशन येथे जखमी अवस्थेत मिळून आलेल्या तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

होटगी रेल्वे स्टेशनजवळ जखमी अवस्थेत मिळून आलेल्या तरूणाचा मृत्यू झाला.रेवणसिध्द सुभाष वावरे (वय ३३, रा. होटगी स्टेशन, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. ८ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास होटगी रेल्वे स्टेशन येथभल नागोबा मंदीरजवळ रेवणसिध्द वावरे हा बेवारस व जखमी अवस्थेत पडल्याचे रेल्वे स्टेशनचे मास्तर यांनी सोलापूर लोहमार्ग पोलिसांना कळविले.

त्यामुळे लोहमार्ग पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार एम ए शेख यांनी वावरे यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरु असताना ९ नोव्हेंबर रेजी साडेसातच्या सुमारास वावरे याचा मृत्यू झाल्याचे डॉ. कृष्णप्रिया यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.९ नोव्हेंबर-**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सव फत्तेसिंह मैदान येथे संपन्न झाला. नायब तहसीलदार दत्तात्रय गायकवाड अध्यक्षपदी होते. भारतमाता प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन आयएमसी अध्यक्ष राजशेखर हिपरगी, आयएमसी सदस्य कमलाकर सोनकांबळे यासह मान्यवराच्या हस्ते करण्यात आले.

शिल्पनिदेशिका रेणुका गवल यांनी प्रास्तविक केले. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कौशल्य विद्यापीठ कौशल्य विकास केंद्रांमध्ये भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिन साजरा करण्यात आला. वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांकडून लघु नाटिका सादर करण्यात आली. नायब तहसीलदार गायकवाड यांनी वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सवाबद्दल महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली. सदर महोत्सवाचे मुख्य वक्ते अभिजीत लोके यांनी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी लिहिलेले वंदे मातरम हे गीत अत्यंत प्रेरणादायी असून त्याचे अवलोकन प्रत्येक नागरिकांनी केले पाहिजे असे प्रतिपादन केले. वंदे मातरम गीताचे समूह गायन करण्यात आले.

महोत्सवाकरिता संस्थेचे प्राचार्य मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. गटनिदेशक गणेश काशीद यांचे संयोजनाखाली महोत्सव घेण्यात आला. शिल्प निदेशक वाघमारे यांनी आभार मानले. आयएमसी अध्यक्ष राजशेखर हिपरगी, आयएमसी सदस्य कमलाकर सोनकांबळे, चनशेटी, काळे, साळुंखे, खेडगी कॉलेजचे हिंदोळे, अर्जुन होटकर व संस्थेतील शिल्प निदेशक नदाफ मंटाळे, बगले, लिंबे, बोंगाळे, स्वामी, कोनापुरे, बिराजदार खंदारे, सोनंद, लोटे, मेजर क्षीरसागर, पाटील, मेजर अस्वले यांनी परिश्रम घेतले.

### डीसीबीएम परीक्षेत सांगोला येथील सरस्वती पंडित उत्तीर्ण

**सांगोला, दि. ९ नोव्हेंबर-**

सांगोला येथील सरस्वती पंडित यांनी सहकार क्षेत्रात आवश्यक असणारी डिप्लोमा इन को-ऑपरेटिव्ह बिझनेस मॅनेजमेंट ही पदवी विशेष प्राविण्यसह प्राप्त केली. सदर परीक्षेसाठी देशभरातून को-ऑपरेटिव्ह सेक्टर मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



त्यात सोलापूर जिल्ह्यातून एकमेव व्यक्ती उत्तीर्ण झाली आहे. सदरची परीक्षा केंद्रीय सहकार विभाग यांचेवतीने वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, पुणे येथे घेण्यात आली होती. या प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा होता. सदर परीक्षा लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीन विभागात विभागली गेली होती. त्यांच्या या यशाबद्दल श्री.विठ्ठल मल्टीस्टेटचे सर्व कर्मचारी व चेअरमन यांच्याकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## मंगळवेढ्यात ४ हजार ७४१ बाधीत

**शेतकऱ्यांचे केवायसी अभावी अनुदान लटकले**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.९ नोव्हेंबर-**

मंगळवेढा तालुक्यातील ४ हजार ७४१ बाधीत शेतकर्यांनी अद्यापही केवायसी पुर्ण न केल्याने त्यांचे अनुदान मध्येच लटकते राहिले असून सदर शेतकर्यांनी तात्काळ केवायसी पुर्ण करुन घ्यावी असे आवाहन महसूल प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

यंदा पावसाळी हंगामात ऑगस्ट महिन्यात झालेला सततचा पाऊस तर सप्टेंबर मध्ये झालेली अतिवृष्टी यामुळे हाता तोंडास आलेल्या खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने बळीराजाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. दरम्यान शासनाने शेतकर्यांचे झालेले नुकसान लक्षात घेवून नुकसानग्रस्त शेतकर्यांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला असून त्या प्रमाणे महसूल प्रशासन व कृषी विभाग यांच्या संयुक्त पथकाने शेतावर जावून पिकांची पाहणी करुन नुकसानीचे पंचनामे केले. नुकसानग्रस्त शेतकर्यांनी फार्मर आयडी करणे, केवायसी पुर्ण करणे आदी महत्वाचे असून सध्यमितीला ४ हजार ७४१ शेतकऱ्यांनी केवायसी पूर्ण न केल्यामुळे त्यांचे अनुदान मध्येच लटकले आहे.



केवायसी पुर्ण झाल्याशिवाय शासनाचे अनुदान खात्यावर जाणार नसल्याचे सांगण्यात आले. सदर शेतकर्यांनी ऑनलाईन केंद्रात अथवा संबंधीत सजेच्या तलाठ्याशी संपर्क साधून केवायसी पुर्ण करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे ५९ हजार ७३० शेतकऱ्यांचे ४२ हजार २४२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे जिल्हा प्रशासनास कळविले आहे. दरम्यान ३६ हजार ८६१ शेतकर्यांचे फॉर्म अपलोड करण्यात आलेले आहेत. झालेल्या नुकसानीपोटी ३८ कोटी ५१ लाख ७६ हजार एवढी मागणी करण्यात आली असून आजअखेर ३० हजार ५८७ शेतकऱ्यांच्या ३१ कोटी ४६ लाख २७ हजार १३२ एवढी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली असल्याचे सांगण्यात आले.

### नानासाहेब देशमुख यांचे निधन

**भाजपा शहराध्यक्ष रोहिणी देशमुख यांना पितृशोक**

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

कस्तुरबा भाजी मंडईचे माजी अध्यक्ष, टिळक चौक गणेशोत्सव मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते तथा भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांचे वडील नानासाहेब देशमुख (वय ९५) यांचे शनिवारी रात्री वृध्दापकाळाने निधन झाले. रविवार, दि. ९ रोजी त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, ५ मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी व मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, माजी आ. दिलीप माने, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, जयदीप माने, माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांच्यासह बाजार समिती पदाधिकारी, भाजपा पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नानासाहेब देशमुख हे लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. यानंतर त्यांनी भारतीय जनता पार्टीचेही कार्य केले. पहिल्या संघबंदीत त्यांनी कारावासही भोगला. जुन्या काळातील विज्ञान शाखेचे ते पदवीधर असुनही भाजीपाला आडत व शेती व्यवसायाला त्यांनी प्राधान्य दिले. विरभद्र शक्ती पुजा मंडळ तसेच महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे देखील त्यांनी काम पाहिले. अनेक कुस्ती फडात त्यांनी पंच म्हणून काम पाहिले होते.



### विठ्ठल शिरसीकर यांचे निधन

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

येथील निवृत्त बँक अधिकारी व प्रसिध्द ज्योतिषाचार्य विठ्ठल रामचंद्र शिरसीकर (वय-७१) यांचे शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी हृदयविकाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा सून, मुलगी जावई, नातवंडे, दोन भाऊ, भावजयी असा परिवार आहे. येथील कर सल्लागार ॲड. अभिषेक शिरसीकर यांचे ते वडील होत.



## तब्बल ५० वर्षांनी एकत्र आले शालेय विद्यार्थी मित्र

**श्रीपूर येथे १९७६ मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.९ नोव्हेंबर-**

श्रीपूर (ता. माळशिरस येथील सन १९७६ सालातील इयत्ता १० वी बॅचचे मित्र-मैत्रिणी तब्बल ५० वर्षानी एकत्र आले. अर्थातच एवढ्या प्रदीर्घ काळाने भेटत असलेल्या मित्र-मैत्रिणी एकमेकांना आलिंगन देताना सद्गदीत झाले होते.



श्रीपूर मधील भाऊसाहेब कुलकर्णी, शौकत शेख, रमेश पवार, गौतम आठवले, किशोर कुलकर्णी, सुभाष सावंत, माने सर, शंकर लोंढे यांच्या पुढाकाराने सन १९७६ सालच्या दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजिला होता. हा कार्यक्रम जेष्ठ शिक्षक ग. गो. जोशी, अनुपमा पंडित, चंद्रशेखर विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत तर ग. बा. कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रथम श्रीपूर नगरीचे आद्य संस्थापक कै. चंद्रशेखर आगाशे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना गंगाधर चिपळूणकर यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत उत्तम शैक्षणीक दर्जामुळे मन बुद्धीचा विकास झाला. चंद्रशेखर शाळेचा प्रथम विद्यार्थी म्हणून अमेरिकेत जाण्याची संधी मिळाली. जपान, जर्मनी सारख्या राष्ट्रांत जावून मी नोकरी-व्यवसायात यशस्वी होऊ शकलो. ग्रामीण भागात कै. चंद्रशेखर आगाशे परिवाराने साखर उद्योग उभा करून त्या माध्यमातून जे शैक्षणिक दालन उभे केले. त्यामुळेच हे शक्य झाल्याचे सांगितले. तर अरुंधती देवचक्की यांनी आयुष्यात कणखरपणे उथे राहण्याचे शिकवण चंद्रशेखर विद्यालयातील शिक्षकांनी दिली .विशेष करून मालती देशपांडे या शिक्षिका सर्व वर्गाची मोफत शिकवणी घेत व पौष्टीक आहारही देत असत याची आज कल्पना करू शकत नसल्याचे सांगून असे व्रतस्थ शिक्षक असल्यामुळे आम्ही घडलो असे सांगितले. या बरोबरच मामा माने, पद्माकर सोहनी, उत्कृष्ठ सेवेचा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मुमताज इनामदार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तर प्रमुख अतिथी ग. गो. जोशी, ग. बा. कुलकर्णी, अनुपमा पंडित, प्राचार्य पांडुरंग बनसोडे यांनी ही आपल्या मनोगतामध्ये अशा कार्यक्रमांनी जुन्या मित्रांच्या गाठी भेटी, विचारांची आदान प्रदान होते त्यामुळे या मेळाव्यास महत्व असल्याचे सांगितले. दुसऱ्या सत्रामध्ये झालेल्या कार्यक्रमात विविध मनोजन व आभार प्रदर्शनाने मेळाव्याची सांगता झाली. शशिकांत कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

### हॉटेलच्या गल्ल्यातील रोख १० हजार रुपये चोरणाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

शिवाजी चौकातील हॉटेल शिवशक्ती मधील गल्ल्यातून १० हजार रुपयांची रोकड चोरून नेणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रसाद प्रभुलिंग देशमुख (वय ३४, रा. सालेश्वर हौसींग सोसायटी, विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास शिवाजी चौकातील शिवशक्ती हॉटेलात एका १८ वर्षे वयोगटातील चोरट्याने हॉटेलच्या गल्ल्यामध्ये हात घालून गल्ल्यातील रोख १० हजार रुपये चोरून नेले.

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता-इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१
नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग, सो.म.पा.
ई मेल-smcroadsection@gmail.com मो. नं. 9423992748

जा.क्र.नगर अभियंता/रस्ते विभाग/२०२५-२६/१६४० दि.९/११/२५

**ई- निविदा सूचना क्र. /२०२५-२६**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर बयंता कार्यालय रस्ते विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ योजना खालील कामाचे ई-निविदा बाबत.

१) टेंडर आय डी-2025_SMC_1242699_1
२) टेंडर आय डी- 2025_SMC_1242752_1
३) टेंडर आय डी-2025_SMC_1242747_1
४) टेंडर आय डी- 2025_SMC_1242822_1

वरील कामाचे निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१०/११/२०२५ ते दि.१८/११/२०२५ पर्यंत भरणेस उपलब्ध आहे.

सही
प्र. नगर अभियंता
सोलापूर महानगपालिका, सोलापूर

## महत्वाचे...



### तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत जि.प.शाळा अंत्रोळी द्वितीय

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या दक्षिण सोलापूर तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत जि.प. शाळा अंत्रोळीने छोट्या गटात द्वितीय क्रमांक मिळवला. गटशिक्षण अधिकारी जयश्री सुतार, विस्तार अधिकारी गुरु बाळा सनके, आयुब कलबुर्गी, केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे, मुख्याध्यापक युवराज राठोड, श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाने यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना कीर्ती जाधव, पुष्पा बनसोडे, मीनाक्षी राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.




### जुनेद अब्दुल कय्युम शेख यांना एम.जी. पटेल नॅशनल बेस्ट टीचर अवॉर्ड प्रदान

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सोलापूरच्या सोशल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथील विज्ञान शिक्षक आणि उर्दूतील विज्ञान लेखक जुनेद अब्दुल कय्युम शेख यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक आणि साहित्यिक कार्यासाठी ''एम. जी. पटेल नॅशनल बेस्ट टीचर अवॉर्ड २०२५'' ने सन्मानित करण्यात आले. जयसिंगपूर येथे झालेल्या समारंभात त्यांना ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. श्री. शेख यांनी उर्दू भाषेत विज्ञान विषयावर तीन पुस्तके लिहिली आहेत, तसेच विज्ञान, आरोग्य आणि शिक्षण या विषयांवरील त्यांचे ५० हून अधिक लेख राष्ट्रीय वृत्तपत्रे आणि मासिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत.

### मारहाणीत भावजीचा मृत्यू; मेहुण्यास अटक

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

बहिणीला भेटण्यासाठी आलेल्या भावजीचा मेव्हुण्याने केलेल्या मारहाणीत मृत्यू झाला. ही घटना केम (ता. करमाळा) येथे घडली. विजय भगवान गाडे (वय ३१, रा. केम, ता. करमाळा) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. याबाबत भगवान शामराव गाडे (वय ७०, रा. केम) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राहुल अशोक धवसे (वय २२, रा.



मस्तान शाहनगर, जि. हिंगोली, सध्या रा. केम) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास विजय गाडे हा त्याची पत्नी रोहिणी हिला भेटण्यासाठी केम येथील राहुल संजय धोत्रे यांच्या विटभट्टीवर गेला होता. त्यावेळी विजयचा मेव्हुणा राहुल याने तु माझ्या बहिणीला भेटायला का आला, मी तुला तिला भेटू देणार नाही असे म्हणून विजय यास शिवीगाळ करून मारहाण केली. यावेळी राहूल याने कोणत्यातरी हत्याराने विजय याच्या पोटावर मारून त्यास जखमी केले. पोटाला मार लागून पोटामध्ये संसर्ग झाल्याने विजय याची प्रकृती खालावून त्याचा ५ नोव्हेंबर रोजी मृत्यू झाला. त्यामुळे याबाबत करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# शरद पवार राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदी महेश गादेकर

**● आगामी निवडणुका लक्षात घेऊन करणार पक्ष बांधणी : गादेकर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सोलापूर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्षपदी महेश गादेकर यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी तसे पत्र काढले आहे. सुधीर खरटमल यांच्या राजीनाम्यानंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत पुढील शहराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. तशी बैठक देखील सोलापूरचे प्रभारी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी घेतली होती.



या बैठकीत शहराध्यक्षपदी कोणाची नेमणूक करावी, असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला होता. त्या बैठकीत सर्वानुमते महेश गादेकर यांच्या नावाला होकार दर्शवण्यात आला होता. त्यानुसार रविवारी मुंबईत झालेल्या पक्षाच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाला. श्री. गादेकर यांनी महाविद्यालयीन जीवनापासून समाजकारण आणि राजकारणास सुरुवात केली. १९९२ रोजी त्यांच्या पक्षीय राजकारणास सुरुवात झाली. सोलापूर शहर युवक काँग्रेसमध्ये उपाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. त्यांच्या कामाच्या जोरावर १९९६ रोजी ते सोलापूर शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. १९९७ रोजी महापालिका निवडणुकीत त्यांनी सर्वात जास्त तरुण कार्यकर्त्यांना पक्षाची उमेदवारी देऊन निवडून आणले. १९९७ रोजी राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर ते शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यानंतर २०१० रोजी त्यांच्यावर सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी पक्षाने दिली. २०१२ रोजी झालेल्या महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वात जास्त १७ नगरसेवक निवडून आणले. २०१४ मध्ये त्यांनी सोलापूर शहर उत्तर मतदार संघात विधानसभेची निवडणूक लढवली होती.

आता त्यांच्यावर पुन्हा एकदा सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. खा.शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी सोलापुरात पहिला भव्य दिव्य असा कार्यक्रम घेतला. याकार्यक्रमास राज्यातील आणि देशातील अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. सोलापूर शहराध्यक्ष असताना त्यांनी फिरता दवाखाना ही संकल्पना सलग पाच वर्षे राबवत पाच लाख लोकांवर मोफत उपचार केले.

**आगामी महापालिका असणार लक्ष**

आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कामकाज करण्यात येणार आहे. पक्ष बांधणी तसेच उमेदवारांची निश्चिती करण्यात येऊन संपूर्ण ताकदीनिशी निवडणूक लढवू.

**- महेश गादेकर, शहराध्यक्ष**

**क्रीडा क्षेत्रातील महत्वाचे योगदान**

महेश गादेकर हे राजकारणाबरोबर क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा संघटक (खो-खो) पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. सध्या ते महाराष्ट्र राज्य खोखो असोसिएशनचे उपाध्यक्ष व सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष आहेत. सोलापूर शहर जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष, सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. महेश गादेकर यांनी २०१५ मध्ये शहरात खो खो ची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा प्रथमच घेतली.

**▸▸सतीश कदम आत्महत्या प्रकरण**

# डोंगरे पिता-पुत्रावरील खटला उच्च न्यायालयात रद्द

**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

सतीश कदम आत्महत्या प्रकरणी तुळजापूर पोलिसांनी तुळजापुरातील किसन डोंगरे व त्यांचे पुत्र गुरुराज व नागेश डोंगरे यांच्या विरुद्ध भरलेला खटला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती संजय देशमुख यांच्या खंडपीठाने रद्द केला.

या खटल्याची हकीकत अशी की, सतीश कदम आणि किसन डोंगरे हे पूर्वी एकत्र कामात होते. त्यांनी समयकात सन १९८९ मध्ये तुळजापूर-नळदुर्ग रस्त्यावर जमीन खरेदी केली होती व त्या जमिनीत २६ प्लॉट पाडण्यात आले होते. त्यातील २५ प्लॉट विकण्यात आले होते. एक प्लॉट विकायचा राहिला होता. कदम यांच्या मुलाला पुणे येथे चष्म्याचे दुकान काढावयाचे होते व त्यांनी राहिलेला



प्लॉट विकणे बाबत डोंगरे यांचे मागे तगादा लावलेला होता परंतु डोंगरे व त्यांच्या मुलांनी यापूर्वी विकलेले प्लॉट सहमतीने विकले आहेत असे लिहून देणे बाबत कदम यांना सांगितले होते व त्याबद्दल डोंगरे व त्यांची मुले गुरुराज व नागेश हे सतीश कदम यांना त्रास देत होते आणि त्या त्रासाला कंटाळून कदम यांनी २५ नोव्हेंबर २०२३ रोजी झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांना ताबडतोब उपचारासाठी इस्पितळात दाखल करण्यात आले परंतु उपचारादरम्यान २९ नोव्हेंबर २०२३ रोजी त्यांचा मृत्यू झाला. याबाबत कदम यांचा मुलगा प्रसाद याने तुळजापूर पोलीस स्टेशनला डोंगरे पिता पुत्रांविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. ही फिर्याद रद्द करणे बाबत डोंगरे पिता-पुत्रांनी ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या सुनावणी दरम्यान तुळजापूर पोलिसांनी न्यायालयात दोषारोप पत्र चार्जशीट दाखल केल्यानंतर खटला रद्द करण्यात यावा, असा अर्ज उच्च न्यायालयात प्रलंबित याचिकेत दाखल करण्यात आला. सदर याचिकेच्या सुनावणी दरम्यान आरोपीचे वकील ॲड. माने यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, सदर प्लॉट विक्रीचे पैसे मयत सतीश कदम यांनी चेकने स्वीकारले आहेत आणि सदरची रक्कम त्यांच्या बँक खाते मध्ये जमा झाली आहे, कदम हे उच्च रक्तदाब व मधुमेहाबद्दल त्रस्त होते त्याचबरोबर ते व्यसनी होते दवाखान्यात दाखल झाल्यानंतर मयताच्या पोटातील द्रव्य तपासणीकडे रासायनिक तज्ञाकडे पाठवण्यात आले नाही, कदम यांनी आत्महत्या केली असे गृहीत धरूनच पूर्ण तपास करण्यात आला व दोष दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे ते रद्द होण्यास पात्र आहे. खंडपीठाचे न्यायमूर्ती कंकणवाडी आणि न्यायमूर्ती देशमुख यांनी डोंगरे पिता पुत्रांवरील खटला रद्द करण्याचे आदेश दिले. या खटल्यात आरोपी डोंगरे पिता-पुत्रांतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. आर. एस.उर्फ रामचंद्र पाटील(धाराशिव) यांनी तर सरकारतर्फे ॲड. वि. के कोटेचा आणि मूळ फिर्यादीतर्फे ॲड. बी. आय. महाजन यांनी काम पाहिले. या निर्णयाला ऑल महाराष्ट्र लॉ रिपोर्टर क्रिमिनल या कायद्याच्या पुस्तकात पान नंबर २३६७ वर स्थान मिळाले आहे.





# दया हेच खरे आत्मिक सौंदर्य : डॉ. चागंटी कोटेश्वर राव

**● जीवनातील चांगल्या बदलांसाठी देवीमातेचा आशीर्वाद महत्त्वाचा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. ९ नोव्हेंबर-**

सौंदर्य फक्त डोळ्यांनी पाहता येते, पण दया (करूणा) ही पाहण्याची गोष्ट नसून ती प्रत्यक्ष करण्याची गोष्ट आहे. दया हेच खरे आणि सर्वात मोठे सौंदर्य आहे, असे प्रतिपादन डॉ. राव यांनी वल्याळ मैदानावर सुरू असलेल्या श्री माता देवी वैभवम विषयावर दुसऱ्या दिवशी आध्यात्मिक प्रवचनात केले. ते म्हणाले की, जर प्रत्यक्ष चालणारा देव पाहायचा असेल, तर शंकराचार्यांचे दर्शन घ्यावे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सद्गुरूंचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ.राव पुढे म्हणाले की, जगद्गुरु चंद्रशेखर सरस्वती यांचा फोटो आजही प्रत्येक घराघरात दिसतो. यामागे कारण म्हणजे त्यांच्या हृदयात असलेली दया व कृपाळू भाव प्रत्येकाला अनुभवायला मिळतो. डॉ. राव यांनी देवी मातेचे स्वरूप स्पष्ट करताना सांगितले की, देवी मातेला समजून घेण्यासाठी आधी आपल्या आईला समजून घेतले पाहिजे. देवतांचे वर्णन पायापासून डोळ्यांपर्यंत आहे, तर देवी मातेचे वर्णन शास्त्रात केशापासून नखापर्यंत सांगितले आहे.

देवीमाता ही साऱ्या जगाची माता आहे, म्हणूनच ललिता सहस्रनामावली मध्ये 'अम्मा' (आई) नावाने सुरुवात केली जाते. मानवाच्या आयुष्यात बदल घडविणारी आईच आहे. 'कुठून आलो, किती जन्म घेतले' हा सर्व बदल घडवणारी माता देवीच आहे. व्यासमुनी आणि शंकराचार्यांनी सर्वप्रथम देवी मातेच्या भुजांचे वर्णन करून नंतर देवी मुखाचे वर्णन का केले, याचा अभ्यास आपण केला पाहिजे. त्यांच्यामुळेच आपल्याला कांची कामाक्षी देवी मातेच्या स्वरूपात एक रूप पहायला मिळते, असेही डॉ. राव यांनी नमूद केले.

झाडे, शाकाहारी आणि मांसाहारी प्राणी यांच्यातील अन्नसाखळीप्रमाणेच, देवी मातेचा आशीर्वाद नसेल, तर अध्यात्म घडू शकणार नाही. हा आशीर्वादच सृष्टीतील सर्व घडामोडी चालवतो. कार्तिक अमावस्येच्या चंद्रबिंबात देवीचे रूप पाहणाऱ्याला मोक्षप्राप्ती होते. चंद्रबिंब आणि तलावातील कमल पुष्पांकडे पाहून जसे मन प्रसन्न होते, अगदी त्याचप्रमाणे देवी मातेचे मुख मंडल पाहिल्यानंतर मनाला प्रसन्नता लाभते.

शंकराचार्य आणि व्यासमुनी दोघांनीही स्पष्ट केले आहे की, सुख-दुःख भोगण्यासाठी जसे मानवी शरीर आवश्यक आहे, त्याचप्रमाणे कर्माचे चांगले फळ मिळण्यासाठी देवी मातेचा आशीर्वाद महत्त्वाचा आहे. ८४ लाख योनीच्या प्रवासानंतर लाभलेल्या मानवी शरीराचा आणि बोलण्याचा वापर देवी मातेच्या भक्तीसाठी करून तिचा कृपा आशीर्वाद प्राप्त करावा. ज्या व्यक्तीमध्ये भक्ती भाव असतो, ते चांगले काम करतातच. परंतु ज्या व्यक्तीमध्ये चांगला भाव नसतो, तो देखील देवी मातेच्या कृपाशीर्वादाने चांगले काम करू शकतो. देवी मातेचा आशीर्वाद सर्व काही घडवतो, असे डॉ. राव यांनी यावेळी सांगितले.

### काँग्रेसतर्फे नगरपरिषद, नगरपंचायतीसाठी इच्छुक उमेदवारांच्या आज मुलाखती

**सोलापूर** : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात होत असलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीच्या संदर्भात नगराध्यक्ष व नगरसेवक या पदासाठी येत्या दहा तारखेपासून उमेदवारी फॉर्म भरणेस सुरुवात होत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा काँग्रेसतर्फे जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद, नगरपंचायतीची निवडणूक काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सोमवार १० नोव्हेंबर रोजी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी काँग्रेस भवन येथे होतील. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहनजी जोशी व खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या उपस्थितीत आणि जिल्ह्यातील सर्व विधानसभेचे प्रभारी, माजी आमदार, प्रदेश पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कोर कमिटी इच्छुकांच्या मुलाखती घेणार असल्याची माहिती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली. इच्छुक उमेदवारांनी आपले उमेदवारी मागणी अर्ज, संपूर्ण बायोडाटा सहितपस्थित राहून मुलाखात द्यावी.

**मुलाखतीचा कार्यक्रम असा**

सकाळी १० ते ११ मोहोळ,अनगर
सकाळी ११ ते १२:३० अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी
दुपारी १२:३० ते १:३० मंगळवेढा
दुपारी ३ ते ३:३० आकलुज
दुपारी ३:३०ते ४:०० करमाळा
दुपारी ४ ते ४:३० सांगोला
दुपारी ४:३० ते ५:३० पंढरपूर
सायं.५:३० ते ६:३० कुर्डूवाडी
सायं. ६:३० ते ७:३० बार्शी

# कर्तव्य, कृतज्ञता आणि प्रेरणा : 'प्रिसिजन गप्पा'चा अर्थपूर्ण समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

प्रिसिजन फाउंडेशनतर्फे आयोजित ''प्रिसिजन गप्पा २०२५'' या सांस्कृतिक मेजवानीचा तिसरा आणि अंतिम दिवस सामाजिक कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठी अर्पण करण्यात आला. सामाजिक जाण आणि योगदानाचा गौरव करणाऱ्या या दिवशी, शहर आणि जिल्ह्यातील दहा कार्यकर्त्यांना 'प्रिसिजन सेवा सन्मान'पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सुहासिनी शहा यांनी प्रिसिजन फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आणि कार्याचा आढावा सादर केला. त्यानंतर सन्मान सोहळ्याची मुख्य सूत्रधार म्हणून प्रख्यात वक्ते, पत्रकार आणि मुलाखतकार डॉ. उदय निरगुडकर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

**सुमेधा चिथडे यांना 'प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार'**

सोल्जर्स इंडिपेन्डंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन या संस्थेच्या वतीने सियाचेन या जगातील सर्वोच्च रणभूमीवर ऑक्सिजन जनरेशन प्लांट सुरू करून तेथील सैनिक आणि पर्यटकांना जीवनदायी श्वास देण्याचे कार्य श्रीमती सुमेधा चिथडे यांनी केले आहे. तसेच सैनिकांच्या विधवा पत्नी आणि मुलांचे पुनर्वसन करण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या या अद्वितीय सेवेसाठी त्यांना ३ लाख रुपयांचा ✻प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**अधिक कदम यांना 'सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्कार'**

बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून काश्मीरमधील दहशतवाद, युद्ध आणि अराजकतेमुळे अनाथ झालेल्या मुला-मुलींच्या पुनर्वसनाचे कार्य अधिक कदम यांनी गेल्या ३० वर्षांपासून निष्ठेने केले आहे. कुपवाडा, अनंतनाग, जम्मू अशा संवेदनशील भागांमध्ये शिक्षण, आश्रय आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे त्यांचे योगदान विलक्षण आहे. त्यांच्या या सेवाभावी कार्याचा सन्मान म्हणून त्यांना २ लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेला ''प्रिसिजन सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. पुरस्कार सोहळ्यानंतर डॉ. उदय निरगुडकर यांनी सुमेधा चिथडे आणि अधिक कदम यांची संवादात्मक मुलाखत घेतली. ''सामाजिक ज्ञान आणि भान जपणे हेच खरे राष्ट्रसेवेचे लक्षण आहे'', "Beyound yourself... Before yourself...", ''देशासाठी कार्य करणारे सैनिक कधीच उठाव किंवा मागण्या करत नाहीत ते फक्त आपले कर्तव्य पार पाडतात'' अशा विचारांनी सुमेधा चिथडे यांनी रसिकांना विचारमंथन करायला भाग पाडले. शेवटी विलास कुलकर्णी यांचे अभंग सादरीकरण झाले.अधिक कदम हे उत्तम पखवाजवादक असल्याने विलास कुलकर्णी यांच्या अभंगाला अधिक कदम यांनी पखवाजाची साथसंगत केली. सामाजिक जबाबदारीची नवी व्याख्या मांडत, सेवाभावी व्यक्तींना सन्मानित करून ''प्रिसिजन गप्पा २०२५'' या वर्षाचा समारोप प्रेरणादायी वातावरणात झाला.




**प्रिसिजन सेवा सन्मानाचे मानकरी**

१. ऋचा पाठक - वृत्तपत्र विक्रेत्या. सोलापूर
२. अंबिका पानगंटी- पहिल्या महिला रिक्षाचालक व प्रशिक्षक. सोलापूर
३. मोहन तलकोक्कुल - मनोरूग्ण आणि बेघरांसाठी कार्य. सोलापूर
४. रामचंद्र वाघमारे - व्यसनमुक्तीसाठी कार्य. सोलापूर
५. राहुल बिराजदार - मासिक पाळी संबंधात प्रबोधन. सोलापूर
६. अतुल गवळी - महापुरात ४० जणांचा जीव वाचवला. सीना दारफळ, माढा.
७. विजयसिंह उबाळे - महापुरात ४० जणांचा जीव वाचवला. सीना दारफळ, माढा.
८. कैलास काटकर - सलूनमध्ये वाचनालय सुरू करून वाचन चळवळीला प्रोत्साहन. मोडनिंब, माढा.
९. राजू डोलारे - कोरोना काळात ३८०० अंत्यविधी. चित्रकार. सोलापूर.
१०.संजय बैरागी - स्वतः अंध असून अंधांसाठी विविध कार्य. कुर्डुवाडी, माढा.



# बुधवार पेठेत सफाई कामगार कॉलनीची गॅलरी कोसळली

**जीवितहानी झाली नाही ; रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

बुधवार पेठ येथील महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सफाई कामगार वसाहतीची गॅलरी शनिवारी रात्री कोसळल्याने येथील रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र एका दुचाकी वाहनाचे नुकसान झाले.

रात्री १० वाजण्याच्या सुमारास इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील गॅलरीची भिंत कोसळली. कोसळलेला भाग खाली पार्किंग करण्यात आलेल्या एका वाहनावर पडून त्याचे नुकसान झाले, मात्र यावेळी सुदैवाने जीवितहानी झाली नाही. या घटनेची माहिती समजतात महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, इतर अधिकारी तसेच राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक विनायक विटकर, कामगार नेते बाली मंडेपू यांनी घटनास्थळी भेट दिली. ही वसाहत तीन मजली असून त्यामध्ये एकूण २४ कुटुंबे राहतात. गॅलरी कोसळल्यावर ग्राउंड फ्लोअरला असलेल्या घरासमोरील मोटर सायकलचे नुकसान झाले तर विजेच्या तारा तुटून मोठा आवाज झाला. यामुळे परिसरात एकच घबराट पसरली.

**१६ कुटुंबीयांची दुसरीकडे राहण्याची सोय**

ही घटना घडल्यावर महापालिकेची यंत्रणा हलली. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. या इमारतीमधील नागरिकांच्या सुरक्षेला बाधा पोहचू नये म्हणून या इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील १६ कुटुंबीयांना दुसरीकडे हलवण्यात आले. महापालिकेने धोकादायक झालेल्या या इमारतीबाबत पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बुद्धाच्या विज्ञानवादी धम्मानेच माणसाचा उद्धार : भिक्षुनी आर्यामेताजी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ नोव्हेंबर -**
केज रोडवरील तेलेवाडी पाटी येथील बुद्धसृष्टी विपश्यना केंद्रात कार्तिक पौर्णिमेच्या निमित्ताने भिक्षुनी आर्यामेताजी यांच्या प्रेरणादायी धम्मदेसनेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध आणि विश्वरत्न, बोधिसत्व प्रज्ञासूर्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, अगरबत्ती व मेणबत्ती प्रज्वलन करून त्रिशरण पंचशील व बुद्धवंदनेने करण्यात आली.या वेळी आर्यामेताजी म्हणाल्या, बौद्ध धम्मातील पंचांग प्रणाम आणि ध्यानधारणा या सर्व गोष्टी विज्ञानवादी आहेत. माणसाच्या उद्धाराचा खरा मार्ग म्हणजे तथागत गौतम बुद्धांचा धम्म होय. त्या पुढे म्हणाल्या, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. आंबेडकरांनी दिलेला धम्म हा मानवमुक्तीचा मार्ग आहे. सर्व बौद्ध उपासक व उपासिकांनी बौद्ध आचारसंहितेचे पालन करून धम्ममार्गावर चालावे. यावेळी भिक्षुनी आर्यामेताजी यांनी सतिश टोणगे यांना 'बुद्धवादी विचारवंत-बौद्ध जीवन संस्कार' हे पुस्तक भेट दिले.

या कार्यक्रमाला सतिश टोणगे, अविनाश घोडके तसेचउ पासक व उपासिक होते.



## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न

**तुळजापूर, दि.९ नोव्हेंबर -**
आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीची रणनीती, संघटनात्मक बांधणी आणि स्थानिक जनसंपर्क मोहिमेबाबत सविस्तर चर्चा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत करण्यात आली. पक्ष नगरपालिकेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढविणार असून निष्ठावान कार्यकर्त्यांना न्याय मिळेल, अशी भावना जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष जीवनराव गोरे प्रमुख उपस्थित होते. बैठकीस तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील, धनंजय पाटील, दिलीप मगर, अनिल शिंदे, तोफिक शेख, अमर चोपदार, विवेक शिंदे, शरद जगदाळे, अक्षय कदम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनिल नागणे

**धाराशिव, दि.९ नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्हा शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनिल नागणे (तुळजापूर) तर सचिवपदी संतोष दत्ता कदम (कळंब) यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सोपानराव शेजवळ यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना निवडीची पत्रे प्रदान केली. शस्त्रांग मार्शल आर्ट खेळाचा प्रचार-प्रसार करणे, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करणे तसेच मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरे घेण्याचा मानस नवनियुक्त अध्यक्ष सुनिल नागणे यांनी व्यक्त केला. ग्रामीण आणि शहरी भागातील शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन उत्कृष्ट खेळाडू घडविण्याचे उद्दिष्ट त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरणाळे यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील क्रीडा, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.





### लोहाऱ्याचे असलम भाई सय्यद यांना 'उद्योजकरत्न' पुरस्कार

**लोहारा, दि.९ नोव्हेंबर -**
उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करणारे क्लासिक डेव्हलपर्स चे सर्वेसर्वा असलम भाई सय्यद यांना ईगल फाउंडेशन तर्फे राष्ट्रीय स्तरावरील 'उद्योजकरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान सोहळा सांगली जिल्ह्यातील आष्टा येथे दि.९ नोव्हेंबर रोजी पार पडला. या वेळी माजी ग्रामविकास मंत्री आ. अण्णासाहेब डांगे, पद्मश्री दादा इदाते, सुरेश वाडकर, विलासराव कोळेकर, प्रा.डॉ. महेश मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. सय्यद यांनी रोजगारनिर्मिती, सामाजिक दायित्व व स्थानिक युवकांना उद्योगक्षेत्राकडे वळविण्याच्या प्रयत्नांबद्दल हा पुरस्कार मिळविला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी सांगितले, हा सन्मान माझ्या कार्याला नवी प्रेरणा देणारा आहे; समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करत राहणे हीच खरी जबाबदारी आहे. मान्यवरांनी त्यांच्या सामाजिक जाण, व्यवसायिक प्रामाणिकपणा आणि योगदानाचे कौतुक केले.

# दिशा नागरी सहकारी पतसंस्थेतील २ कोटी ६३ लाखांची चोरी उघड

## कर्मचारीच निघाला चोर!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ नोव्हेंबर -**
नळदुर्ग शहरातील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या तिजोरीतील तब्बल २ कोटी ६३ लाख ६३ हजार २७२ रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेल्याची थरारक घटना दि. ८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री घडली. या घटनेने नळदुर्गासह परिसरात खळबळ उडाली होती. परंतु पोलिसांनी अवघ्या काही तासांतच या मोठ्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणत मुख्य आरोपीसह तिघांना अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या चोरीचा सूत्रधार पतसंस्थेतीलच लिपिक निघाला.

नळदुर्ग येथील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेत दि.७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता काम काज आटोपल्यानंतर संस्थेचे शटर बंद करण्यात आले होते. मात्र, रात्री २ वाजता चोरट्यांनी शटरचे लॉक चावीने उघडून आत प्रवेश केला आणि तिजोरीतील सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून २ कोटी ६३ लाख ६३ हजार २७२ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

सकाळी स्वच्छता करणाऱ्या महिलेने शटरचे कुलूप उघडे असल्याचे पाहून शाखा व्यवस्थापक उमेश जाधव यांना माहिती दिली. तपासात चोरी झाल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक रितु खोकर, उपविभागीय अधिकारी डॉ. निलेश देशमुख, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद ईप्पजवार, नळदुर्ग ठाण्याचे निरीक्षक सचिन यादव आदी अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

सिसिटिव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी संशयित राहुल राजेंद्र जाधव (लिपिक, दिशा पतसंस्था, रा. नळदुर्ग) याच्याकडे चौकशी केली. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसी खाक्या दाखवल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्यासोबत त्याचा मित्र सुशिल राठोड (रा. नळदुर्ग) आणि आणखी दोन अनोळखी साथीदारांचा या चोरीत सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या आरोपींनी फक्त सहा ते सात मिनिटांतच चोरीची संपूर्ण कारवाई केली असल्याचे पोलिस



तपासात समोर आले आहे. या प्रकरणात सिसिटिव्ही कॅमेऱ्यांची भूमिका निर्णायक ठरली.

या गुन्ह्याबाबत शाखा व्यवस्थापक उमेश जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक रितु खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद ईप्पजवार करीत आहेत. आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

या घटनेमुळे नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी शहरातील व्यापाऱ्यांना व संस्थांना सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहन केले असून, अशा घटनांना आळा बसण्यासाठी रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेत राजपुत समाजाचा भाजपकडे महिलांसाठी उमेदवारीचा आग्रह

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ नोव्हेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत राजपुत समाजाच्या वतीने भाजपकडे प्रभाग क्र. २ आणि प्रभाग क्र. ३ मधील महिलांसाठी राखीव जागांवर समाजातील महिलांना उमेदवारी देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत राजपुत समाजाचे शिष्टमंडळ लवकरच आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

नळदुर्ग शहरातील राजकारणात राजपुत समाज नेहमीच सक्रीय राहिला आहे.

या समाजाचे दिवंगत कै. सित्तलसिंह हजारे यांनी नगराध्यक्ष म्हणून कार्य



केले असून, अनिल हजारे आणि सुधीर हजारे यांनी नगरसेवक म्हणून योगदान दिले आहे.

यंदाच्या निवडणुकीत राजपुत समाजाने प्रभाग क्र. २ मधून सुमन (काकी) ठाकुर तर प्रभाग क्र. ३ मधून निर्मला सुनिलसिंग हजारे यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

दोन्हीही जागा महिलांसाठी राखीव आहेत.

दरम्यान, नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक दि.२ डिसेंबर रोजी होत असून, दि. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांकडून विविध पक्षांमार्फत तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.

राजपुत समाजातील सुमन (काकी) ठाकुर आणि निर्मला सुनिलसिंग हजारे या दोन्ही महिला सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. त्यांना भाजपकडून उमेदवारी मिळाल्यास पक्षाला निश्चितपणे याचा फायदा होऊ शकतो, असा विश्वास स्थानिक पातळीवर व्यक्त केला जात आहे.

## पवनऊर्जा प्रकल्पावर चोऱ्या वाढल्या; तपास संथगतीने सुरू!

### कंपन्यांवर आर्थिक ताण; काहींनी माघार घेण्याची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात पवनऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. मात्र, या प्रकल्पस्थळांवरून चोऱ्यांच्या घटना वाढल्या असून अनेक गुन्ह्यांचा तपास संथगतीने सुरू आहे. त्यामुळे पवनऊर्जा कंपन्यांना मोठा आर्थिक फटका बसत असून काही कंपन्यांनी या भागातून माघार घेण्याची तयारी दर्शविली आहे.

धाराशिव जिल्हा हा निती आयोगाच्या आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीतील तिसऱ्या क्रमांकाचा मागास जिल्हा असून, कायम दुष्काळी आणि डोंगराळ भौगोलिक रचनेमुळे शेतीतून मिळणारे उत्पन्न मर्यादित आहे. मात्र, अलीकडच्या संशोधनांनुसार जिल्हा पवनऊर्जा व सौरऊर्जेसाठी पोषक क्षेत्र असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत सुमारे १२ पवनऊर्जा कंपन्यांची प्रकल्पस्थळांवर कामे सुरू आहेत.

या प्रकल्पांमध्ये टॉवर, पंखे, तांबे तारा, केबल, वायरींग, तसेच अन्य सुटे भाग वापरले जातात. हे साहित्य शेतशिवार आणि माळरानावर साठवले जात असल्याने रात्रीच्या वेळी चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.



मागील एप्रिल महिन्यात १२ लाख रुपयांच्या तांबे तारा चोरीला गेल्या होत्या. पोलिसांनी त्यावेळी तीन आरोपींना अटक करून चोरीत वापरलेली टाटा सुमो जप्त केली होती. तथापि, अजूनही अनेक गुन्ह्यांचा तपास विविध टप्प्यांवर अडकलेला आहे.

एका पवनऊर्जा कंपनीच्या आकडेवारीनुसार, जून २०२५ पर्यंत ४१ चोरीच्या घटना नोंदल्या गेल्या असून, या कंपनीचे दोन कोटी रुपयांहून अधिक किंमतीचे साहित्य चोरीला गेले आहे. ही आकडेवारी फक्त एका कंपनीची असून, जिल्ह्यात तब्बल १२ कंपन्या काम करीत असल्याने चोरीचे प्रमाण आणखी मोठे असण्याची शक्यता आहे.

याशिवाय प्रकल्पस्थळांवरून तसेच गोडावूनमधूनही चोरीच्या घटना घडत आहेत.

काही ठिकाणी सुरक्षा रक्षकांना मारहाण, दगडफेक आणि साहित्याचे नुकसान अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे या कंपन्यांची सुरक्षिततेबाबतची चिंता वाढली आहे.

प्रकल्प राबवणाऱ्या कंपन्यांकडून पोलिस यंत्रणेला वारंवार कळविण्यात येत असले तरी तपासाची गती मंद असल्यामुळे उद्योग क्षेत्रातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## परंडा नगर पालिकेत नगराध्यक्ष शिवसेनेचा होणार : आ. तानाजी सावंत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ नोव्हेंबर -**
नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत माजी मंत्री तथा आमदार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. विशेषतः त्यांनी माजी आमदार राहुल मोटे यांचे नाव न घेता मॅनेजमेंटच्या राजकारणावर टीका केली, तर भाजपाचे ज्येष्ठ नेते सुजितसिंह ठाकूर यांना थेट आव्हान देत स्थानिक हा मुद्दा उपस्थित केला.

या बैठकीत माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जुन्या नेतृत्वावर नाराजी व्यक्त करत भूतकाळातील कटू अनुभव कथन केले. ते म्हणाले, मी चार वेळा राष्ट्रवादीकडून निवडणूक लढलो, पण नेत्यांनी कधीच माझी काळजी घेतली नाही.



माझ्या विरोधात उभे रहा सौदागर यांचे मा.आ. ठाकूर यांना चॅलेंज...

विरोधक कायम 'मॅनेज' असायचे, त्यामुळे आम्हालाच त्रास सहन करावा लागायचा.

शहरातील विरोधक आता एकत्र येऊन विजयाचे गणित मांडत आहेत, परंतु हे गणित मतदार जनतेमुळे चुकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सावंत म्हणाले, परंड्यातील जनता सर्व जाती-धर्मांची माणसं आमच्यासोबत आहेत. आमच्या विरोधात इतर उमेदवार उभे करण्याऐवजी माजी आमदारांनीच स्वतः समोर यावे. यावेळी सौदागर यांनीही ठाकूर यांना थेट 'ओपन चॅलेंज' दिल्याने आगामी निवडणुकीत मोठी चुरस पाहावयास मिळणार आहे. विधानसभेला देखील माझ्यासोबत विश्वासघात झाला, असे सांगत सावंत यांनी पुढे म्हटले, नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर आमच्याविरोधात सर्व विरोधक एकत्र आले आहेत. आम्ही महायुती म्हणून एकसंध राहण्याचा प्रयत्न केला, पण विरोधक आधीच आमच्याविरोधात एकवटले. त्यामुळे आता आम्ही 'एकला चलो रे' म्हणत शिवसेना (शिंदे गट) एकटी लढणार आहे.

तानाजी सावंत यांनी पुढे सांगितले की, जाकीर सौदागर यांनी विधानसभेच्या निवडणुकीत भरपूर मेहनत घेतली. आता त्या मेहनतीची परतफेड मी करणार आहे. शिवसेनेचे किमान २० नगरसेवक विजयी व्हावेत यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने एकदिलाने कामाला लागा. विरोधकांचे डिपॉझिट जप्त झाले पाहिजे.

ही सभा जाकीर सौदागर यांच्या घरासमोरील मैदानात पार पडली. या मेळाव्याला मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. माजी नगरसेवक, उद्योगपती, तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला साबेर सौदागर, बापू बनसोडे, राजाभाऊ शेळके, रत्नकांत पापा शिंदे, वाजिद दखनी, गणेश राशनकर, मसरत काझी, सरफराज कुरेशी, संजय घाडगे, धनाजी जाधव, राजेंद्र जाधव, इरफान शेख, वैभव पवार, जावेद पठाण, बच्चन गायकवाड, राजकुमार माने, बब्बू जिनेरी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## सिंदफळ येथे महिलेची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ गावात एका तरुणीने प्रियकराकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलिसांनी संबंधित तरुणाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे.

मयत तरुणीचे नाव मयुरी अनिल पवार (वय २८, रा. सिंदफळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे असून, तिने दि.६ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

## खामसवाडीच्या कन्यांचा क्रीडा क्षेत्रात झळाळता यश

### लातूर विभागात पहिला क्रमांक; राज्यस्तरीय स्पर्धेत करणार नेतृत्व

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.९ नोव्हेंबर -**
राज्याच्या क्रीडा विभागामार्फत घेण्यात आलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेत कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाच विद्यार्थिनींनी उज्वल यश संपादन केले आहे.

ट्रिपल जंप या प्रकारात सई सुनील शेळके ही विद्यार्थिनी विभागात दुसरी आली असून ती लातूर विभागाचे नेतृत्व करणार आहे. तर ४४०० मीटर रिले या क्रीडा प्रकारात खामसवाडीच्या जिल्हा परिषद शाळेच्या मुलींनी धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत लातूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला.



या विजयी संघात सानवी विशाल शेळके, सई सुनील शेळके, अमृता शांतलिंग लोखंडे आणि दीपिका विठ्ठल जोशी या खेळाडूंचा समावेश आहे. या मुलींचा संघ आता चिपळूण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूर विभागाचे नेतृत्व करणार आहे.

या यशाबद्दल गावातून तसेच सर्व स्तरातून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. क्रीडा शिक्षक गणेश करंजकर यांच्यासह सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे गावचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, मुख्याध्यापक पवार सर व शालेय समिती अध्यक्ष राम शेळके यांनी अभिनंदन केले.

### जाहीर प्रगटन

**श्री.एन.पी. कापुरे, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश परभणी यांचे न्यायालयात**

**मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३७८/२०२४**

**दिपाली भ्र. तुकाराम कदम व ईतर विरुध्द अरविंद शिवाजी बुरंगे व ईतर**

या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की गैरअर्जदार क्र. ०१. अरविंद पिता शिवाजी बुरांगे, वय ४५ वर्ष धंदा व्यापार रा. बोरंगवाडी जवळा ता. सांगोला जि. सोलापुर विरुध्द अर्जदार दिपाली भ्र. तुकाराम कदम, वय २३, व्यवसाय-घरकाम रा. एरंडेश्वर ता. पुर्णा जि. परभणी व ईतर यांनी त्यांचे पती नामे तुकाराम पिता बबनराव कदम यांचा झालेल्या मृत्यूची व त्या अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा अर्ज दाखल केलेला आहे.

आपणास या पुर्वी वारंवार समन्स नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु आपण मिळुन न आल्यामुळे सदरची समन्स नोटीस या न्यायालयास न बजावणीकरता बेलीफ रिपोर्ट सह बिनातामील परत आलेली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अथवा वकीला मार्फत दिनांक २८.११.२०२५ पुर्वी पर्यंत या न्यायालयात हजर रहावे नसता आपले गैरहजेरीत आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन आपणाविरुध्द योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ३१.१०.२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**आदेशान्वये**

**स्वाक्षरित/-** **स्वाक्षरित/-**
**क. लिपीक** **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, परभणी.**

### जाहीर प्रगटन

**श्री.एन.पी. कापुरे, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश परभणी यांचे न्यायालयात**

**मोटार अपघात दावा अर्ज क्र. २७/२०२५**

**अविनाश रावसाहेब कदम विरुध्द अरविंद शिवाजी बुरंगे व ईतर**

या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की गैरअर्जदार क्र. ०१ अरविंद पिता शिवाजी बुरांगे, वय ४५ वर्ष धंदा व्यापार रा. बोरंगवाडी जवळा ता. सांगोला जि. सोलापुर विरुध्द अर्जदार अविनाश पिता रावसाहेब कदम, वय २७ व्यवसाय-कुली रा. एरंडेश्वर ता. पुर्णा जि. परभणी यांनी त्यांचे स्वतःच्या झालेल्या अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा अर्ज दाखल केलेला आहे.

आपणास या पुर्वी वारंवार समन्स नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु आपण मिळुन न आल्यामुळे सदरची समन्स नोटीस या न्यायालयास न बजावणीकरता बेलीफ रिपोर्ट सह बिनातामील परत आलेली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अथवा वकीला मार्फत दिनांक २८.११.२०२५ पुर्वी पर्यंत या न्यायालयात हजर रहावे नसता आपले गैरहजेरीत आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहीत धरून आपणाविरूद्ध योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २७.१०.२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**आदेशान्वये**

**स्वाक्षरित/-** **स्वाक्षरित/-**
**क. लिपीक** **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, परभणी.**

# निलंगा पालिकेसाठी प्रशासन सज्ज

## निवडणुकीत ३२ हजार १८५ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा :** राज्य निवडणूक आयोगाकडून नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून या निवडणुकीत निलंगा शहरातील ३२ हजार १८५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणारा आहेत. पारदर्शक निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली.

शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालय निलंगा येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. निलंगा नगरपालिकेच्या एक नगराध्यक्ष व २३ नगरसेवक पदा साठी निवडणूक होत आहे. दिनांक १० ते १७ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत निलंगा तहसील कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार आहेत. दिनांक १८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३



वाजेपर्यंत सदरील उमेदवाराचे नामनिर्देशन पत्राची छानणी होणार आहे.

दिनांक २५ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असून दिनांक २६ रोजी उमेदवारांना चिन्हाचे वाटप करण्यात येणार आहे. दिनांक २ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार असून दिनांक ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निलंगा नगरपालिका हद्दीतील १ जुलै २०२५ च्या मतदार यादीनुसार एकूण ३२ हजार १८५ मतदार असून त्यात १६ हजार ४२९ पुरुष व १५ हजार ७५६ महिला मतदार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शहरात एकूण ३५ मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.

एका मतदान केंद्राला एक केंद्राध्यक्ष व तीन मतदान अधिकारी असे एकूण एका मतदान केंद्राला चार कर्मचाऱ्यांचे नेमणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांची तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नायब तहसीलदार कुलदीप देशमुख व निलंगा नगरपालिकेचे मुख्याधिकारी लोमटे हे दोघे राहणार काम पाहणार आहेत. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला निवडणुकीसाठी ७ लाख ५० हजार रुपये खर्चाची मर्यादा आहे तर नगरसेवक पदासाठी २ लाख ५० हजार रुपये खर्चाची मर्यादा ठेवण्यात आली आहे. मतदान सुरू होण्याच्या २४ तास अगोदर संबंध उमेदवाराचे प्रचार, जाहिराती व स्पीकर बंद करावे लागणार आहेत. सदरील निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणा सज्ज झाली असून शांततेच्या मार्गाने निवडणूक संपन्न व्हावी यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी कुलदीप देशमुख, नगरपालिकेचे निवडणूक प्रभारी दिगंबर साठे आदी उपस्थित होते.

# पीएम श्री केंद्रीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कृषी विद्यापीठास भेट



**त.भा.वृत्तसेवा**

**चाकूर :** चाकूर येथील पीएम श्री केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांची वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे शैक्षणिक भेट दिली.

यावेळी विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान क्षेत्रातील नवीन अनुभव घेतला.विद्यार्थ्यांनी डिजिटल शेती उपाय, कृषी रोबोट्स, ड्रोन आणि आगव प्रयोगशाळेत विविध कृषी तंत्रांचा अनुभव घेतला. त्यांनी ड्रोनद्वारे पिकांवर कीटकनाशके आणि खते फवारण्याची थेट पद्धत शिकली, ड्रोनच्या कामाचा अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांनी ३डी एक्सट्रूजन फूड प्रिंटर मशीन वापरून कमी वेळात विविध अन्नपदार्थांना कसे आकार द्यायचे हे शिकले. त्यांना चकली, मुरकुल, कुरडई, पापड आणि काठी बनवणे यासारख्या विविध अन्नपदार्थ बनवण्याच्या तंत्रांची माहिती मिळाली. अन्न आणि यंत्रसामग्री विभागात, विद्यार्थ्यांनी अन्न तंत्रज्ञानाचे विविध पैलू शिकले. उसाचा रस, गूळ, मसाले प्रक्रिया आणि बेकरी पदार्थांचे उत्पादन समजून घेतले.टिश्यू कल्चर विभागात विद्यार्थ्यांना केळीच्या टिश्यू कल्चर प्रक्रियेवर मार्गदर्शन मिळाले. रेशीम संशोधन प्रकल्पात त्यांनी रेशीम किड्यांच्या प्रजनन आणि धाग्याच्या उत्पादनाबद्दलही माहिती घेतली.विद्यार्थांना विद्यापीठाच्या ग्रंथालयात विविध कृषी विज्ञान पुस्तके आणि संदर्भ पुस्तकाची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य हरीश कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या ३६० विद्यार्थ्यांनी व ४० कर्मचारी यांनी या शैक्षणिक दौऱ्यात भाग घेतला. शाळेने महाराष्ट्र राज्य परिवहनच्या नऊ बसेस आणि जेवणाची व्यवस्था केली होती.

हा दौरा यशस्वी करण्यासाठी विद्यालय प्राचार्य आणि एस्कॉर्ट शिक्षकांनी कठोर परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना या शैक्षणिक सहलीतून कृषी विज्ञानाच्या क्षेत्रात नवीन अनुभव पाहवयास मिळाला त्यामुळे पालकातून प्राचार्य, मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतूक करण्यात आले.

# रेणापूर तालुका ग्रंथालय कर्मचारी विकास परिषद अध्यक्षपदी कटके



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर :** रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र वाचनालय रेणापूर येथे सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची बैठकविठ्ठलराव कटके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीसाठी राज्य ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे राज्य संघटक विद्यासागर हणमंते, मराठवाडा विभाग ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे कार्याध्यक्ष मनोहर गायकवाड व जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे सचिव संतोष करमले उपस्थित होते.

या वेळी रेणापूर तालुका अध्यक्ष म्हणून विठ्ठल कटके, उपाध्यक्ष गोविंदराव मुंढे, महीला उपाध्यक्ष श्रीमती रेखाताई गायकवाड, सचिव अनिल फुलारी, सहसचिव शहाजी कटके सहसचिव लक्ष्मन जगदाळे, खजीनदार नागनाथ नागरगोजे, कार्याध्यक्ष बाळासाहेब सोमवंशी, सदस्य परमेश्वर शिंदे, सतीश राठोड, संजय शेरखाने, वसंतराव कामे, दिलीप लांडगे यांच्यासह अनेक कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी नागपूर विधानभवनावर दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या वतीने किमान वेतन, कर्मचाऱ्यांना खात्यात वेतन, आठ तास काम, अनुदान वाढ, दरवर्षी १० टक्के पगारवाढ करण्यात यावी यासाठी मोर्चाबाबत उपस्थित राहणार असल्याची माहिती कटके यांनी दिली.

# केंद्रीय मंत्री गडकरींच्या हस्ते निळकंठेश्वर कारखान्याच्या गळीत हंगामाचा आज शुभारंभ

## साडेतीन लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

**तभा वृत्तसेवा**

**औसा :** अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर किल्लारी तालुक्यातील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखाना अखेर पुन्हा सुरू होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी १२ वा.कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे. यामुळे किल्लारीसह चार तालुक्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.



गेल्या काही वर्षांपासून बंद असलेल्या या कारखान्याच्या पुन्हा सुरू होण्याची आशा शेतकऱ्यांनी जवळजवळ सोडली होती. मात्र, आमदार अभिमन्यू पवार यांनी दिलेला शब्द पाळत कारखाना पुन्हा सुरू करण्यास यश मिळवले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज किल्लारी परिसर ऊसाच्या गोड सुवासाने दरवळणार आहे.

पूर्वी साडेबाराशे टीसीडी क्षमतेने चालणारा हा कारखाना आता अडीच हजार टीसीडी क्षमतेने गाळपासाठी सज्ज झाला आहे. यंदा साडेतीन लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, शेतकऱ्यांना योग्य दर देण्याचे आश्वासन आमदार पवार यांनी दिले आहे.

मोठ्या आर्थिक आणि प्रशासकीय

### परिसरात रोजगार आणि विकासाची नवी पहाट

अडचणींवर मात करून नव्या दमाने उभा राहिलेला निळकंठेश्वर कारखाना आज शेतकऱ्यांच्या संघर्षाचे प्रतीक ठरला आहे. अत्याधुनिक मशिनरी आणि आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज हा कारखाना आता दुप्पट उत्पादन क्षमतेने कार्यरत होणार आहे.

या पुनरुज्जीवनामुळे लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. गळीत हंगामाच्या प्रारंभी भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला असून, हजारो शेतकरी, सभासद, अधिकारी व नागरिक या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

# समाज व्यवस्थेत सामाजिक संस्थेचे कार्य महत्त्वाचे : वाघमारे

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर :** सध्याच्या भौतिक सुखा मागे लागलेल्या समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक संस्थेचे कार्य महत्त्वपूर्ण झालेले आहे आज अनेक सामाजिक संस्था कार्य करत

### ५२ मुला मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप

आहे परंतु त्यातकला पंढरी संस्थेचे कार्य हे सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य आहे आशा प्रकारे गौरवोगार प्राचार्य डॉ सुरेश वाघमारे यांनी पानगाव येथे पूरग्रस्त कुटूंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी काढले.

रेणापूर तालुक्यात सप्टेंबर मध्ये मोठ्या प्रमाणात अतिव्रष्टी झाली अनेक गावात पुर आले अनेक गावात पाणी शिरले या बरोबरच मुलांचे शैक्षणिक स्पप्न पावसाबरोबर वाहून गेले अनेक शेतकऱ्यांचे सोयाबिन बनीम पावसाच्या पाण्याने वाहून गेल्या या पावसाने अनेकांचे नुकसान झाले. या नुकसानीमध्ये अनेक विद्यार्थांचे शैक्षणिक साहीत्य भिजले गेले तेंव्हा विद्यार्थांना दिलासा देण्यासाठी पानगाव येथे प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील अतिवृष्टी ग्रस्त कुटूंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप हा कार्यक्रम जि.प. शाळा पानगाव येथे आयोजित करण्यात आला




होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुरेश वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून विधीतज्ञ ॲड मंचकराव डोणे , कलापंढरीचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी,ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य बाबा हलकुडे, अनिल फुलारी, ग्रामपंचायत सदस्य रंजनाताई गालफाडे, कुलभुषण संपत्ते आदींची प्रमुख उपस्थीती होती. रेणापूर तालुक्यातील १३ गावांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप संस्थेच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहूने म्हणून बोलत असताना ॲड मंचकराव डोणे, म्हणाले की, कला पंढरी संस्थेच्या वतीने येथे कार्यरत असलेल्या बालविकास केंद्रामध्ये शिक्षण घेणारी बालके ज्या पद्धतीने त्यांचा अनुभव सांगत होती त्यातून असे लक्षात आले की, या ठिकाणी सत्य आणि असत्य याची जाणीव होऊन सत्य भूमिकेला स्वीकारून त्या पद्धतीने जीवन जगण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. खऱ्या अर्थाने आजच्या पिढीला ज्या शिक्षणाची गरज आहे ते देण्याचे कार्य कलापंढरी संस्था करीत आहे.म्हणून कला पंढरीचे कार्य समाजाला प्रेरणा देणारे आहे.

पुढे बोलताना म्हणाले की सावित्रीबाई फुले यांनी ज्या उद्देशाने शिक्षणाची दारे सर्वांसाठी विशेषता मुलींसाठी खुली केली ती भूमिकापुढे घेऊन अतिशय खेड्यापाड्यातल्या लेकरांना विशेषतः श्रमिक कुटुंबातील लेकरांना खरं शिक्षण देण्याचे कार्य संस्था करीत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज पवार मधुकर गालफाडे, संध्याराणी गालफाडे,आदींनी परिश्रम घेतले.

# उदगीर न.प. निवडणुकीसाठी प्रशासनाकडून तयारी

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर :** सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक उदगीर नगरपालिका निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांची उपजिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा न. प. मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, नायब तहसीलदार ज्ञानोबा मोरे हे उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार नगराध्यक्ष पदाची निवड थेट जनतेतून होणार आहे. तर उदगीर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० प्रभाग असून एका प्रभागातून दोन उमेदवार निवडून द्यायचे आहेत.

९ वर्षानंतर उदगीर नगरपालिकेचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. प्रशासनातर्फे निवडणुकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. या निवडणुकीत थेट

**९१ मतदान केंद्रांवर ८३१७९ मतदारांना मतदानाचा हक्क**

जनतेतून नगराध्यक्ष निवडला जाणार आहे. तर २० प्रभागातून ४० नगरसेवक निवडले जाणार आहेत. ९१ मतदान केंद्रावर एकूण ८३ हजार १७९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रशासनाकडून तयारी सुरू झाली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

९५४ दुबार मतदार; दोन ठिकाणी मतदान केल्यास उदगीर नगरपालिका निवडणुकीच्या मतदार यादीमध्ये ९५४ मतदारांची नावे मतदान केंद्राध्यक्षाकडे दुबार मतदारांची यादी असणार आहे. मतदारांना एकाच अधिकार आहे. दुबार नावे असणाऱ्या मतदारांकडून एकच मतदान करण्यासाठी प्रपत्र दुबार मतदारांनी दोन वेळा मतदान केल्याचे आढळून आल्यास कारवाई होणार निवडणूक आयोगाच्या करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले. दुबार आढळून आलेली आहेत. ठिकाणी एकच मतदान करण्याचा १ भरून घेतले जात आहे.

जर निर्देशानुसार कायदेशीर कारवाई सुशांत शिंदे यांनी सांगितले. उदगीर नगरपरिषद निवडणुकीत शहरातील ८३ हजार १७९ मतदारांना मतदानाचा अधिकार आहे. त्यात पुरुष मतदार ४२ हजार ६३६, स्त्री मतदार ४० हजार ५२६ आणि तृतीयपंथी मतदार १७ आहेत. दिनांक २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजताच्या दरम्यान ९१ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. तर दुसऱ्याच दिवशी दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता शासकीय आयटीआय कॉलेज येथे मतमोजणी सुरु होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. २० प्रभागात अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ८ जागा, अनुसूचित जमातीसाठी १ जागा, नागरिकांचा इतर मागासवर्गीय प्रवर्ग ११ जागा, खुल्या प्रवर्गासाठी २० अशी आरक्षण सोडत जाहीर झाली असून यामध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित आहेत.

# *'आप' घेणार स्थानिक स्वराजच्या निवडणुकीत भाग*

***तभा वृत्तसेवा***

***रेणापूर :*** *रेणापूर तालुक्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आम आदमी पार्टी स्वबळावर लढवणार असल्याची माहिती रेणापूर येथे आयोजीत करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष आश्र्वीन नलबले यांनी दिली. रेणापूर शहरातील नागरी समस्या, सार्वजनिक सुविधा, आरोग्य, शिक्षण, महिला सुरक्षा, स्वच्छता आणि स्थानिक विकासाच्या प्रश्नांवर लोकाभिमुख आणि प्रामाणिक राजकारण सशक्तपणे उभारण्याचा निर्णय आम आदमी पार्टीने घेतला आहे.*

# सिकंदराबाद अधिकाऱ्यांकडून उदगीर रेल्वे स्थानकाची पाहणी

## रेल्वे संघर्ष समितीकडून विविध मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर :** येथील उदगीर रेल्वेस्थानकात नुकतेच सिकंदराबाद विभागाचे सहाय्यक वित्तीय अधिकारी आय. एस. राव मूर्ती यांनी भेट देऊन रेल्वे स्थानकाची पाहणी केली. तर रेल्वे संघर्ष समितीचे पदाधिकारी, नागरिक व पत्रकारांशी संवाद साधला. उदगीर येथील रेल्वे स्थानकात असलेल्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

सिकंदराबाद येथील रेल्वे विभागाचे सहाय्यक वित्तीय अधिकारी आय. एस. राव मूर्ती यांच्या उदगीर दौऱ्यात सोबत रेल्वे पोलिस बलाचे सहाय्यक अधीक्षक नरेंद्रकुमार वर्मा, आरपीएफचे पोलिस निरीक्षक संतोष कांबळे, अभियंता हनीफ, विद्युत अभियंता रामलू, वित्त अधिकारी शशीधर, संतोष चिगले, स्टेशन अधीक्षक बण्णीसिंग मीना आदी उपस्थित होते. यावेळी उदगीर रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष रमेश अंबरखाने, सचिव मोतीलाल डोईजोडे यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांचा सत्कार केला. तर उपस्थित नागरिकांनी उदगीरच्या रेल्वे स्थानकात प्रवाशांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. रेल्वे स्थानकात नेहमीच अस्वच्छता असते तर स्वच्छतागृह बंदच असते. स्वच्छतागृह बंद असल्याने रेल्वेस्थानकावर येणाऱ्या महिला प्रवाशांची अडचण होत असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सागितलं. उदगीर येथील राजस्थानी व्यापारी असोसिएशनचे शिष्टमंडळाने हैदराबाद-अहमदाबाद गाडी उदगीरमार्गे सोडण्यासाठीच निवेदन दिले. उदगीर रेल्वे संघ समितीकडून काजीपेठ- हडपसर गाडी नियमित करून मुंबईपर्यंत विस्तार करावा, आषाढ कार्तिकी एकादशीला विशेष फेऱ्या कराव्यात, मछलीपट्टणम ते बीदर रेल्वेचा विस्ता परळीपर्यंत करावा, हैदराबाद - बीदर इंटरसिटी उदगीरपर्यंत वाढविण्याची मागणी केली. पत्रकारांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधताना उदगीर रेल्वे स्थानकां रेल्वे पोलिस कार्यालय, सुलभ शौचालय, विद्युत व्यवस्था प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर शे उभारण्यात यावा, उदगीरच्या रेल्वे स्थानकात प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी करण्यात आली. यावेळी उमाकांत वडजे, रतिकां विक्रम आंबेसंगे, रोशन मुल्ला, हलकीकर, सचिन शिवशेट्टे, श्रीपाद सीमंतकर, श्रीनिवास सोनी, माधव रोडगे यांची उपस्थिती होती.

# साकोळ जि. प. गटाचे वातावरण तापले

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ जिल्हा परिषद गटात स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापल्याचे निदर्शनास येत आहे. आतापासूनच मतदारांमध्ये संभाव्य उमेदवार कोण असेल, यावरून आराखडे बांधले जात असल्याचे पहावयास मिळत आहे.

कोणतीही सार्वत्रिक निवडणूक म्हटली की, इच्छुक आलेच. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इच्छुकांची संख्या सर्वच राजकीय पक्षांकडून अधिक असते. यामध्ये संबंधित राजकीय पक्ष त्या त्या परिसरात नागरिकांमध्ये उत्तम संपर्क असलेल्या चेहऱ्याला संधी देण्याचा प्रयत्न करीत असतात. साकोळ जि.प. गटातून यावेळी सामाजिक संघटनांचे सदस्य उत्तमराव कदम निवडणुकीसाठी संभाव्य उमेदवार असल्याचे बोलले जात आहे.

कदम यांना उमेदवारी दिली गेल्यास पंडितराव शिंदे (तळेगाव), राम कांबळे (तळेगाव), अनिल शिंदे (कळमगाव), प्रशांत पाटील, सदानंद पाटील (दैठणा), मराठी पत्रकार संघ शाखा शिरूर अनंतपाळचे उपाध्यक्ष शंकर मिटकर, सचिव राजनारायण बिरादार, सामाजिक कार्यकर्ते शिवहर कोटे, राम बालवाड आणि इतर अनेक क्रियाशील नागरिक यांनी कदम यांना उमेदवारी द्या, आम्ही मैदानात उतरतो असा निर्धार व्यक्त केला आहे. या सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह एवढा प्रखर आहे की ते स्वखर्चाने आणि स्वबळावर प्रचाराची जबाबदारी घ्यायला तयार आहेत.

उत्तमराव कदम यांचा प्रवास हा केवळ राजकारणाचा नाही, तर तो जनतेच्या हक्कासाठी लढणाऱ्या समाजसेवकाचा प्रवास आहे. म्हणूनच या परिसरातील जन्मत यांच्या समर्थनात दिसून येत आहे. विद्यार्थी जीवनापासूनच ते सामाजिक आणि जनहिताच्या प्रश्नांत सक्रिय राहिले आहेत. पत्रकार म्हणून समाजातील दुर्लक्षित घटकांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या, बांधकाम कामगारांच्या वेदना आणि शासनाच्या त्रुटी समाजासमोर आणल्या. त्यांच्या लेखणीचा टोकदारपणा आणि विचारांचा प्रामाणिकपणा हेच त्यांचे सर्वात मोठे बलस्थान आहे. त्यांचे वृत्तपत्र आजही जनतेचा आवाज म्हणून ओळखले जाते. दि. १० जानेवारी १९८६ रोजी भारतीय जनता पक्षाच्या कार्यात त्यांनी पहिले पाऊल ठेवले. त्या दिवसापासून आजवर ते पक्षाशी निष्ठावान राहिले आहेत. अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा सरचिटणीस, उपाध्यक्ष, तालुका उपाध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत जबाबदारीने पार पाडल्या.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# महाराष्ट्र आशा व गटप्रवर्क फेडरेशन CITU च्या अधिवेशनाची रॅली व सभेने सुरुवात

## दोन दिवसीय अधिवेशनात राज्यभरातील २५० आशांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ नोव्हेंबर**

आशांना शासकिय कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ मिळाले पाहिजेत यासाठी आशा व गटप्रवर्क फेडरेशन उखढण सतत लढे आंदोलन करीत आहे. मागणी मान्य होई पर्यंत लढा चालु ठेवण्याचा निर्धार CITU चे राज्य महासचिव कॉ एच एम शेख यांनी केला आहे. शनिवारी दि ८ रोजी परळी येथील मोंढा मैदानावर झालेल्या सभेत ते बोलत होते.



महाराष्ट्र आशा व गटप्रवर्क फेडरेशन CITU चे ४ अधिवेशन परळी येथील प्रवचन सभामंडपात झाली. शनिवारी दि ८ रोजी सकाळी दहा वाजता प्रवचन सभामंडप येथुन आशा स्वंसेवीका ची रॅली काढण्यात आली. रॅली मधील आशांच्या हातात लालबावटयाचा झेंडा व मागण्यांच्या गगणभेदी घोषणानी परिसर दणाणून गेला होता. रॅली चा समारोप मोंढा मैदानावरील जाहीर सभेने झाला. यावेळी बोलताना कॉ एच एम शेख यांनी आरोग्य विभागातील महत्वाचा दुवा म्हणुन आशा स्वंसेवीका काम करीत आहेत. कोरोना सारख्या महामारीत प्रत्येक घरोघरी जाण्याचे काम आशांनी केले होते. त्यांना सेवेत कायम करुण शासकिय लाभ मिळाले पाहिजेत. यासह विविध प्रलंबित प्रश्ने सरकारनी सोडवावीत. आशा वर्कर्स यूनियनच्या राज्याध्यक्ष कॉ आनंदी आवघडे, सरचिटणीस कॉ पुष्पा पाटील, सिटु चे स्वगताध्यक्ष सय्यद हनीफ करीम उर्फ बहादुर भाई यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी व्यासपीठावर माकप चे जेष्ठ नेते कॉ पी एस घाडगे, कॉ अशोक थोरात, कॉ सुवर्णा रेवले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सिटु चे जिल्हाध्यक्ष कॉ बी जी खाडे यांनी केले. सुत्रसंचलन बीड जिल्हा आशा वर्कर्स युनियन चे जिल्हा सचिव कॉ किरण सावजी यांनी तर आभारप्रदर्शन जिल्हाध्यक्ष कॉ शिवाजी कुरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशा लांडगे, हेमा काळे, अनिता गिराम, छाया रणदिवे, सारिका मुंडे, अनिता चाटे, भाग्यश्री थावरे, उमा वाघमारे, भारती राख, सुवर्णमाला मुंडे, जालिंदर गिरी, शेख जावेद, प्रकाश वाघमारे, बाबासाहेब रोडे, शुभम काकडे आदींनी परिश्रम घेतले.

वैजनाथ मंदिर परिसरातील प्रवचन सभामंडप येथुन रॅलीला सुरुवात

वैजनाथ मंदिर, सेवालाल महाराज चौक, राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे मोंढा मैदानावर रॅली चे रुपांतर सभेत झाले.

रॅलीत आशांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

सर्व आशांनी लाल साडी परिधान केल्याने वेगळेपण दिसत होते.भव्य रॅली व गगणभेदी घोषणेनी परिसर दणाणून गेला होता.

# अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा ठरला परिवर्तनाची नांदी; शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ नोव्हेंबर**

देशात साडेसहा लाख गावे आहेत... संकल्प केला तर सर्व गावांत परिवर्तन घडू शकते. मला इथे येऊन स्वागत किंवा जयजयकार करून घ्यायचा नव्हता. मला इथे ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले आदर्शवादी काम पहायचे होते. शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच आर्थिक क्रांती घडू शकते हा आत्मविश्वास इथे आल्यानंतर मला आणि सर्वकाही पाहिल्यानंतर वाटतो आहे. जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन, फळबाग लागवड, तुतीची शेती यावर त्यांच्यासोबत बसून एक अभ्यासपूर्ण मॉडेल बनवून त्याला देशभर लागू करायचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी संवाद मेळाव्यात बोलतांना केले. यावेळी कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी, युपीएलचे विक्रम श्रॉफ, रवी झुनझुनवाला, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे डॉ.इंद्रमणी त्रिपाठी, ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक डॉ.हरिश्चंद्र वंगे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.



शेतकऱ्यांचे उत्पन्न एवढे वाढेल की देशातील एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. भारताचा कृषीमंत्री म्हणून मी आपल्या लढाईत सहभागी आहे. शेतकऱ्यांसाठी काम करणे हासुद्धा एक फार मोठा संघर्ष आहे. एक युद्ध गरिबीच्या विरोधात, एक युद्ध लाचारी आणि हतबलतेच्या विरोधात लढूया आणि येणाऱ्या भविष्यकाळात हातात हात घेऊन काम करूया. केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी उपस्थित हजारो शेतकऱ्यांना दिला. तर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी म्हणाले की, ब्रिटिशांच्या काळात फोडा आणि राज्य करा अशी निती होती. आज देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली तरीही आपण विभागलेलेच आहोत. पक्षात, प्रदेशात, जातीत अशा आपल्या विभागण्या झाल्या आहेत. आज आपल्याला शेतकरी म्हणून एकत्र यायला पाहिजे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांची पिके तर वाहून गेलीच मात्र मातीही वाहून गेल्याने त्यांची स्वप्नेही वाहून गेली. अगोदरच शेतकरी अस्मानी संकटांच्या गर्तेत असताना त्यात सुलतानी संकटेही त्याला सोडत नाहीत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. एक रुपयाही उत्पन्न मिळत नसतांना तो जगतो कसा? हाच प्रश्न मला पडलेला असल्याचे त्यांनी म्हटले. सिरसाळा येथे ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाड्याच्या विविध भागांतून हजारो शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रमास उपस्थिती लावली. शेती संलग्न आस्थापनांचे विविध स्टॉल्सही कार्यक्रमस्थळी उभारण्यात आले होते. विविध गावांतील यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# बीडमध्ये एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलतर्फे पोटविकार तज्ज्ञांची सेवा उपलब्ध

**– नागरिकांच्या आरोग्यासाठी विशेष उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर, बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमांतर्गत, प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार ११ नोव्हेंबर २०२५ रोजी २ ते ४ वाजेपर्यंत हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी उपलब्ध असतील.

या विशेष उपक्रमाचा उद्देश लवकर निदान, तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर भर देऊन पोटविकारांवरील प्रभावी उपाय नागरिकांना उपलब्ध करून देणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून, यामध्ये तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार मार्गदर्शन मिळणार आहे.

या उपक्रमाबाबत सैय्यद हसीब सरांचे एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, माने पेट्रोल पंपाच्या मागे,नर्सरी रोड बीड तर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. अधिक माहितीसाठी ९९२३०१०२०२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

# भाजपा अंबाजोगाई युवक शहराध्यक्षपदी अहेमद पप्पूवाले यांची नियुक्ती

## अंबाजोगाई शहरातून पप्पूवाले यांच्या निवडीचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ नोव्हेंबर**

केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई युवक शहराध्यक्षपदी अहेमद करीम पप्पूवाले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहरातून पप्पूवाले यांच्या निवडीचे स्वागत होत आहे.

केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून व भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे यांच्या प्रमुख उपस्थितीत अहेमद करीम पप्पूवाले यांची भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई युवक शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी अहेमद पप्पुवाले यांनी युवा मोर्चा भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष यशस्वीरित्या भुषविले आहे. तर त्यांच्या सुविद्य पत्नी रजिया अहेमद पप्पुवाले या भारतीय जनता पार्टी, महिला मोर्चाच्या मंडळ अध्यक्ष आहेत. दोघेही पती-पत्नी एक कुशल संघटक म्हणून ओळखले जातात. अहेमद पप्पुवाले यांना देण्यात आलेल्या नियुक्तीपत्रात नमूद केले आहे की, आपण आजवर केलेल्या पक्षकार्याची नोंद घेऊन, आपल्या क्षमतेचा वापर पक्षकार्यासाठी पर्यायाने समाज कार्यासाठी अधिक व्हावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, अंबाजोगाई शहर मंडळ कार्यकारिणीत युवक शहराध्यक्ष या पदावर आपली नियुक्ती करण्यात आली आहे, येत्या काळात पदाच्या माध्यमातून




सर्वांना सोबत घेवून पक्षवाढीसाठी सर्व स्तरावरून प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून पप्पूवाले यांना त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. आपल्या निवडीबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अहेमद पप्पूवाले यांनी सांगितले आहे की, ९ वर्षांपूर्वी म्हणजे २९ नोव्हेंबर २०१६ रोजी मी माझ्या आयुष्यातील पहिल्या नगरपरिषद निवडणुकीच्या निकालाला सामोरे गेलो आणि त्यावेळी माझा पराभव झाला होता. त्यावेळेसचा निवडणुकीतला आनुभव घेऊन आणि पराभव स्विकारून भविष्यात सर्वसामान्य नागरिकांकरीता सामाजिक कार्य करण्याचा मनापासून निश्चय केला होता. कारण, त्या वेळेस झालेल्या पराभवापेक्षा मिळालेली मते, त्या जनतेचा मला मिळालेला उत्स्फूर्त पाठिंबा आणि विश्वास यातच मी निवडणुकीच्या पराभवापेक्षा काहीतरी जिंकल्याचा आनंद होत होता. वयाने लहान असल्यामुळे राजकीयदृष्ट्या झालेल्या पराजयाच्या दुःखापेक्षा खुप काही अनुभवयाला आले. खुप काही शिकण्यास ही मिळाले. यातून बोध घेऊन लोकांसाठी कार्य करण्याची ऊर्जा खऱ्या अर्थाने मला या आजच्या ९ वर्षांपूर्वीच्या दिवशीच मिळाली आणि त्या वेळेपासून स्वःताला समाज कार्यासाठी आजपर्यंत वाहून घेऊन घडेल तसे कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. यावेळी आनेक सहकारी मित्रांची मोलाची साथ मदत मला मिळाली. या पुढेही आमच्या नेत्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्त्वाखाली व माझे गुरूवर्य नंदकिशोर (काकाजी) मुंदडा, माझे नेते अक्षय भैय्या मुंदडा, भाजपा शहराध्यक्ष संजय भाऊ गंभीरे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी अंबाजोगाई भाजपा युवक शहराध्यक्षपदी नियुक्ती केल्याबद्दल सर्व सन्माननीय मान्यवर नेत्यांचे मनःपूर्वक धन्यवाद व आभार.





बीड शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरातील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागते (छाया कृष्णा शिंदे)

# स्वातंत्र्य चळवळीत वंदे मातरम कोट्यावधी भारतीयांचा युद्धघोष-प्राचार्य डॉ.सुहास मोराळे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग अंतर्गत दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालय परिसरात *वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे सामूहिक गायन* आयोजित करण्यात आले होते.या सामूहिक गायनाच्या प्रसंगी भारत मातेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांच्या हस्ते करण्यात आले. आले.महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणाले स्वातंत्र्य चळवळीत वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत कोट्यावधी भारतीयांचे युद्धघोष होते. या गीताचे स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक महत्त्व घेता राष्ट्रगीता प्रमाणेच या गीतालाही राष्ट्रगीत म्हणून दर्जा आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे उपस्थित होते राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राम गव्हाणे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक राजपाल जाधव यांनी मानले विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक दीपक देशपांडे, क्रीडा विभागाचे डॉ छत्रपती पांगरकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी वंदे मातरम या सामूहिक गीत गायन मध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून भारत मातेवरील प्रेम भारत माता की जय वंदे वंदे मातरम च्या घोषणा देऊन व्यक्त केले.

# रामतिर्थावर प.पू. दादा महाराज खडकीकर पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, शिवमहापुराणकथा व विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ नोव्हेंबर**

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा बुधवार दि.१२ नोव्हेंबर पासुन ते बुधवार १९ नोव्हेबर २०२५ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्री शिवमहापुराण कथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ शिवमहापुराणकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. शिवमहापुराण कथाप्रवक्ते हभप भागवताचार्य अनिल महाराज जोशी माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने बुधवार दि.१२ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल.

दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा एस.आर. ढोरमारे, डॉ.काकाडे, उबाळे व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. बुधवार दि.१२ नोव्हेंबर रोजी हभप. राधाबाई साळुंके. गुरुवार दि.१३ रोजी हभप मोहन महाराज खरमाटे, शुक्रवार दि.१४ रोजी हभप सुर्यकांत महाराज पुरुषोत्तमपुरीकर. शनिवार दि.१५ रोजी रामेश्वर बाहेती व सहकारी गेवराईकर यांचे सुंदरकांड रा.८ ते ११वा. रविवार दि. १६ रोजी हभप सुधाकर राऊत, हिवरशिंगा सोमवार दि.१७ रोजी बालकीर्तनकार हभप सोहम सातपुते. मंगळवार दि.१८ रोजी हभप अनिल महाराज जोशी यांची कीर्तनसेवा होईल.

सप्ताहाची समाप्ती बुधवार दि.१९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी शिवमहापुराणकथा, कीर्तन, श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर साधकभक्त परिवारातर्फे श्री. विद्यागुरु खडकीकर महाराज यांनी केले आहे.

# सुंदर बोंदर माजलगाव नगरपरिषदेचे नवे मुख्याधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ नोव्हेंबर**



माजलगाव नगरपालिके त मुख्याधिकाऱ्यांच्या वारंवार बदलांमुळे प्रशासनात अस्थिरता निर्माण झाली होती. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून माजी मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण निलंबित झाल्यानंतर, वडवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट निगळ यांनी माजलगाव नगरपरिषदेचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला.

अल्पावधीतच त्यांनी पारदर्शक व प्रामाणिक कारभार करून नागरिकांची मने जिंकली. मात्र, राज्य शासनाच्या नवीन बदली आदेशा नुसार पोपट निगळ यांची बदली धारूर नगर परिषद येथे करण्यात आली आहे. त्यांच्या जागी सुंदर बोंदर यांची माजलगाव नगरपालिकेचे नवनियुक्त मुख्याधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

## ग्रामीण भागातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी पर्वणी!

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.८ नोव्हेंबर**

तालुक्यातील कृषिधन,शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोड्युसर कंपनी केज यांच्या वतीने दि.७ ते ९ हे तीन दिवशीय कृषी प्रदर्शन विठाई मंगलकार्यालय येथे सुरू झाले. कृषी प्रदर्शनाची सुरुवात शालेय विद्यार्थी यांच्या शोभायात्रा काढून झाली.कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन खा. बजरंग सोनवणे, हवामान तज्ञ पंजाबराव डक, तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे,विकास मिरगणे,हनुमंत भोसले,यांच्या हस्ते व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भव्य कृषी प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन झाले. केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.उद्घाटक खा .बजरंग सोनवणे म्हणाले ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी ही एक पर्वणी आहे शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढवता येईल. शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनास भेट देऊन तंत्रज्ञान अवगत करावे कृषी प्रदर्शन आयोजक कंपनीचे अभिनंदन करून केले. हवामान अभ्यासक पंजाबराव डक म्हणाले. शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजानुसार आपलं पीक व्यवस्थापन करावे. तंत्रज्ञाना शिवाय शेतीला पर्याय उरलेला नाही. कमी खर्चात अधिक उत्पन्न



घेण्यासाठी अभ्यासपूर्ण शेती करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित त्यांनी प्रदर्शनाची पाहणी करून शुभेच्छा दिल्या.

आज आणि उद्या दोन दिवस हे कृषी प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहेजिल्हयातील सर्व शेतकरी बांधव, महिला बचत गट, शेतकरी गट, व्यवसायीक यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कंपनीचे संचालक विशाल चौरे यांनी केले. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान , पाणी व्यवस्थापन , पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी झाल्या आहेत. केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांनी,शेतकरी गटांनी कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या.मध्ये शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोड्युसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी येत आहेत प्रदर्शनामध्ये प्रगत शेती मशिनरी , आधुनिक साधने ,सुधारीत बीयाणे, खते ,किटक नाशके ,दुग्धव्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके आहेत. हे प्रदर्शन शेतकरी, व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थी यांच्यासाठी एक व्यासपीठ म्हणुन उपलब्ध आहे. यामुळे आपल्या जिल्हयातील तसेच मराठवाडयातील शेतीतील व शेतीपुरक व्यवसायातील उत्पादनासाठी निश्चीतच मदत होईल. असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.हे कृषी प्रदर्शन मराठवाडयातील पारंपारीक शेतीचे देखावे हे या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरले आहे. पहिल्या कृषी प्रदर्शनात शेतकरी, महिला बचत गट, व्यावसायिक विद्यार्थी यांनी भेटी दिल्या.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## डॉ. अशोक नारनवरे यांचे आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** अ. भा. समाजवादी शिक्षण हक्क सभा जिल्हा शाखा लातूरच्या वतीने, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जंयती दिनी' निमित्त आज सोमवा, दि. १० नोव्हेंबर रोजी सांयकाळी सव्वा पाच वाजता लातूर येथील बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन क्रीडा संकूल वाचनालय येथे शिक्षण हक्क पत्रिकेच्या शैक्षणिक तत्ववेते आणि त्यांची प्रासंगिकता या विषयावरील विशेषांकाचे प्रकाशन आणि शोषितांचे शिक्षण व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या विषयावर डॉ. अशोक जाहीर नारनवरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजवादी शिक्षण सभा आणि राष्ट्र सेवा दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, समाजवादी ज्येष्ठ शिक्षण तज्ञ, विचारवंत प्रा. डॉ. शरद जावडेकर पुणे हे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजवादी शिक्षण सभेचे शिवाजीराव पिटलेवाडी, गणपतराव तेलंगे, सुरज पाटील, बाळ होळीकर तसेच राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, उपाध्यक्ष डॉ. गणेश गोमारेसह कार्यक्रम सन्वयक, सर्व समविचारी कार्यकर्ते व सदस्य-पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# लातुरात थंडीचा वाढला कडाका

**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** लातूर शहर व परिसरात मागच्या दोन दिवसांपासून थंडीचा कडाका चांगलाच वाढला आहे. वाढत्या थंडीमुळे शहरातील जुन्या रेल्वे स्थानक परिसरातील स्वेटर मार्केट ग्राहकांनी चांगलेच गजबजले आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी स्वेटर-उबदार कपड्यांच्या किंमतीत पाच ते दहा टक्क्यांची वाढ झाल्याचे स्वेटर विक्रेत्यांनी सांगितले.



यावर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने हिवाळा अधिक कडक असण्याची शक्यता वर्तवली जात होती. सध्या दिवसा जरी उन्हाचा पारा वाढलेला दिसत असला तरी सायंकाळनंतर थंडीचा कडाका वाढत असल्याचे जाणवते. जसजशी रात्र वाढत जाते, तसतसा थंडीचा कडाका कमालीचा वाढत असल्याचे अनुभवास येत आहे. नोव्हेंबरच्या मध्यातच थंडी मी म्हणत असेल तर ऐन जानेवारी-फेब्रुवारीत थंडी किती अधिक प्रमाणात असेल, या कल्पनेनेच अनेकांना हुडहुडी भरत असल्याचे निदर्शनास येत आहे.

पर्यावरणाच्या वाढत्या असमतोलामुळे मागच्या काही वर्षात हिवाळा हा ऋतू केवळ नावालाच उरल्याचे पहावयास मिळाले. परंतू यावर्षी पावसाचे प्रमाण खूप राहिले. जिल्ह्याच्या अनेक भागात अतिवृष्टीही झाली. त्यामुळे हवामान तज्ज्ञांनी यावर्षी थंडीचे प्रमाण अधिक राहणार असल्याचा अंदाज वर्तवला होता. तो अंदाज आता लातूर शहर, परिसर व जिल्ह्यात वास्तवात उतरताना दिसत आहे. रविवारी सायंकाळी सहा-साडेसहा वाजल्यापासूनच गारठा वाढल्याचे दिसून आले. वाढत्या थंडीपासून बचाव करण्यासाठी जो-तो उबदार कपडे-

### स्वेटर मार्केट ग्राहकांनी गजबजले

स्वेटरचा उपयोग करतो. आपल्याकडे जुने स्वेटर असले तरी अनेकांना नवीन स्वेटर खरेदी करण्यात रस असतो. लातूर शहरात जुने रेल्वे स्थानक आणि महानगर पालिकेच्या समोरच्या भागात, मुख्य रस्त्यावर स्वेटर विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत. स्वेटर खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी जुने बसस्थानक-रेल्वे स्थानकानजिक असणाऱ्या स्वेटर मार्केटमध्ये होताना दिसत आहे.

यावर्षीच्या स्वेटर बाजारातील एकंदर उलाढाली संदर्भात स्वेटर मार्केटमधील व्यापारी इब्राहिम शेख उर्फ बाबाभाई यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी स्वेटरच्या किंमतीत यावेळी पाच ते दहा टक्क्यांची वाढ झाल्याचे सांगितले. स्वेटरचे मुबलक उत्पादन करणाऱ्या पंजाब, हरियाणा प्रांतालाही यावर्षीच्या अतिवृष्टीचा फटका बसला आहे. स्वेटर निर्मितीचे साहित्य मोठ्या प्रमाणावर भिजल्याने उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तरी स्वेटर विक्रेत्यांनी वाढत्या थंडीचा अंदाज घेऊन अगोदरच ॲडव्हान्समध्ये खरेदी केली आहे.

काही व्यापाऱ्यांनी तर आपल्या पत्नीचे दागिने गहाण ठेवूनही मालाची खरेदी केल्याचे बाबाभाई यांनी सांगितले. किंतीही थंडी वाढली तरी लातूरकरांना स्वेटर्स-उबदार कपडयांची उणीव भासता कामा नये, असा आपला प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# प्राचार्य कुंभार यांना 'जीवनगौरव' पुरस्कार

**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** वर्धा येथील यशवंतराव दाते स्मृती संस्थेच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा.ल.भोळे व डॉ.

**दाते संस्थेचे भोळे-सुमंत स्मृती पुरस्कार जाहीर; दीपक गायकवाड, वृषाली मगदूम, देवकुमार अहिरे मानकरी**



यशवंत सुमंत यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी दीपक गायकवाड (पुणे), प्रा. वृषाली मगदूम (वाशी-मुंबई), डॉ. देवकुमार अहिरे (पुणे) यांची निवड करण्यात आली व जीवन गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ संशोधक, विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार (लातूर) यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती निवड समितीचे प्रमुख निमंत्रक ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ व यशवंतराव दाते संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी दिली. या पुरस्कार वितरण समारंभाची तारीख नंतर जाहीर करण्यात येणार आहे.

डॉ. यशवंत सुमंत कुटुंबियांच्या वतीने सहा वर्षापासून ज्येष्ठ अभ्यासकासाठी जीवनगौरव पुरस्कार सुरु केला आहे. यावर्षीच्या सहाव्या पुरस्कारासाठी विचारशलाका त्रैमासिक व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील कामगिरीसाठी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार (लातूर) यांची निवड करण्यात आली आहे. यशवंतराव दाते स्मृती संस्था व डॉ. भा.ल. भोळे कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या भोळे स्मृती वैचारिक साहित्य पुरस्कारासाठी दीपक गायकवाड (पुणे) यांच्या 'पेरियार -मिथक आणि वास्तव' या ग्रंथाची निवड करण्यात आली आहे. भोळे कुटुंबीय व दाते संस्थेचे संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या डॉ.भा.ल. भोळे स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कारासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली मगदूम (वाशी-मुंबई) यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधन प्रेरणा पुरस्कारासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे इतिहास विभागातील प्राध्यापक, संशोधक डॉ. देवकुमार अहिरे (पुणे) यांची निवड करण्यात आली आहे. वरील पुरस्काराचे स्वरूप डॉ.भा.ल. भोळे स्मृती पुरस्कार प्रत्येकी वीस हजार व डॉ.यशवंत सुमंत स्मृती पुरस्कार प्रत्येकी दहा हजार रुपये रोख , स्मृतिचिन्ह, शाल व मानपत्र असे आहे.

# सीनजी सिलेंडरच्या लिकेजमुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प

**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** सीएनजी सिलेंडरची वाहतूक करणाऱ्या वाहनातील सिलेंडर लिकेजमुळे लातूर शहरातील नांदेड रोड महामार्गावरील वाहतूक बराच वेळ ठप्प झाल्याची घटना रविवारी सकाळी घडली. प्रशासनाच्या प्रयत्नाने दोन तासांनंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

लातूर शहरातील गरुड चौकापासून नांदेडला जाणाऱ्या हायवेवर आज सकाळी अकरा - सव्वा अकराच्या सुमारास हा प्रकार घडला. सीएनजी सिलेंडरची वाहतूक करणारा ट्रक क्र. एमएच १४ - के ए २९२० मधील सीएनजी सिलेंडर लिकेज झाल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर दोन्ही बाजूंची वाहतूक तात्काळ बंद करण्यात आली. पोलिस व अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. साधारणतः अर्ध्या तासापासून टँकरमधून सीएनजी लिकेज सुरू होते. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या तरी लिकेज थांबवणे शक्य झाले नाही. त्यामुळे संपूर्ण सीएनजी स्वतःहून बाहेर पडून टँकरमधील दाब कमी होईपर्यंत वाहतूक बंद ठेवण्यात आली. अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी वेळेत पोहोचली. त्यामुळे सुदैवाने कोणतीही भीषण घटना घडली नाही. पोलिसांनी तातडीने वाहतूक थांबवून नागरिकांना दूर ठेवण्याकामी महत्वाची भूमिका पार पाडली. यावेळी परिसरात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. सकाळी सुमारे ११:४५ च्या सुमारास टँकरचा दाब कमी झाल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि नांदेड रोडवरील वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली.



# लातूरची गंजगोलाई कायम अतिक्रमणाच्या विळख्यात

**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** नवी दिल्लीच्या कॅनॉट



प्लेसची प्रतिकृती असणारी लातूरची मुख्य बाजारपेठ गंज गोलाई कायम अतिक्रमणाच्या विळख्यात असते. चक्क रस्त्यावर थांबणाऱ्या हातगाड्यांमुळे वाहनधारकांना रस्ता शोधताना जणू कसरतच करावी लागते.

लातूर शहराचे भूषण म्हणूनही १६ रस्त्यांनी जोडल्या गेलेल्या गंज गोलाईकडे पाहिले जाते. वर्षाचे बाराही महिने गंजगोलाई अतिक्रमणाच्या विळख्यात असते. मनपा प्रशासन अधूनमधून अतिक्रमण हटाव चा फार्स करते. पण, चार दिवसानंतर पुन्हा सगळे जैसे थे झाल्याचे दिसून येते. हातगाडीवाले, ऑटो रिक्षांमुळे गंज गोलाई मधील रस्ता एवढा छोटा झालेला दिसून येतो की, केवळ एकच चार चाकी वाहन कसेबसे जाऊ शकते. रविवार असो की कोणताही सुटीचा दिवस, गंज गोलाईत वाहतूक खोळंबल्याचे चित्र कायमच पाहायला मिळते. चक्क पोलीस कर्मचारी समोर असले तरीही ना हातगाडेवाले रस्त्यातून बाजूला होतात ना ऑटोवाले. त्यामुळे वाहनधारकच नव्हे तर पादचाऱ्यांनाही चालणे जिकिरीचे झाल्याचे दिसून येते.

यावर मनपा प्रशासनाने वेळीच योग्य तो तोडगा काढून नागरीकांची होणारी गैरसोय टाळावी, अशी मागणी वाढीस लागली आहे.

# दयानंद महाविद्यालयात वंदे मातरम समूह गान





**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित दयानंद विधी महाविद्यालयात वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वंदे मातरम समूह गान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. संगीता महाजन यांनी वंदे मातरम या गीताचे अलौकिकत्व अधोरेखित करताना उपस्थितांना देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. यानंतर या कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश काटेकर यांनी वंदे मातरम गीताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्यलढा, बंकिमचंद्र चटर्जी यांच्याद्वारे वंदे मातरम गीताची निर्मिती, ह्या गीताची महती, ह्या गीतामुळे सर्वसामान्य भारतीयांच्या मनात निर्माण झालेली जज्वल्य देशभक्ती इत्यादी बाबतीत सविस्तर माहिती दिली. यानंतर सर्वांनी उत्स्फूर्तपणे आणि उत्साहाने वंदे मातरम या गीताचे समूह गान केले.

विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची आणि एकात्मतेची भावना दृढ झाली. या समूहगानप्रसंगी महाविद्यालयात राष्ट्रभक्ती आणि एकात्मतेचा मिलाफ अनुभवयास मिळाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अतिश तिवारी, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी, प्रा. शामराव पाटील तसेच सर्वांनी परिश्रम घेतले.

# केंद्रीय मंत्री गडकरी जिल्हा दौऱ्यावर



**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री गडकरी यांचे १० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता लातूर विमानतळावर आगमन होईल. याठिकाणी ते राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचा आढावा घेतील. त्यानंतर हेलिकॉप्टरने किल्लारीकडे प्रयाण करतील. दुपारी १ वा. त्यांचे किल्लारी येथे आगमन होईल व याठिकाणी आयोजित शेतकरी मेळाव्याला उपस्थित राहतील. दुपारी २ वाजता लातूरकडे प्रयाण करतील. दुपारी २.३० वा. लातूर येथून विमानाने प्रयाण करतील.

# जिल्ह्यात थंडीची लाट; जनावरांचा बचाव करा!

**त.भा.वृत्तसेवा**

**लातूर :** अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे लातूर जिल्ह्यात तापमान झपाट्याने कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार नोव्हेंबरच्या उत्तरार्धात थंडीची लाट जाणवू शकते. ही स्थिती विशेषतः ग्रामीण भागातील पशुधनासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या जनावरांचा थादिपासून बचाव करण्यासाठी उपायोजना करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे.

जनावरांच्या शरीराचे तापमान कमी झाल्यास त्यांना हायपोथर्मिया, श्वसनाचे आजार, दूध उत्पादनात घट, आणि अचानक मृत्यू यांसारख्या घटना घडू शकतात. नवजात वासरे, अशक्त आणि दुभती जनावरे या काळात सर्वाधिक जोखमीच्या गटात येतात. या जनावरांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी जनावरांना उबदार निवारा तयार करावा. गोठ्याभोवती पडदे

**लातूर जिल्हा पशुसंवर्धन विभागाचा पशुपालकांना आवाहन**

लावावेत, पत्र्याच्या छपरावर वाळलेले गवत पसरावे. जमिनीवर वाळलेला चारा किंवा कडब्याचा थर ठेवावा. थंडी फार वाढल्यास गोठ्यात कृत्रिम प्रकाश किंवा बल्ब वापरावा. धूर निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.

जनावरांना थंड पाणी देऊ नये, दिवसातून ३-४ वेळा कोमट पाणी द्यावे. पूरक खाद्य, खनिज मिश्रण, मीठ, व जीवनसत्वांचा वापर करून जनावरांना संतुलित आहार द्यावा. अशक्त आणि



गाभण जनावरांना अतिरिक्त पौष्टिक खाद्य द्यावे जनावरांचा गोठा कोरडा ठेवावा, तसेच दररोज साफ करा वा. ओलावा व धूर टाळावा, गोठ्यात तुळस, लेमनग्रास किंवा दनरूडी यांच्या जुड्या लटकवल्यास कीटक दूर राहतात. लाळखुरकुत, घटसर्प, पीपीआर, एफएमडी, बीक्यू, एचएस यांसारख्या रोगांविरुद्ध लसीकरण करून घ्यावे. कृमी नियंत्रणासाठी वेळोवेळी औषधे द्यावीत. आवश्यक औषधे, सलाईन आणि इलेक्ट्रोलाइट्सचा साठा तयार ठेवावा.

नवजात वासरे, करडी, अशक्त, दुभती व आजारी जनावरे यांना उबदार ठिकाणी ठेवावे. रानात जनावरे ठेवू नयेत. त्यांच्यासाठी उबदार शेड तयार करावे. मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी. कोंबड्यांच्या शेडला रात्री पडदे लावावेत पक्ष्यांना कोमट पाणी व पौष्टिक खाद्य द्यावे. जनावरांमध्ये थरथर, सुस्ती, अन्न न खाणे, श्वास घेण्यास त्रास, त्वचा काळसर पडणे, दूध उत्पादन घटणे अशी लक्षणे दिसल्यास तत्काळ पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधा.

सरकारी रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधे व तज्ज्ञ कर्मचारी उपलब्ध आहेत. थंडीची लाट ही नैसर्गिक आपत्ती असली तरी तिचा परिणाम कमी करणे आपल्या हातात आहे. वेळेवर तयारी, गोठ्यातील व्यवस्थापन, आणि पशुवैद्यकीय सल्ल्याचे पालन यामुळे आपण आपले पशुधन सुरक्षित ठेवू शकतो, असे डॉ. शिंदे यांनी म्हटले आहे.

# नगरपंचायत निवडणूक उमेदवार चाचपणीला आला वेग

**त.भा.वृत्तसेवा**

**रेणापूर :** रेणापूर येथील नगरपंचायत निवडणुकीच्या अनुषगांने उमेदवार चाचपणीला वेग आला आहे. भाजप आमदार रमेश कराड व काँग्रेसचे जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धीरज देशमुख हे स्वतः लक्ष देणार असल्याने निवडणूक प्रतिष्ठेची होऊन अटीतटीची होणार आहे. दोन्ही पक्ष मित्रपक्षांना सोबत घेणार की स्वबळावर निवडणूक लढणार हे मात्र अद्याप चित्र स्पष्ट झाले नाही.

सन २०१६ मध्ये ग्रामपंचायत बरखास्त होऊन नगरपंचायत अस्तित्वात आली. त्यानंतर प्रशासकाने कांही महिने कारभार केल्या नंतर सन २०१७ मध्ये पहिली निवडणुक होऊन नगरपंचायतीवर भाजपची सत्ता आली. केंद्र व राज्यात भाजपची सत्ता असल्यामुळे रेणापूरच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मिळाला. त्यामुळे शहरात अनेक विकासकांना गती मिळाली. गतवर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघातून रमेश कराड विजयी झाल्यानंतर शहरात आता भारतीय जनता पक्षाचे अधिक बळ वाढले आहे. या तुलनेत मित्रपक्ष शिवसेनेचे कार्यकर्ते सक्रिय आहेत. मात्र राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अस्तित्वच नाही. त्यामुळे भाजप मित्रपक्षांना जागा सोडेल, अशी शक्यता धूसर आहे. यात काँग्रेस पक्षाकडून माजी आमदार धीरज देशमुख यांनी ही निवडणूक हातात घेतल्याने कार्यकर्त्यांत उत्साह संचारला आहे.